R.N.I.No.1814/57

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवा काळ

• मुंबई, रविवार १७ ऑक्टोबर, २०२१ • वर्ष-९९, अंक-२२२, पाने-८, किंमत : ₹ ५ NAVAKAL

• Issue - 222 Vol.- 99 Marathi - Daily - Mumbai, 17 October - 2021 Page- 8 Price- Rs. 5/-

24x7 : www.navakal.in • संपादक- सौ. जयश्री खाडिलकर-पांडे Email-navakal.1923@gmail.com

## पुणे आणि नाशिकहून दररोज मुंबईचा प्रवास करणाऱ्यांना पास का देत नाही?



**मुंबई उच्च न्यायालयाची राज्य सरकारला विचारणा**

**मुंबई-** लसीचे दोन्ही डोस घेतल्यानंतरही पुणे ते मुंबई आणि मुंबई ते नाशिक असा रेल्वे पास दिला जात नसल्याची तक्रार करत एका रेल्वे प्रवासी संघटनेने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. प्रवाशांना मासिक पास मिळत नसल्याने त्यांना मोठा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.त्यासोबत दररोज तारेवरची कसरत करत लांबचा प्रवास करावा लागत आहे. अशी कैफियत या याचिकेतून कोर्टापुढे मांडण्यात आली आहे. याची दखल घेत या प्रवाशांना रेल्वे पास का देत नाहीत? असा सवाल हायकोर्टाने राज्य सरकारला विचारत याप्रकरणी २५ ऑक्टोबरपर्यंत राज्य सरकारला माहिती देण्याचे निर्देश दिले आहेत. पश्चिम रेल्वे व उत्तर रेल्वेने लांब पल्ल्याच्या प्रवाशांना मासिक व त्रैमासिक पास देणे सुरू केले आहे. पण मध्य रेल्वेकडून मात्र अद्यापही असा पास दिला जात नाही. त्यामुळे नाशिक, पुणे येथून मुंबईत दररोज कामासाठी येणाऱ्या प्रवाशांचे अतोनात हाल होत आहेत.



# मीच काँग्रेसची अध्यक्षा आहे!

# कार्यकारिणीच्या बैठकीत सोनिया गांधी कडाडल्या

■ नवी दिल्ली

**मी नेहमीच** स्पष्टतेचे कौतुक केले आहे, माध्यमांद्वारे माझ्याशी बोलण्याची गरज नाही. आपण सर्वांनी प्रामाणिक चर्चा करूया, असे सोनिया गांधी म्हणाल्या. तसेच संघटनात्मक निवडणुका आणि अध्यक्षांच्या निवडीबाबत सोनिया गांधी यांनी भाष्य केले आहे. आम्ही ३० जूनपर्यंत काँग्रेसच्या नियमित अध्यक्षांच्या निवडीचा

**काँग्रेसच्या अध्यक्ष पदावरून सतत वाद सुरू आहेत. सोनिया गांधी हंगामी अध्यक्ष असल्याने पूर्णवेळ अध्यक्ष नेमण्याची मागणी होते. याच मुद्यावरून काँग्रेसमध्ये अंतर्गत दुफळी माजली आहे. अनेक नेत्यांमध्ये वाद विवाद सुरू आहेत. पूर्णवेळ अध्यक्षपदाची मागणी करणाऱ्या काँग्रेस नेत्यांचे नाव न घेता, सोनिया गांधी यांनी त्या काँग्रेसची स्थायी अध्यक्ष असल्याचे म्हणत विरोधकांना उत्तर दिले आहे. काँग्रेस अध्यक्ष आणि संघटनेच्या निवडणुका लक्षात घेऊन आयोजित केलेल्या या बैठकीत सोनिया गांधींनी भाषणाच्या सुरुवातीलाच काँग्रेसच्या प्रत्येक सदस्याला पक्षाचे पुनरुज्जीवन हवे आहे पण या ऐक्यासाठी आणि पक्षाचे हित असणे आवश्यक आहे असे म्हटले.**

रोडमॅप अंतिम केला होता, पण कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमुळे मुदत अनिश्चित काळासाठी वाढवण्यात आली. आज स्पष्टता आणण्याची संधी आहे, असे सोनिया गांधी म्हणाल्या.

आगामी विधानसभा निवडणुकांविषयी बोलताना काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी म्हणाल्या, आम्हाला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागेल, पण जर आपण एकजूट आणि शिस्तबद्ध राहिलो आणि केवळ




पक्षाच्या हितावर लक्ष केंद्रित केले तर मला खात्री आहे की आम्ही चांगले काम करू. उत्तर प्रदेश, पंजाब, उत्तराखंड, गोवा आणि मणिपूरमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू झाल्याची माहितीही सोनिया गांधी यांनी दिली.

यावेळी सोनिया गांधी यांनी लखीमपूर खेरीच्या घटनेवरही भाष्य केले. अलीकडे लखीमपूर - खेरीसारख्या धक्कादायक घटना भाजपाची मानसिकता दर्शवतात. यातून ते शेतकऱ्यांच्या आंदोलनाकडे कसे पाहत आहेत ते स्पष्ट दिसते. यातून स्पष्ट दिसते की भाजपा शेतकऱ्यांच्या जीवनाच्या आणि त्यांच्या उपजीविकेच्या संरक्षणासाठी या स्थिर संघर्षाला कसे सामोरे जात आहे.

## मग राणे आणि राज ठाकरेंनी शिवसेना का सोडली? देवेंद्र फडणवीसांचा मुख्यमंत्र्यांना सवाल

■ नागपूर

**दसरा** मेळाव्यात मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर सडेतोड टीका केली होती. त्यामुळे फडणवीसांनी आज सकाळ सकाळीच पत्रकार परिषद घेऊन ठाकरेंना प्रत्युत्तर दिले आहे. ते म्हणाले की ठाकरेंना मुख्यमंत्री व्हायचं नव्हतं तर सुभाष देसाई, एकनाथ शिंदे आणि दिवाकर रावते यांना मुख्यमंत्री का नाही केलं? नारायण राणे आणि राज ठाकरे शिवसेना सोडून का गेले असा सवाल देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

ते पुढे म्हणाले की, 'उद्धव ठाकरेंनी भाबडेपणाचा मुखवटा उतरवला पाहिजे. मुख्यमंत्रिपदाची त्यांची महत्त्वाकांक्षा होती ती त्यांनी



पूर्ण केली. त्याला तत्वज्ञानाची जोड देत आहेत. ते त्यांनी थांबवावं. शिवसेनाप्रमुखांना दिलेला शब्दच पाळायचा होता तर सुभाष देसाई, दिवाकर रावते, एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री करायचं होतं. मुख्यमंत्री व्हायचं नव्हतं तर नारायण राणेंना पक्षातून का बाहेर जावं लागलं? राणेंना तर पक्षप्रमुख व्हायचं नव्हतं. राज ठाकरेंना पक्षातून का जावं लागलं? त्यामुळे दोष देणं थांबवा. आता दोन वर्ष झाली आहेत. किती दिवस तेच तेच बोलणार. राजकारणात महत्त्वाकांक्षा असणं गैर नाही. पण त्याला तत्वज्ञानाची जोड देणं कितपत योग्य आहे?' असा सवालही त्यांनी केला.

शिवसेनेच्या दसरा मेळाव्यात विचाराचं सोनं लुटलं जायचं. पण काल त्यांना गरळ ओकताना पाहिलं. जनतेने

## राज्यात पुढील दोन दिवस मुसळधार पावसाची शक्यता

**पुणे-** बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाल्याने त्याचा परिणाम म्हणून राज्यात पुढील दोन दिवस मेघगर्जनेसह मुसळधार पाऊस कोसळणार असल्याची माहिती हवामान खात्याच्या पुणे विभागाचे वैज्ञानिक के. एस. होसाळीकर यांनी दिली. होसाळीकर यांनी सांगितले की, बंगालच्या उपसागरात हवेच्या कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाल्याने त्याचा परिणाम म्हणून महाराष्ट्रातील काही भागांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस पडेल. विदर्भ, मराठवाड्याचा काही भाग तसेच उत्तर मध्य महाराष्ट्रातील काही भागात पावसाची शक्यता आहे. नंदुरबार, गोंदिया, भंडारा, पालघर, ठाणे, अहमदनगर, बीड, रायगड, पुणे, उस्मानाबाद, रत्नागिरी, सातारा, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना पावसाचा इशारा देण्यात आलेला नाही. परंतु धुळे, नाशिक, जळगाव, नंदुरबार, जालना, अकोला, अमरावती, नागपूर, वर्धा, गडचिरोली, लातूर, परभणी, जालना, औरंगाबाद, वाशिम, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तसेच बुलढाणा, परभणी, हिंगोली, नांदेड, चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

## तीन केसेसमध्ये फ्लेचर पटेलच पंचच का? लेडी डॉन कोण? मलिक यांचा एनसीबीला सवाल

■ मुंबई

**राष्ट्रवादी** काँग्रेसचे मुख्य राष्ट्रीय प्रवक्ते नवाब मलिक यांनी आज पुन्हा एकदा पत्रकार परिषद घेत एनसीबीच्या कारवाईवर प्रश्न उपस्थित केले आहेत. एनसीबीने कारवाई दरम्यान बनवलेला पंच फ्लेचर पटेल कोण आहे? तसेच फ्लेचर पटेलसोबत फोटोत असणारी लेडी डॉन कोण आहे? असा सवालही नवाब मलिक यांनी विचारला आहे. तीन केसेसमध्ये फ्लेचर पटेल पंच आहेत. २५ नोव्हेबर २०२०, ०९ डिसेंबर २०२१ आणि २ जानेवारी २०२१ रोजीच्या कारवाई त फ्लेचर पटेल पंच आहेत. फ्लेचर पटेल हे समीर वानखेडे याचे कौटुंबिक मित्र आहेत. याचा अर्थ त्यांनी कारवाई



ठरवून केली असा होतो, असा आरोप नवाब मलिकांनी केला आहे. मात्र पंचाची नावे उघड करून त्यांचा जीव धोक्यात घालत असल्याचे फ्लेचर पटेल यांनी म्हटले आहे.

नवाब मलिक म्हणाले की, एनसीबी घरातली माणसं पंच करुन लोकांची फसवणूक केली जात आहे. फिल्म इंडस्ट्रीयल फ्लेचर पटेल आणि लेडी डॉनच्या माध्यमातून काय उद्योग सुरु आहेत याचा खुलासा एनसीबीने करावा. कोणतीही केस उभी करायची असते तेव्हा ज्या ठिकाणी घटना घडते तेव्हा तेथील प्रतिष्ठीत नागरिक, आजुबाजूची लोक यांना बोलवून पंचनामा करणं कायदेशीर तरतूद आहे. गेल्या एक वर्षातील माहिती घेतली असता एनसीबीने तीन केसेसमध्ये स्वतंत्र पंच म्हणून फ्लेचर पटेल

पान २ वर

## क्रिकेटपटू अवि बरोट यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

**नवी दिल्ली -** १९ वर्षांखालील भारतीय युवा क्रिकेट संघाचा माजी कर्णधार आणि सौराष्ट्रचा यष्टीरक्षक अवि बरोट यांचे शुक्रवारी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. तो २९ वर्षांचा होता.



त्याच्या या अकाली निधनाबद्दल भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे सचिव जय शहा यांच्यासह अनेकांनी दु:ख व्यक्त केले आहे.

डावखुरा युवा फलंदाज रवि बरोटने आपल्या कारकिर्दित हरियाणा आणि गुजरातचे प्रतिनिधीत्व केले होते. टी ट्वेंटीमध्ये धडाकेबाज शतक झळकावण्याची कामगिरी त्याने केली होती. टी-२० चे २० आणि प्रथम श्रेणीचे ३८ सामने रवि बरोट खेळला होता. यष्टीरक्षक आणि फलंदाज म्हणून त्याने चांगली कामगिरी केली होती. मात्र शुक्रवारी त्याला हृदयविकाराचा झटका आला आणि त्यांची प्राणज्योत मालवली. त्याच्या या अकाली जाण्याने अनेकांना धक्का बसला आहे, असे सौराष्ट्र क्रिकेट असोसिएशनने म्हटले आहे.

## इंधन दरवाढ! मुंबईनंतर पुण्यात डिझेल शंभरीपार

**नवी दिल्ली -** इंधन दरवाढीचा उधळलेला वारू थांबण्याचे काही नाव घेत नाही. आज सलग तिसऱ्या दिवशी भारतीय तेल कंपन्यांनी इंधन दरवाढ केली. यामुळे मुंबईनंतर आता पुण्यातही डिझेलने शंभरी पार केली आहे. याशिवाय पेट्रोलही ११० रुपयांच्या वर गेले आहे. यामुळे सामान्य नागरिकांना जगणे अवघड झाले आहे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेडने आज नवे इंधन दर जाहीर केले. त्यात पेट्रोल आणि डिझेल प्रत्येकी ३५ पैशांनी महागले आहे. त्यामुळे पुण्यात पेट्रोल ११० रुपये ९२ पैसे आणि डिझेल १०० रुपये ८ पैसे लिटर झाले आहे. मुंबईत डिझेलने यापूर्वीच शंभरी ओलांडली आहे. आजच्या दरवाढीनंतर मुंबईत पेट्रोल १११ रुपये ४३ पैसे आणि डिझेल १०२ रुपये १५ पैसे लिटर झाले आहे. पुण्यात पेट्रोल ११० रुपये ९२ पैसे आणि पावर पेट्रोल ११४ रुपये ६० पैसे लिटर झाले आहे. डिझेल १०० रुपये ८ पैसे आणि सीएनजी ६२ रुपये १० पैसे किलो झाला आहे. या इंधन दरवाढीमुळे वाहतूक खर्चात वाढ होत असल्याने महागाई वाढत आहे.

## प्रसिद्ध 'तळवलकर्स फिटनेस'शी संबंधित आठ जणांवर गुन्हे दाखल

■ मुंबई

**सुमारे** २०६ कोटी रुपयांच्या कर्जबुडीत प्रकरणी प्रसिद्ध तळवलकर्स बेटर व्हॅल्यू फिटनेस या प्रसिद्ध व्यायाम शाळेशी संबंधित ८ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आले आहेत. ॲक्सिस या राष्ट्रीयकृत बँकेने केलेल्या तक्रारीवरून मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने ही कारवाई केली आहे.२०१६ ते २०१९ या कालावधीत बँकेची २०६ कोटी ३५ लाख रुपयांची फसवणूक केल्याची तक्रार ॲक्सिस बँकेने पोलिसांत केली होती. याशिवाय इतर काही बँकांनीही अशाच तक्रारी तलवळकर्स फिटनेस विरोधात केल्या होत्या.मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने याप्रकरणी सहा महिने प्राथमिक चौकशी केल्यानंतर १४ ऑक्टोबरला यासंदर्भात आठ जणांवर गुन्हा

**सुमारे २०६ कोटींच्या कर्ज बुडीत प्रकरणी कारवाई**




दाखल केला. गुन्हे दाखल करण्यात आलेल्यांमध्ये तळवलकर्स फिटनेसचे गिरीश मधुकर तळवलकर, प्रशांत सुधाकर तळवलकर, मधुकर विष्णू तळवलकर, विनायक गवांदे, अनंत गवांदे, हर्ष भाटकर, दिनेश राव आणि गिरीश नायक यांचा समावेश आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे कारण पुढे करत या तळवलकर्स फिटनेसने याबाबत अधिक प्रतिक्रिया देण्यास नकार दिला आहे. मात्र आम्हीच याप्रकरणी दीड वर्षांपासून सखोल चौकशी व्हावी अशी मागणी करत असल्याचे सांगितले. १९३२ साली स्थापन झालेल्या या व्यायामशाळेचे ८० शहरांमध्ये १५२ हेल्थक्लब आणि २ लाखांहून अधिक सभासद आहेत.

## ब्रिटनचे खासदार डेव्हिड अमिस यांची चर्चमध्ये चाकूने हत्या

**लंडन -** ब्रिटनचे पंतप्रधान बोरीस जॉन्सन यांच्या कंझर्व्हेटिव्ह पार्टीचे खासदार डेव्हिड अमिस (६९) यांची चर्चमध्ये चाकूने भोसकून हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. जिल्ह्यात सुरु असलेल्या निवडणुकीसंदर्भात मतदारांसोबत चर्चा करताना ही घटना घडली. यातील हल्लेखोराला पोलिसांनी पकडले आहे. लंडनच्या पूर्वभागातील सीसाईड टाऊन येथील मेथोडिस्ट चर्चमध्ये शुक्रवारी खासदार डेव्हिड अमिस आपल्या मतदारसंघातील मतदारांसोबत चर्चा करत होते. त्यावेळी एका माथेफिरूने त्यांच्यावर चाकूहल्ला चढवला. त्यात त्याने त्यांना चार-पाच वेळा भोसकले. यात जबर जखमी झालेल्या खासदारांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु तेथे उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. यातील हल्लेखोराला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. यापूर्वी २०१६ मध्ये लेबर पार्टीचे खासदार जो कॉक्स यांचीही चाकूने भोसकून हत्या झाली होती.

## वातावरणातील बदलामुळे शिर्डीतील विमानसेवा गेल्या चार दिवसापासून बंद

■ शिर्डी

**गेल्या** चार दिवसापासून वातावरणात बदल झाल्याने कमी दृष्यमानतेमुळे साईबाबा आंतरराष्ट्रीय विमानतळावरील विमानसेवा बंद आहे. १३ ऑक्टोंबर रोजी चेन्नईहून येणारे विमान कमी दृष्यमानतेमुळे मुंबई विमानतळावर उतरावे लागले होते.

त्यानंतर १४ व १५ ऑक्टोबर या दोन्ही दिवशी कमी दृश्यमानतेमुळे चेन्नई दिल्ली दोन्ही ठिकाणावरून येणारी विमाने रद्द करण्यात आली. शिर्डी विमानतळावर धावपट्टी चे काम पूर्ण झाले आहे. अद्याप नाईट लँडिंग बाबतीत काही कामे अपूर्ण असल्यामुळे शिर्डी विमानतळाला कमी दृष्यमानतेचा फटका बसत




आहे.१४ तारखेपासून सुरू झालेला साईबाबांचा पुण्यतिथी उत्सव १७ तारखेपर्यंत चालणार असून या चार दिवसांच्या पुण्यतिथी उत्सव काळातच विमानसेवा बंद असल्याने देश विदेशातून येणाऱ्या भाविकांचा हिरमोड झाल्याचे दिसून येत आहे.

## राज कुंद्रा आणि शिल्पा शेट्टीने मानसिक छळ केल्याची शर्लिन चोप्राची तक्रार

■ मुंबई

**पोर्नोग्राफी** प्रकरणी बॉलिवूड अभिनेत्री शिल्पा शेट्टीचा पती राज कुंद्रा याला अटक करण्यात आली होती. दोन महिन्यानंतर



त्याची तुरूंगातून जामिनावर सुटका झाली. पॉर्नोग्राफी प्रकरणात राज कुंद्राचे नाव समोर आल्यानंतर शर्लिनने सोशल मीडियावर अनेक पोस्ट शेअर केल्या आणि राजवर या रॅकेटमध्ये सामील असल्याचा आरोप केला. आता शर्लिनने राज कुंद्रा आणि शिल्पा शेट्टी यांच्याविरोधात फसवणूक आणि मानसिक छळ केल्याची तक्रार दाखल केली आहे.

तिने पत्रकारांशी बोलताना सांगितले की १४ ऑक्टोबर रोजी 'मी राज कुंद्राविरोधात लैंगिक छळ, फसवणूक व धमक्या दिल्याची तक्रार केली आहे. त्याने अंडरवर्ल्डची धमकी दिली. ते कलाकाराच्या घरी जातात आणि त्याला अंडरवर्ल्डची धमकी देतात. ते म्हणतात लैंगिक अत्याचाराचे प्रकरण मागे घ्या अन्यथा तुमचे आयुष्य उद्ध्वस्त होईल. त्यांनी मला धमकावले आणि अनेक धमक्या दिल्या. मी एकटी महिला आहे. मला एकटे राहण्याची भीती वाटते. आज मी हिमतीने पुन्हा समोर आले. शर्लिन चोप्राने आरोप केला की, २७ मार्च, २०१९ रोजी राज कुंद्रा रात्री उशिरा तिच्या घरी आला आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

## महात्मा फुले कोण हेच कलामांना माहित नव्हते

■ पुणे

**देशाचे** दिवंगत माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांचा जन्मदिन १५ ऑक्टोबर वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. त्यांचा वाचनाचा प्रचंड मोठा व्यासंग होता म्हणून हा दिवस पाळला जातो का? कारण कलाम यांना महात्मा फुले कोण होते हे माहीत नव्हते, मग त्यांचा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून कसा काय साजरा केला जाऊ शकतो असा सवाल विचारवंत, अभ्यासक प्रा. हरी नरके यांनी उपस्थित केला आहे. नरके यांनी याबाबत समाजमाध्यमावर पोस्ट शेअर केली आहे.

कलाम यांना वाचनाचा मोठा व्यासंग होता म्हणून हा दिवस पाळला जातो का? तसे निदान माझ्या वाचनात तरी आलेले नाही. ते थोर शास्त्रज्ञ होते असे सांगितले जाते. पण त्यांनी नेमके कोणते शोध लावले असे मी बऱ्याच लोकांना विचारले. पण एकालाही उत्तर देता आले

**प्रा. हरी नरकेंची टीका**



नाही. ते एक इंजिनियर (तंत्रज्ञ) होते. संसदेच्या प्रांगणात महात्मा जोतीराव फुले यांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण होणार होते. तेव्हा कलाम राष्ट्रपती असल्याने त्यांच्या हस्ते ते व्हावे म्हणून आम्ही त्यांना निमंत्रण दिले. कोण महात्मा फुले? असे विचारून त्यांनी यायला थेट नकार दिला. त्यादिवशी मला कलाम यांच्या थोर वाचनाचा पुरावा मिळाला,'' असे नरके यांनी म्हटले आहे. आपल्या पोस्टमध्ये हरी नरके यांनी म्हटले आहे की, आजकाल वाचन कमी होत असल्याची वारंवार ओरड केली जाते. पुस्तक पेठेचा अनुभव मात्र तसा नाही. मुळात अशी ओरड करणारेच वाचत नसल्याने अशी ओरड करून ते आपली स्वतःची अपराध गंडातून सुटका करून घेत असतात का? किंवा मी एकटाच वाचतो, बाकीचे वाचत नाहीत असे ढोल वाजवण्याचा हा कार्यक्रम असतो का? १८९० सालचा गो ग आगरकर यांचा एक अग्रलेख आहे. त्यात ते म्हणतात, देशाची एकूण साक्षरता अवघी ५ टक्के असून शिकलेल्यातले ९५ टक्के लोक काहीही वाचत नाहीत.

# छोट्या जाहिराती

संपर्क करा
मोबा.८१०८११६४२३

## पाहिजेत

आयुर्वेदिक कंपनीला महिला/मुली/पुरुष/मुले पाहिजेत. पगार १२००० ते १५००० शिक्षणाची, वयाची अट नाही. **9619688867** {NC210742}

घरकामासाठी 12/24 तास बायका / मुली / बेबी / पेशंटकेअर / जापा / रेस्टॉरंटसाठी कुक (इंडियन, चायनीज, तंदूर) पाहिजेत. 'कुमारसर' दादर **9326923568** अंधेरी **8928055048 / 9076326174** {NCC211066}

गिरगाव गायवाडी मुंबईमध्ये गॅरेजमध्ये काम करण्यासाठी मॅकेनिक / हेल्पर आणि शासकिय वाहन दुरुस्तीचे कलेक्शन करण्यासाठी मुलगा / मुलगी पाहिजेत. **9869450186 / 9930131171** {NC210753}

PVT. LTD. कंपनीत मुले-मुलींची अर्जंट भर्ती कमवा. 13,500 - 35,000/- राहणे फ्री + बोनस अंधेरी (West), **9967362303** {NCC211161}

सिक्युरिटी गार्ड / सुपरवायझर (MALE) 8-12 तास. पगार 16000-26000 **7738687772** {NCC211183}

घरी बसून लिखाण काम 7 दिवसांचा पगार 15000/- : - साक्षी **8591555848** {NC210740}

असिस्टंट लेथ मशीन ऑपरेटर पाहिजे. माटुंगा वेस्ट मुंबई. **9320177991 / 9223309898** {NC210763}

१०वी/१२वी मुले/मुली अनुभवी बिनअनुभवी ऑफिस असिस्टंट / रिसेप्शन / बॉडीगार्ड / शिपाई ताबडतोब पाहिजे. संपर्क - **7400033308** {NC210766}

**कल्याण / उल्हासनगर येथील बांधकाम कंपनीला अनुभवी साइट सुपरवायझर/ऑफिससाठी अनुभवी मुलगी पाहिजे. संपर्क - 9323639030.** {NC210777}

मीरारोड मध्ये डॉक्युमेंट कलेक्शन फील्डवर्कसाठी मुले पाहिजेत. पार्ट / फुलटाइम - **8850317504** {NC210771}

भायखळा स्थित एका कंपनीला हमालाची आवश्यकता आहे. वजन उचलू शकणारे हमाल पाहिजेत. भेटा - अली ॲण्ड हसन एक्सपोर्टस, गाळा नंबर ११/१२ गुलोरिया कॉन्व्हेंट गर्ल्स हायस्कुल कंपाऊंड संतसावता मार्ग, भायखळा (पूर्व) स्टेशनजवळ, Mobile : **8591568889** {NC210772}

कंपनीला परमनन्ट मुले-मुलींची भर्ती 18000/ - - 35000/- राहणे जेवण **8097795145** {NCC211218}

## Situation Vacant

Recognized Firm invites Housewives/Banker's/ Retired persons/ Teacher's/ Students/ for marketing on commission basis. call: **8451082876** {NC210769}

Wanted Marketing-cum-Office Managers, fresh or Experienced for Company at Mahim. Candidates with Computer typing, Email knowledge & English speaking can WhatsApp resume at **7400009978/ 9820737692** or mail at rajendra.art@gmail.com {NC210770}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७ वी नापास? डायरेक्ट १०वी. ११ वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली : **9820627580 / 9820904646** {NCC211181}

## नर्सिंग कोर्स

100% नोकरी देणारे गव्हर्मेंट सर्टिफाईड GNM / ANM NURSING ASSISTANT, DMLT, OT, ICU, XRAY. DIALYSIS, OPTOMETRY, PHYSIOTHERAPY ''ओमइन्स्टिट्युट'' **8080502190 / 9820258768 / 7666617771** {NCC210347}

## कर्ज विषयक

दिवाळी स्पेशल सर्व प्रकारची कर्जे बिजनेस/पर्सनल/ हाऊसिंग लोन, कमी कागदपत्रे, कमी वेळेत त्वरित मिळतील. **7715968829** {NC210737}

## व्यवसाय विषयक

सीएफएल/एलईडी बल्ब जोडणीचे काम करून १ लाखापर्यंत उत्पन्न मिळवा. - **8788254775, 9422850593** {NCC210686}

नवतरुणी तरुणांनो जॉब देणारे व्हा विविध वनऔषधी अग्रो इंडस्ट्रीत या. सिनियर सिटीजनानो प्रॉपर्टी घ्या सोबत पैसा दरमहिना मिळविण्यासाठी **8097641182 / 8999544225.** {NCC211206}

वृत्तपत्र 30 प्रति किलो आम्ही विकत घेऊ. वर्धमान गिफ्ट, एफ-14, मोक्षप्लाझा, बोरीवली (वेस्ट). {NCC211214}

## जागा विषयक

बिल्डर रिसेल प्रॉपर्टी शेरिंग १००% लोन उपलब्ध एजन्ट वेलकम -**7715096161** {NC210714}

## व्यसनमुक्ती

दारू सोडवा तंबाखू गुटखा सिगरेट औषधे उपलब्ध डॉ नागरगोजे मो **9765609769** {NCC211128}

## वधू-वर सूचक

वनिता वधूवर सुचक मंडळ सर्वजातीय स्थळांसाठी नोंदणी सुरू दहिसर पूर्व **7045237552.** {NC210707}

## ज्योतिष विषयक

जोशी काका - धार्मिक पूजापाठ - हवन जन्मपत्रिका - लग्नयोग भेटा. संपर्क - **9967239033** {NCC211124}

''साईगणेश ज्योतिष मंगलपूजा सर्वप्रकारचे पूजापाठ कुंडली बनवून मिळतील. **7400240996** (भाईंदर) {NCC211212}

सागर ज्योतिष मराठी जन्मकुंडली स्पेशलिस्ट गुण- मिलन, पुजापाठ कुंडली रु. 151/- 201/- जुईनगर (नवीमुंबई) **9870126299** {NCC211149}

**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.

**मॅनेजर, 'नवाकाळ'**


# ताज हॉटेलची कथा

**काही** ब्रॅण्ड स्वप्न असतात. केवळ ब्रॅण्डकर्त्यांचं नाही तर वापरकर्त्यांचंही. अमुक ब्रॅण्ड एकदा तरी वापरता यावा यासाठी काही जण प्रयत्नशील असतात; पण ब्रॅण्डनेम इतकं मोठं, की त्यातले केवळ मोजकेच यशस्वी होतात. भारतीय हॉटेल समूहातील असा स्वप्नवत ब्रॅण्ड म्हणजे ताज. जे कामानिमित्त वा स्वखर्चाने इथे वारंवार, क्वचित किंवा अगदी एकदा जातात त्या सर्वासकट जे कधीच इथे जाऊ शकलेले नाहीत त्या सर्वानाच या ताजचं आकर्षण आहे. टाटा ग्रुपचे संस्थापक जमशेटजी टाटा यांनी इंडियन हॉटेल कंपनीची (आयएचसीएल) स्थापना १८९९ मध्ये केली. त्यादरम्यान भारतात पाश्चिमात्य धर्तीवर पंचतारांकित हॉटेल उभारण्याचा त्यांचा मानस होता. यामागे अनेक दंतकथा सांगितल्या जातात. त्यातील एक अशी की, मुंबईत त्या वेळी अनेक अशी हॉटेल्स होती जी फक्त युरोपीयन मंडळींसाठी मर्यादित असत. त्यापैकी एक असलेल्या वॅटसन हॉटेलमध्ये जमशेटजींना भारतीय असल्याने वंशभेदाचा अनुभव आला. त्यामुळे स्वदेशी पंचतारांकित हॉटेलची कल्पना त्यांनी प्रत्यक्षात आणायचं ठरवलं. काहींच्या म्हणण्यानुसार टाटांच्या काही मित्रमंडळींनी मुंबईतील तत्कालीन हॉटेलविषयी तीव्र नापसंती व्यक्त केली होती. त्यामुळे त्यांनी ताजच्या उभारणीचा निश्चय केला. या कहाण्यांपेक्षा लोवाट फ्रेझर या टाटा समूहाशी जवळचे संबंध असणाऱ्या जमशेटजीच्या मित्राचं कथन अधिक पटतं. त्यांच्या मते ही संकल्पना जमशेटजींच्या मनात अनेक वर्ष घोळत होती. त्यावर त्यांनी अभ्यासही केला होता. मालकी हक्क वा उत्पन्नाच्या साधनापेक्षा पर्यटनदृष्ट्या लोकांनी भारत पाहायला यावं, मुंबईच्या सौंदर्यात भर घालेल अशी आलिशान वास्तू निर्माण व्हावी, हा उद्देश जमशेटजींच्या मनात होता. १६ ऑक्टोबर १९०३ रोजी अरबी समुद्राच्या साक्षीने



पहिले हॉटेल ताज मुंबापुरीत उभे राहिले. स्वत: जमशेटजींनी लंडन, पॅरिस, बर्लिन, डुसेलडॉर्फ इथून सामान, फर्निचर, अंतर्गत सजावटीच्या कलात्मक वस्तू आणवल्या. हॉटेल ताज मुंबापुरीचा सरताज ठरलं. तेव्हापासून ताज हॉटेलची साखळी भारतभर पसरत गेली.

भारतातील पहिलं आंतरराष्ट्रीय बीच रिसॉर्ट गोवा फोर्ट अग्वादा इथं सुरू केलं, ते १९७४ मध्ये ताज हॉटेल समूहानेच. हिप्पी पर्यटकांसाठी ओळखल्या जाणाऱ्या गोव्याचे परदेशी पर्यटकांसाठी आदर्श ठिकाण असे रूपांतर होण्यात या हॉटेल समूहाचा वाटा मोठा आहे. त्यानंतर याच समूहाने अनेक राजवाडे हॉटेलमध्ये रूपांतरित केले. उदयपूर लेक पॅलेस त्यातील पहिला राजवाडा ठरला. भारतीय संस्कृतीला आंतरराष्ट्रीय मान्यतांचा पंचतारांकित साज चढवत ताज हॉटेल समूहाने एकेक शिखर सर केलं.

भारतीय राष्ट्रीय उद्यानातील ताज सफारी असो, ताज विवांता, ताज एक्झॉटिका या साऱ्या हॉटेल्सनी देशीपरदेशी मंडळींना पंचतारांकित अनुभव देण्यात कोणतीही कसर ठेवली नाही. आज या समूहाच्या हॉटेल्सनी शंभरी गाठली आहे. त्यातील ८४ हॉटेल्स भारतभरात सेवा देतात, तर अमेरिका, लंडन, दक्षिण आफ्रिका, मालदीव, नेपाळ अशा विविध १६ देशांत ताज हॉटेलने आपला झेंडा रोवला आहे. २०१० मध्ये ताज हॉटेल कर्मचारी संख्या १३,००० इतकी होती. २००८ च्या अतिरेकी हल्ल्याने मुंबईसोबत सारं जग हादरलं; पण हॉटेल ताजवरील हल्ला काळजावर ओरखडा उमटवणारा होता. अतिरेक्यांनी या वास्तूची निवडच भारतीयांच्या गौरवावर घाला घालण्यासाठी केली होती. २०१० मध्ये या हल्ल्याच्या खुणा तशाच जपत पूर्वीच्या तोऱ्याने ताज पुन्हा उभे राहिले तेव्हा प्रत्येक मुंबईकर, प्रत्येक भारतीय भरून पावला. या ब्रॅण्डची गंमत हीच की, त्याचा अनुभव घेणारे फार कमी; पण अनुभव न घेताही या ब्रॅण्डकडे आशेने, कुतूहलाने, अभिमानाने, मीसुद्धा एकदा इथे पोहोचेन या निश्चयाने पाहणारे जास्त. भारतीयांसाठी हा हॉटेल ब्रॅण्ड सोनेरी दुनियेसारखा आहे.

**संजीव वेलणकर, पुणे**

# जयवंत शुगर्स साखर कारखान्याच्या चालू ११ व्या गळीत हंगामाला प्रारंभ

**कराड, प्रतिनिधी-** धावरवाडी, ता.कराड येथील जयवंत शुगर्स साखर कारखान्याच्या चालू सन २०२१-२२ च्या ११ व्या गळीत हंगामाला उत्साहात प्रारंभ झाला. जयवंत शुगर्सचे संस्थापक तथा येथील कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. सुरेश भोसले व त्यांच्या सुविद्य पत्नी उत्तरा भोसले यांच्याहस्ते गव्हाणीत ऊसाची मोळी टाकून गळीत हंगामाचा प्रारंभ करण्यात आला. या हंगामात कारखान्याने ७ लाख मेट्रीक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याचे सांगण्यात आले. याप्रसंगी पृथ्वीराज भोसले, विनायक भोसले जयवंत शुगर्सचे चेअरमन चंद्रकांत देसाई, प्रेसिडेंट सी.एन.देशपांडे, जनरल मॅनेजर एन.एम.बंडगर यांच्यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना डॉ.सुरेश भोसले म्हणाले की, गेल्या हंगामात जयवंत शुगर्सने अतिशय चांगली कामगिरी करून शेतकऱ्यांचे हित साधले आहे.या हंगामात कारखान्याने ७ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवले असून अधिकारी आणि कामगारांच्या कृतिशील प्रयत्नातून हे उद्दिष्ट नक्कीच गाठले जाईल.उच्चांकी दराची परंपरा जयवंत शुगर्सने कायम जपली असून गेल्या हंगामातील ऊसबिलाचा ३०० रुपयांचा अंतिम हफ्ता शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग केल्यामुळे गेल्या हंगामातील ३०५० रुपये इतकी संपूर्ण एफ.आर.पी.रक्कम कारखान्याने अदा करून शेतकऱ्यांचे हित साधले आहे.

# राज्यात १५५३ नव्या कोरोना बाधितांची नोंद

■ मुंबई

**कोरोनाबाधितांच्या** दैनंदिन रुग्णसंख्येत घट पाहायला मिळत आहे. राज्यात आज १५५३ नवीन कोरोनाबाधित रुग्णांची नोंद झाली आहे. तर १ हजार ६८२ रुग्ण कोरोनामुक्त झाले आहे. राज्यात आतापर्यंत ६४ लाख १६ हजार ९९८ रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे. त्यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९७.३८ टक्के आहे.

राज्यात आज २६ रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. राज्याचा मृत्यूदर २.१२ टक्के झाला आहे. पुणे जिल्ह्यात सध्या सर्वात जास्त ८, ०८९ ॲक्टिव्ह रुग्ण आहेत. जळगाव (१२), नंदूरबार (१), धुळे (७), जालना (६९), परभणी (४७), हिंगोली (१९), नांदेड (१४), अकोला (२५), अमरावती (१०), वाशिम (०५), अकोला (२५), बुलढाणा (१५), नागपूर (६९), यवतमाळ (०९), वर्धा (४), भंडारा (२), गोंदिया (३), गडचिरोली (१५ ) या जिल्ह्यात ॲक्टिव्ह रुग्णसंख्या १०० च्या खाली आहे. मुंबईत गेल्या २४ तासात ३३३ कोरोनाबाधित रुग्णांची नोंद झाली आहे. तर ५२६ रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे. मुंबईत आतापर्यंत ७,२६,५६६ रुग्ण कोरोनामुक्त झाले आहेत. मुंबईचा रिकव्हरी रेट ९७ टक्के झाला आहे. तर मुंबईत गेल्या २४ तासात तीन रुग्णाचा मृत्यू झाला आहे.

सध्या मुंबईत ५१८३ सक्रिय रुग्ण आहेत. तर रुग्ण दुपटीचा दर ११४१दिवसांवर गेला आहे. राज्यात सध्या २९ हजार ६२७ रुग्णांवर उपचार सुरु आहेत. सध्या राज्यात २,३४,८०७व्यक्ती होम क्वॉरंटाईनमध्ये आहेत तर १,०२७ व्यक्ती संस्थात्मक क्वारंटाईनमध्ये आहेत.

# तीन केसेसमध्ये फ्लेचर पटेलच पंचच का? लेडी डॉन कोण? मलिक यांचा एनसीबीला सवाल

पान १ वरून

यांचं नाव आहे.

याचा अर्थ स्वतंत्र पंच यांच्या कुटुंबातील सदस्य आहेत. ही कारवाई ठरवून केली असल्याचं हे यातून स्पष्ट होत आहे. कोर्टाने अनेकदा स्वतंत्र पंच अनेक केसमध्ये असल्यास यात तथ्य नाही असा निष्कर्ष काढला आहे. याचा अर्थ एनसीबीच्या माध्यमातून फर्जीवाडा सुरु आहे. फ्लेचर पटेल यांच्यासोबत समीर वानखेडे यांचे फोटो काय सांगतात ? छापेमारीच्या कारवायांमध्ये कौटुंबिक मित्रालाच पंच केलं का? पंच म्हणुन जवळची लोक आहेत, या कारवाई मग ठरवून केल्या गेल्या का? फ्लेचर पटेल त्यांच्यासोबत कुठे-कुठे जातो? मुंबईत कसलं रॅकेट सुरू आहे? फ्लेचर पटेल लेडी डॉनच्या सोबत फिल्म इंडस्ट्रीत काय दहशत निर्माण करुन पैसे उकळण्याचे काम करत आहेत का असा प्रश्न उपस्थित होत आहे. एनसीबीने पत्रकार परिषद घेऊन यावर खुलासा करावा. फ्लेचर पटेल ज्या महिलेसोबत आहे ती एका पक्षाच्या चित्रपट सेनेची कार्यकर्ता आहे. ती वकील सुद्धा आहे. फिल्म इंडस्ट्रीतील बरेच लोक तिच्या कार्यालयात हजेरी लावत आहेत. वानखेडे हे फिल्म इंडस्ट्रीला टार्गेट करत आहेत. जेव्हा माहिती मिळेल तेव्हा या संदर्भातीलही पर्दाफाश करेल.

**मी माजी सैनिक**
**फ्लेचर पटेलचा खुलासा**

नवाब मलिक यांची पत्रकार परिषदेनंतर फ्लेचर पटेल मिडिया समोर आले त्यांनी सांगितले की, मी माजी सैनिक असून मी कुणाला घाबरत नाही मी देशासाठी काम करत राहणार. समीर वानखेडे यांना फक्त मीच नाही तर पूर्ण देश ओळखतो. फोटोमध्ये लेडी डॉन म्हणून आहेत. त्या मोठ्या सामाजिक कार्यकर्त्या आहेत. म्हणून आदराने त्यांना लेडी डॉन असं मी म्हणतो. त्यांनी कोविड काळात महत्वाचं काम केलंय. त्या समीर वानखेडेंच्या थोरल्या बहीण ॲड. यास्मिन वानखेडे आहेत. समीर वानखेडे, एनसीबीची दहशत गुन्हेगारांच्या मनात असलीच पाहिजे. सैनिक फेड रेशन तर्फे कारगिल विजय दिवस कार्यक्रमानिमित्य समीर वानखेडे यांना आमंत्रित की होते. वानखेडे ड्रग्ज मुक्त भारत करण्यासाठी धडपड करत आहेत. त्यांना आमचा पाठिंबा आहे. मलिक यांनी चांगल्या कारवाईसाठी पाठिंबा दिला पाहिजे. मलिक यांनी पंचांची नावे फोडून त्यांच्या जीवाला धोका निर्माण केलाआहे. मला माझ्या जीवाची भीती नाही. १७ हजार कोटी रुपयांचे ड्रग्ज पकडले गेले आहे. हेच ड्रग्ज आपल्या घराघरात पोचले असते. मी कुणाला घाबरत नाही. मी देशासाठी काम करत राहणार, असंही फ्लेचर पटेल यांनी म्हटले आहे.

# बायडेन व अमेरिकी कंपन्यांकडून भारताच्या आर्थिक सुधारणांचे कौतुक

■ नवी दिल्ली

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण**

**अमेरिकेचे** राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांच्या प्रशासनासोबतच अमेरिकेच्या कॉर्पोरेट क्षेत्रातील दिग्गजांनी भारत सरकारच्या सुधारणांचे सकारात्मक वर्णन केल्याची महिती अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी दिली आहे. भारत सरकारने रेट्रोस्पेक्टिव टॅक्स माफ केल्यानंतर अमेरिकी कंपन्यांनी त्याचे स्वागत केल्याचे अर्थमंत्री म्हणाल्या. अर्थमंत्री निर्मला सीतारामण अमेरिकेत पार पडणाऱ्या राष्ट्रीय नाणेनिधी संघ आणि जागतिक बँकेच्या परिषदेला उपस्थित आहेत. यावेळी अर्थसचिव आणि अन्य तज्ञ देखील सहभागी होते. जगभरातील महत्वाच्या देशांची आर्थिक स्थिती आणि त्यामुळे अन्य देशांना बसलेला फटका यासंदर्भात अमेरिकेत विचारमंथन सुरू आहे. या परिषदेला सीतारामण यांनी उपस्थिती लावत भारतीय अर्थव्यवस्थेसंदर्भात माहिती दिली. विशेषत: अमेरिकी कंपन्या भारत सरकारने रेट्रोस्पेक्टिव कर रद्द करण्याच्या निर्णयामुळे खूप आनंदी आहेत, असे त्या म्हणाल्या. आम्ही केलेल्या सुधारणा आणि विशेषत: अतिरिक्त कर रद्द करण्याचा निर्णय यामुळे अमेरिकन प्रशासनाने हे अतिशय सकारात्मक पाऊल असल्याचं म्हटलं. कॉर्पोरेट जगतातील लोकांनीही या निर्णयाचे कौतुक केले आहे. दीर्घकालीन सुधारणांसाठी भारत सरकारची वचनबद्धता देखील व्यक्त केली. अमेरिकेसोबतच्या व्यापार करारावरील प्रश्नाला उत्तर देताना सीतारामण यांनी मी गुंतवणूक प्रोत्साहन करारासंदर्भात माहिती दिली. यासाठी आमच्याकडे डिसेंबरपर्यंतचा कालावधी आहे. आम्ही यावर संभाषण केले आहे. दोन्ही देशांना यावर संवाद पुढे नेण्याची इच्छा आहे आणि ते लवकरात लवकर पूर्ण करायचे आहे, असेही त्या म्हणाल्या.

# केरळमध्ये अतिवृष्टीचा इशारा पाच जिल्ह्यांमध्ये रेड अलर्ट



■ तिरुअनंतपुरम

**केरळ** किनारपट्टीवरील दक्षिण -पूर्व अरबी समुद्रावरील कमी दाबाच्या क्षेत्राच्या प्रभावामुळे,उद्या पहाटेपर्यंत राज्याच्या पाच जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे.१८ ऑक्टोबर रोजी विविध भागात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे आणि १९ ऑक्टोबरच्या सकाळी पाऊस कमी होण्याची शक्यता आहे. हवामान खात्याकडून केरळच्या पाच जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अतिवृष्टी शक्यता व्यक्त केली असून या जिल्ह्यामध्ये रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर सात जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

केरळच्या पठाणमथिट्टा, कोट्टायम, एर्नाकुलम, इडुक्की आणि त्रिशूरया पाच जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. हवामान कार्यालयाने सात जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला असून या जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी, गडगडाट आणि विजांचा इशारा जारी करण्यात आला आहे. या काळात जनतेने अत्यंत सावधगिरी बाळगण्याचे आणि पर्वत किंवा नद्याजवळ प्रवास टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# गोरेगावमधील मोतीलाल नगरच्या पुनर्विकासाचे म्हाडाने टेंडर काढले

पान ८ वरून

प्रति गाळा ९८७ चौरस फुटांचे बांधकाम क्षेत्रफळ मंजूर करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यानुसार मोतीलाल नगरच्या पुनर्विकासासाठी म्हाडाने निविदा काढली आहे. ती भरताना संबंधित कंपनीला सोबत ५० कोटींचा डिमांड ड्राफ्ट हमी म्हणून सोबत जोडावा लागणार आहे.

निविदा सूचनेनुसार नियुक्त केलेल्या कंत्राटदाराला मोतीलाल नगर एक ते तीनमधील घरे, झोपडपट्टी, विकास आराखड्यानुसार आरक्षणे, म्हाडाचा हिस्सा अशी विविध कामे ८४ महिन्यांच्या आत पूर्ण करावी लागणार आहेत. २८ ऑक्टोंबर २०२१ रोजी सकाळी ११ पासून या पुनर्विकासासाठी खासगी कंपन्यांना टेंडर भारता येतील. १३ डिसेंबर २०२१ ला दुपारी १ पर्यंत अंतिम मुदत आहे. या निविदा प्रक्रियेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या कंपन्यांसाठी १५ नोव्हेंबर २०२१ रोजी निविदा पूर्व बैठक म्हाडामध्ये सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली आहे. १४ डिसेंबरला निविदा उघडण्यात येणार आहेत.

# प्रसिध्दीसाठी स्टंट! मांडवियांनी माफी मागावी

**नवी दिल्ली-** केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मांडविया यांनी माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या तब्येतीची एम्समध्ये जाऊन चौकशी केली. मात्र, यावेळी मांडविया यांनी मनमोहन सिंग यांच्या कुटुंबीयांच्या परवानगीशिवायच रुग्णालयाच्या वार्डमध्ये फोटो काढल्याने काँग्रेससह सिंग यांच्या मुलीने त्यांना चांगलेच सुनावले आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते रणदीप सुरजेवाला याबाबत ट्विट करत भाजपासाठी प्रत्येक गोष्ट फोटोसाठीची संधी असल्याचा आरोप केला. तसेच मांडविया यांचे हे कृत्य एक घाणेरडा प्रसिद्धीचा स्टंट आहे. भाजपासाठी प्रत्येक गोष्ट फोटोसाठीची संधी आहे. आरोग्य मंत्र्यांनी एम्समध्ये मनमोहन सिंग यांना भेटताना घाणेरडा प्रसिद्धीसाठीचा स्टंट केला. त्यांचा निषेध. त्यांची ही कृती नैतिकतेला नकार देणारी, प्रस्थापित परंपरांचा अपमान आहे. यात मुलभूत सभ्येतेचा अभाव आहे. त्यांनी तात्काळ माफी मागावी.


महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र दसरा भव्यतम सोडत

तिकिट किं. रु. 100/- • सोडत क्रमांक 02 • सोडत दिनांक 16/10/2021

| मालिका | DB-01 | DB-02 | DB-03 | DB-04 | DB-05 | DB-06 | DB-07 | DB-08 | DB-09 | DB-10 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पहिले सामाईक बक्षिस रु. 25 लाख | - | 3657 | श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई प्रिन्स एजन्सी - मुंबई यांचा मार्फत | | | | | | | |
| दुसरे बक्षिस रु. 2 लाख | - | - | - | 4301 | श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई प्रिन्स एजन्सी - मुंबई यांचा मार्फत | | | | | - |
| तिसरे बक्षिस रु. 10000/- | 5901 लकी लॉटरी, अहमदनगर | 3543 श्री सिद्धि समर्थ एजेंसी दादर-मुंबई | 1917 भारत ब्रधर्स, नागपूर | 6673 जय जलाराम लॉटरीज् गोरेगाव | 0666 बालाजी मार्केटिंग, नागपूर | 4712 किशोर लॉटरी सेंटर, सांगली | 8618 श्री सिद्धि समर्थ एजेंसी दादर-मुंबई | 0631 महालक्ष्मी ऑनलाईन एजन्सी - नंदुरबार | 0129 श्री सिद्धि समर्थ एजेंसी दादर-मुंबई | 3844 प्रिन्स लॉटरी सेंटर ॲंड जनरल स्टोअर्स, कल्याण |
| चौथे बक्षिस रु. 5000/- | 6056 | 7491 | 7686 | 5296 | 1639 | 6278 | 6362 | 1403 | 0365 | 5632 |
| सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी | | | | | | | | | | |
| पाचवे बक्षिस रु. 2000/- | 0441 | 1094 | 1437 | 1642 | 2288 | 3766 | 3886 | 5358 | 7805 | 8265 |
| सहावे बक्षिस रु. 1000/- | 0538 | 0584 | 0684 | 2054 | 4532 | 5748 | 6263 | 6515 | 7043 | 7741 |
| सातवे बक्षिस रु. 500/- | 1752 | 3078 | 3652 | 3673 | 5939 | 6396 | 7246 | 7621 | 8029 | 8536 |

आठवे बक्षिस रु. 200/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0003 | 0848 | 1474 | 2069 | 2905 | 3459 | 4254 | 4913 | 5676 | 6436 | 7002 | 7771 | 8562 | 9298 |
| 0034 | 0852 | 1494 | 2101 | 2908 | 3501 | 4255 | 4918 | 5701 | 6439 | 7029 | 7776 | 8578 | 9300 |
| 0054 | 0866 | 1499 | 2106 | 2909 | 3523 | 4259 | 4936 | 5720 | 6461 | 7090 | 7788 | 8590 | 9302 |
| 0057 | 0880 | 1505 | 2107 | 2916 | 3538 | 4260 | 4938 | 5733 | 6470 | 7110 | 7795 | 8638 | 9312 |
| 0061 | 0884 | 1509 | 2113 | 2922 | 3551 | 4261 | 4955 | 5745 | 6474 | 7112 | 7815 | 8644 | 9322 |
| 0088 | 0895 | 1520 | 2135 | 2930 | 3552 | 4263 | 4957 | 5767 | 6477 | 7129 | 7829 | 8653 | 9323 |
| 0097 | 0906 | 1545 | 2150 | 2941 | 3555 | 4297 | 4970 | 5791 | 6480 | 7151 | 7844 | 8656 | 9345 |
| 0119 | 0908 | 1552 | 2157 | 2946 | 3556 | 4300 | 4982 | 5795 | 6485 | 7152 | 7861 | 8659 | 9354 |
| 0129 | 0918 | 1575 | 2189 | 2960 | 3557 | 4306 | 5018 | 5813 | 6492 | 7220 | 7872 | 8680 | 9390 |
| 0144 | 0933 | 1591 | 2190 | 2966 | 3570 | 4315 | 5020 | 5853 | 6493 | 7246 | 7888 | 8685 | 9394 |
| 0164 | 0953 | 1598 | 2205 | 2996 | 3598 | 4316 | 5039 | 5860 | 6513 | 7248 | 7909 | 8701 | 9410 |
| 0167 | 0982 | 1605 | 2217 | 3007 | 3644 | 4326 | 5105 | 5883 | 6516 | 7261 | 7912 | 8707 | 9449 |
| 0175 | 1027 | 1607 | 2222 | 3008 | 3645 | 4344 | 5131 | 5898 | 6541 | 7283 | 7916 | 8709 | 9457 |
| 0178 | 1039 | 1641 | 2231 | 3048 | 3651 | 4382 | 5149 | 5900 | 6542 | 7290 | 7938 | 8722 | 9492 |
| 0258 | 1054 | 1644 | 2309 | 3052 | 3678 | 4391 | 5164 | 5921 | 6548 | 7299 | 7971 | 8724 | 9498 |
| 0260 | 1062 | 1650 | 2312 | 3069 | 3709 | 4400 | 5197 | 5928 | 6560 | 7301 | 7984 | 8727 | 9509 |
| 0267 | 1063 | 1657 | 2320 | 3076 | 3761 | 4408 | 5203 | 5940 | 6572 | 7302 | 8008 | 8728 | 9518 |
| 0296 | 1067 | 1658 | 2381 | 3082 | 3764 | 4416 | 5215 | 5964 | 6587 | 7358 | 8039 | 8735 | 9526 |
| 0297 | 1073 | 1677 | 2423 | 3088 | 3766 | 4418 | 5227 | 5979 | 6614 | 7384 | 8059 | 8736 | 9527 |
| 0307 | 1087 | 1679 | 2434 | 3096 | 3771 | 4438 | 5267 | 5988 | 6636 | 7405 | 8061 | 8756 | 9557 |
| 0330 | 1095 | 1694 | 2439 | 3100 | 3778 | 4441 | 5287 | 5994 | 6651 | 7413 | 8080 | 8768 | 9569 |
| 0344 | 1119 | 1750 | 2488 | 3101 | 3779 | 4498 | 5309 | 6021 | 6667 | 7439 | 8089 | 8776 | 9596 |
| 0355 | 1127 | 1759 | 2525 | 3107 | 3783 | 4507 | 5335 | 6030 | 6671 | 7445 | 8100 | 8786 | 9604 |
| 0381 | 1185 | 1766 | 2535 | 3148 | 3791 | 4527 | 5344 | 6031 | 6675 | 7447 | 8114 | 8796 | 9626 |
| 0382 | 1202 | 1771 | 2545 | 3173 | 3793 | 4555 | 5372 | 6069 | 6679 | 7457 | 8120 | 8807 | 9628 |
| 0388 | 1234 | 1772 | 2562 | 3174 | 3812 | 4560 | 5385 | 6072 | 6685 | 7460 | 8122 | 8849 | 9637 |
| 0393 | 1240 | 1774 | 2573 | 3206 | 3815 | 4598 | 5393 | 6074 | 6697 | 7467 | 8145 | 8854 | 9656 |
| 0424 | 1247 | 1783 | 2581 | 3212 | 3818 | 4628 | 5395 | 6076 | 6729 | 7481 | 8169 | 8892 | 9657 |
| 0452 | 1249 | 1814 | 2583 | 3227 | 3828 | 4637 | 5433 | 6084 | 6734 | 7484 | 8179 | 8914 | 9673 |
| 0457 | 1254 | 1815 | 2598 | 3234 | 3842 | 4649 | 5436 | 6094 | 6755 | 7503 | 8182 | 8926 | 9678 |
| 0504 | 1256 | 1840 | 2622 | 3240 | 3849 | 4663 | 5445 | 6118 | 6781 | 7506 | 8185 | 8968 | 9701 |
| 0528 | 1278 | 1844 | 2636 | 3245 | 3885 | 4690 | 5456 | 6141 | 6788 | 7527 | 8206 | 8978 | 9728 |
| 0542 | 1296 | 1845 | 2682 | 3247 | 3918 | 4701 | 5478 | 6144 | 6810 | 7531 | 8253 | 8984 | 9729 |
| 0566 | 1298 | 1880 | 2689 | 3248 | 3923 | 4729 | 5486 | 6152 | 6812 | 7557 | 8286 | 9051 | 9737 |
| 0572 | 1301 | 1916 | 2703 | 3270 | 3925 | 4746 | 5524 | 6158 | 6821 | 7559 | 8299 | 9055 | 9783 |
| 0576 | 1307 | 1932 | 2709 | 3271 | 3950 | 4751 | 5529 | 6206 | 6837 | 7591 | 8347 | 9058 | 9791 |
| 0631 | 1309 | 1941 | 2714 | 3279 | 3978 | 4755 | 5543 | 6215 | 6838 | 7599 | 8354 | 9085 | 9799 |
| 0648 | 1325 | 1956 | 2716 | 3284 | 3992 | 4762 | 5545 | 6220 | 6890 | 7616 | 8367 | 9097 | 9806 |
| 0655 | 1338 | 1966 | 2730 | 3303 | 3998 | 4783 | 5556 | 6221 | 6896 | 7642 | 8410 | 9126 | 9845 |
| 0666 | 1358 | 1970 | 2739 | 3324 | 4037 | 4795 | 5559 | 6240 | 6916 | 7657 | 8417 | 9148 | 9863 |
| 0682 | 1390 | 1981 | 2764 | 3333 | 4093 | 4817 | 5567 | 6262 | 6921 | 7660 | 8428 | 9149 | 9883 |
| 0693 | 1391 | 1983 | 2776 | 3351 | 4099 | 4822 | 5569 | 6301 | 6925 | 7665 | 8442 | 9162 | 9888 |
| 0696 | 1400 | 1987 | 2781 | 3362 | 4102 | 4827 | 5572 | 6325 | 6934 | 7668 | 8450 | 9180 | 9897 |
| 0707 | 1405 | 1994 | 2784 | 3374 | 4112 | 4842 | 5583 | 6327 | 6945 | 7683 | 8458 | 9221 | 9901 |
| 0791 | 1419 | 1998 | 2787 | 3380 | 4117 | 4854 | 5593 | 6346 | 6948 | 7702 | 8464 | 9224 | 9908 |
| 0799 | 1434 | 2019 | 2799 | 3386 | 4159 | 4856 | 5605 | 6390 | 6978 | 7713 | 8496 | 9230 | 9928 |
| 0812 | 1436 | 2024 | 2816 | 3394 | 4181 | 4865 | 5608 | 6392 | 6993 | 7726 | 8500 | 9234 | 9939 |
| 0814 | 1444 | 2044 | 2832 | 3437 | 4200 | 4874 | 5640 | 6403 | 6998 | 7737 | 8523 | 9261 | 9944 |
| 0820 | 1448 | 2048 | 2855 | 3445 | 4228 | 4904 | 5658 | 6416 | 6999 | 7750 | 8528 | 9273 | 9987 |
| 0841 | 1452 | 2057 | 2861 | 3446 | 4252 | 4905 | 5670 | 6421 | 7001 | 7753 | 8536 | 9284 | 9988 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र गजलक्ष्मी शनि वीकली लॉटरी

सोडत सायं. 4:45 वाजता

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 33 • तिकीट किं. रु.20/- • सोडत दिनांक 16/10/2021

प्रत्यक्ष सोडतीची तारीख : 19/06/2021
पहिले सामाईक बक्षिस रु.10000/- GL-07 : 1768

दुसरे बक्षिस रु. 1000/- सर्व मालिकांसाठी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 1000/- सर्व मालिकांसाठी | 1186 | 1691 | 2100 | 3003 |
| | 1291 | 1711 | 2113 | 3025 |
| 1017 | 1300 | 1713 | 2486 | 3186 |
| 1031 | 1413 | 1799 | 2668 | 3329 |
| 1106 | 1471 | 1908 | 2745 | 3362 |
| 1110 | 1477 | 1927 | 2767 | 3801 |
| 1185 | 1688 | 2027 | 2988 | 3853 |

जिंकले! जिंकले!! आजच्या सोडतीत रु.1000x5 = रु.5000 ची अंदाजित 23 बक्षिसे जिंकली

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

निकाल

## गणेशलक्ष्मी समृद्धी विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी

सोडत संध्या. 5:00

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 33 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 16/10/2021

| | | |
|---|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10000/- | जिंकले MG-07 : 6414 | श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई |
| | सर्व मालिकांसाठी • सर्व मालिकांसाठी | बक्षिस |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | जिंकले 1019 रु 5000 ची 5 बक्षिसे जिंकली | रु 5000 ची 5 बक्षिसे जिंकली भारत ब्रधर्स - नागपूर (5 बक्षिसे) |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | जिंकले 1523 रु 2000 ची 5 बक्षिसे जिंकली | रु 2000 ची 5 बक्षिसे जिंकली किशोर लॉटरी सेंटर, सांगली (5 बक्षिसे) |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | जिंकले 3672 रु 1000 ची 5 बक्षिसे जिंकली | रु 1000 ची 5 बक्षिसे जिंकली श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई (5 बक्षिसे) |

पाचवे बक्षिस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पाचवे बक्षिस रु. 400/- सर्व मालिकांसाठी | | 1818 | 2600 | 3357 | 3764 | 4998 | 5589 | 6174 |
| | | 2088 | 2720 | 3399 | 3832 | 5000 | 5593 | 6314 |
| | | 2288 | 2920 | 3520 | 3883 | 5019 | 5615 | 6317 |
| | 1334 | 2389 | 3041 | 3543 | 3958 | 5398 | 5658 | 6359 |
| 1013 | 1468 | 2390 | 3273 | 3545 | 4283 | 5483 | 5851 | 6670 |
| 1072 | 1469 | 2515 | 3289 | 3556 | 4578 | 5520 | 5885 | 6721 |
| 1088 | 1654 | 2557 | 3333 | 3635 | 4637 | 5552 | 6060 | 6869 |
| 1210 | 1701 | 2597 | 3350 | 3743 | 4919 | 5567 | 6076 | 6961 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

Email-navakal.1923@gmail.com /navakalofficial www.navakal.in
नवाकाळ विजय

# कोळसा संकटाच्या मुळाशी...

**–डॉ. शैलेंद्र देवळाणकर, परराष्ट्र धोरण विश्लेषक**



**सबंध जगभरात सध्या ऊर्जासंकट तीव्र होताना दिसत आहे. काही दिवसांपूर्वी चीनमध्ये कोळसा टंचाईमुळे अंधारमय परिस्थिती निर्माण झाली होती; पण आता भारतातही तशी वेळ येण्याची परिस्थिती उद्‍भवली आहे. जागतिक बाजारात कोळशाचे वाढलेले भाव, पावसाळा लांबल्याने घटलेले कोळसा उत्पादन यामुळे कोळसा टंचाई निर्माण झाली आहे. यातून मार्ग काढणे ही केंद्र आणि राज्यांची सामूहिक जबाबदारी आहे. या दोन्ही घटकांनी संयुक्तरित्या, समन्वयाने प्रयत्न करणे आवश्यक आहे.**

भारत सध्या अभूतपूर्व ऊर्जा संकटाच्या उंबरठ्यावर आहे. वेळीच याबाबत उपाययोजना केल्या गेल्या नाहीत तर नजीकच्या काळात भारताला ऊर्जाटंचाईमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचा सामना करावा लागू शकतो. सद्यस्थितीत भारताचा शेजारी असणारा चीन अशा प्रकारच्या ऊर्जा संकटाचा सामना करत आहे. काही दिवसांपूर्वीच चीनमधील बीजिंग आणि शांघाय ही दोन मोठी शहरे काही काळासाठी अंधारामध्ये गेली होती. चीनच्या औद्योगिक उत्पादनावरही याचा प्रतिकूल परिणाम झाला होता. औद्योगिक उत्पादन घटल्याने चीनच्या अर्थव्यवस्थेलाही त्याचा फटका बसला. भारतामध्येही अशाच प्रकारची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे कोळशाची टंचाई. चीनमधील ऊर्जा संकटामागेही हेच कारण होते.

भारतामध्ये अभूतपूर्व अशी कोळशाची टंचाई निर्माण झालेली आहे. संपूर्ण भारतात होणाऱ्या एकूण ऊर्जानिर्मितीपैकी ७० टक्के वीज ही कोळशाच्या माध्यमातून तयार होते. भारतात कोळशापासून वीजेचे उत्पादन करणारे एकूण १३५ वीजप्रकल्प आहेत. या १३५ पैकी ११५ वीजनिर्मिती केंद्रांमध्ये सध्या कोळशाची टंचाई असून त्यांनी धोक्याची घंटा वाजवण्यास सुरुवात केली आहे. यापैकी ६० वीजनिर्मिती केंद्रांकडे केवळ १ ते २ दिवस पुरेल इतकाच कोळशाचा साठा शिल्लक आहे. भारतातील सर्वच राज्यांमध्ये अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झाली आहे.

एकीकडे भारतीय अर्थव्यवस्था कोरोनाच्या महासंकटातून बाहेर येण्याचा प्रयत्न करत आहे. कोरोनाच्या दोन लाटांनी भारताच्या अर्थव्यवस्थेला जबरदस्त झळा बसल्या. पण भारत त्यातून सावरत सावरत आता वेगाने वाटचाल करत आहे. तथापि, भारताला आपला विकास दर वाढवण्यासाठी केवळ सेवा क्षेत्राचा विकास उपयोगाचा ठरणार नाही. त्यासाठी औद्योगिक उत्पादनात वाढ होणे गरजेचे आहे. भारतात गेल्या ६ महिन्यांमध्ये औद्योगिक उत्पादनात प्रचंड वाढ झाली असून १०० अब्ज डॉलर्स इतक्या रकमेच्या उत्पादनांची देशातून निर्यात केली आहे. यामध्ये सातत्य ठेवायचे असेलतर वीजेचा अखंडित आणि नियमित पुरवठा ही प्राथमिक गरज आहे. त्याअर्थाने विचार करता वीज हा अर्थव्यवस्थेचा कणा आहे, असे म्हणता येईल. वीजेची टंचाई निर्माण झाल्यास सर्वसामान्यांना त्याची झळ बसेलच; पण त्याहून अधिक मोठा फटका उद्योगजगताला बसेल. वीजप्रवाह खंडित झाल्यास उत्पादन प्रक्रिया ठप्प होऊन त्याची खूप मोठी झळ भारतीय अर्थव्यवस्थेला बसू शकते. त्याचप्रमाणे भारतामध्ये रेल्वे सेवाही कोळशावर अवलंबून आहे. कोळशाची टंचाई अशीच कायम राहिल्यास रेल्वे सेवेवरही त्याचा परिणाम होऊ शकतो.

दुसरीकडे संपूर्ण भारतात सध्या सणासुदीचे दिवस सुरु झाले आहेत. दसरा–दिवाळी हे भारतीयांच्या सर्व सण–उत्सवांचे शिरोमणी म्हणून ओळखले जातात. गेल्या दोन वर्षांमध्ये बहुतांश सणांवर कोरोनाचे सावट राहिले होते. कोरोनाचा संसर्ग कमी झाल्यामुळे यंदा नागरिकांमध्ये सणासुदीचा उत्साह द्विगुणित झालेला पाहायला मिळत आहे. दिवाळी, ख्रिसमस या सणांच्या काळात वीजेची मागणी प्रचंड वाढत असते. दुसरीकडे औद्योगिक उत्पादनात वाढ होत असल्याने उद्योग क्षेत्राकडून असलेली वीजेची मागणीही लक्षणीय वाढणार आहे. नेमक्या अशा मोक्याच्या वेळी देशात कोळशाचे संकट निर्माण झाले आहे आणि या संकटामुळे वीजनिर्मिती केंद्रे बंद पडण्याच्या स्थितीत येऊन ठेपली आहेत.

'सेंट्रल इलेक्ट्रिसिटी ॲथॉरिटी' अर्थात 'सीईए' ने असे सांगितले आहे की, ही समस्या पुढील सहा महिन्यांपर्यंत सुरू राहू शकते. भारत हा दोन पद्धतीने कोळशाची गरज भागवत असतो. यातील एक माध्यम म्हणजे देशांतर्गत खाणीतून काढलेला कोळसा. भारतात मध्य प्रदेश, राजस्थान, झारखंडमध्ये कोळशाच्या खाणी आहेत. भारताची कोळसा उत्खननाची क्षमता प्रति दिवस १.९४ दशलक्ष टन इतकी आहे. नुकतेच केंद्र सरकारच्या 'कोल इंडिया' या कंपनीने ही क्षमता वाढवण्याचा निर्णय घेतला असून लवकरच ही क्षमता २ दशलक्ष टनांपर्यंत नेण्यात येणार आहे. हा निर्णय स्वागतार्ह असला तरी तो लागलीच अमलात येणार नाही. यामागचे कारण लक्षात घेणे गरजेचे आहे. कोळसा उत्खननामधील सर्वात मोठी समस्या पावसाळा ही आहे. पावसाळ्याच्या दिवसात कोळसा उत्खननाची प्रक्रिया जवळपास ठप्प होते. भारतात यावेळी मान्सून लांबला आहे. त्यामुळे कोळसा उत्खननावर याचा प्रतिकूल परिणाम झाला आहे.

दुसरी समस्या म्हणजे केंद्र सरकारने सर्व राज्यांना त्यांच्याकडे कोळशाचा साठा करुन ठेवण्याबाबत सूचना दिलेल्या होत्या. अनेकांना याबाबत प्रश्न पडू शकतो की, जर केंद्र सरकारला भविष्यात कोळसा टंचाई जाणवू शकते याची कल्पना होती तर केंद्राने हा साठा करुन का नाही ठेवला आणि नंतर तो राज्यांना का नाही पुरवला? परंतु यामधील एक मोठी समस्या म्हणजे, कोळशाचा साठा करण्याला असणाऱ्या मर्यादा. साधारणतः कोळशाचा साठा ५ ते ६ दिवसांपर्यंतच करता येतो. त्याहून अधिक साठा करता येत नाही. कारण त्यामध्ये आग लागण्याची भीती असते. चुकून जर त्यामध्ये आग लागल्यास सबंध कोळसा वाया जाण्याची भीती असते. केंद्र सरकारने ज्या राज्यांमध्ये कोळशाच्या खाणी आहेत त्या राज्यांना जास्तीचे उत्खनन करुन ठेवण्याबाबत सूचना दिल्या होत्या. परंतु राज्यांनी त्याकडे फारसे लक्ष दिले नाही. परिणामी, आज ७५ टक्के वीजनिर्मिती केंद्रे कोळशाअभावी बंद पडण्याच्या स्थितीत आहेत.

कोळशासाठीचा दुसरा मार्ग म्हणजे आयात करणे. तथापि, सध्या जागतिक पातळीवर कोळशाची टंचाई निर्माण झाली आहे. जगभरात चीन हा कोळशाचा सर्वाधिक वापर करणारा आणि पर्यायाने कोळशाचा ग्राहक देश आहे. कारण चीनमध्येही ७० टक्के वीजेचे उत्पादन कोळशाच्या साहाय्याने होते. परंतु गेल्या दोन महिन्यांमध्ये चीनमध्ये प्रचंड मोठे महापूर येऊन गेले. चीनमध्ये कोळशाच्या ६० मोठ्या खाणी असून या महापुरांमुळे सर्वच्या सर्व कोळशाच्या खाणींमधील उत्खननाचे काम ठप्प झाले. परिणामी, चीनने आंतरराष्ट्रीय बाजारातून मोठ्या प्रमाणावर कोळशाची आयात करण्यास सुरुवात केली. यासाठी जादा पैसे मोजले. दुसरीकडे संपूर्ण युरोपमध्येही ऊर्जासंकट निर्माण झाले आहे. तसेच आज संपूर्ण जग कोरोनाच्या तडाख्यातून बाहेर येत आहे. सर्वच देशांनी अर्थव्यवस्थेचा वेग वाढवण्यावर भर दिला आहे. देशांना निर्यात वाढवायची आहे, व्यापार वाढवायचा आहे. यासाठी सर्वच देश औद्योगिक उत्पादन वाढवत आहेत. परिणामी, पेट्रोल–डिझेल, नैसर्गिक वायू आणि कोळसा यांची मागणी प्रचंड वाढली आहे. साहजिकच या तिन्ही घटकांच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. त्यामुळे कोळसा आयातीलाही मर्यादा आल्या आहेत. दुसरीकडे देशांतर्गत उत्पादनही पावसामुळे घटले आहे.

आणखी एक मुद्दा म्हणजे राज्यांनी कोळसा घेतल्यानंतर त्याची देयके वेळच्या वेळी अदा करणे गरजेचे आहे. परंतु आजघडीला राज्यांकडून केंद्राला जवळपास २० हजार कोटींचे देणे आहे. राज्यांची ही भूमिकाही या संकटास कारणीभूत ठरली आहे. या सर्वांमुळे देशात कोळशाचे संकट निर्माण झाले आहे.

**यातून मार्ग काढण्यासाठी तीन गोष्टी ताबडतोबीने करणे गरजेचे आहे.**

१) आता पावसाळा संपला असल्याने तात्काळ कोळशाचे उत्पादन वाढवणे गरजेचे आहे.

२) सर्वांनीच येत्या काळात काटकसरीने वीजेचा वापर करणे गरजेचे आहे.

३) काही काळासाठी, चढ्या भावाने का होईना पण केंद्राने आंतरराष्ट्रीय बाजारातून कोळशाची आयात केली पाहिजे.

याखेरीज राज्यांनीही भविष्यामध्ये अशा प्रकारचे संकट निर्माण होऊ नये यासाठी एक रणनीती ठरवणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे राज्यांनी आपली देयकेही वेळच्या वेळी अदा केली पाहिजेत. थोडक्यात केंद्र आणि राज्यांची ही सामूहिक जबाबदारी आहे. ताज्या ऊर्जासंकटातून बाहेर पडण्यासाठी या दोन्ही घटकांनी संयुक्तरित्या, समन्वयाने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

# एअर इंडिया: नवीन प्रवास टाटांसोबत

**–प्रतिक कमलाकर म्हात्रे, सनदी लेखापाल**

**भारत सरकारने १९५३ साली टाटा समूहाला २.८० कोटी रुपये देऊन विकत घेतलेली 'एअर इंडिया' ६७ वर्षानंतर १८००० कोटी रुपये देऊन टाटा समूहाने विकत घेतली आणि 'एअर इंडिया' पुन्हा टाटांची झाली.**



### 'एअर इंडिया' आणि टाटा समूह

१९३२ साली जेआरडी टाटा आणि नेव्हिल विन्सेन्ट यांनी २ लाख रुपयांच्या भांडवलावर 'टाटा एरलाईन्स'ची सुरुवात केली जिचे नामकरण १९४६ मध्ये 'एअर इंडिया' असे करण्यात आले. १९४८ मध्ये भारत सरकारने 'एअर इंडिया'मध्ये ४९% मालकी घेतली होती जी १९५३ च्या राष्ट्रीयीकरणाच्या धोरणाला अनुसरून १००% ताब्यात घेण्यात आली. त्यावेळी २.८ कोटी रुपये टाटा समूहाला देऊन सरकारने 'एअर इंडिया' विकत घेतली होती. जरी 'एअर इंडिया'ची मालकी सरकारने घेतली असली तरी त्याच्या अध्यक्षपदी जेआरडी टाटा यांनाच ठेवण्यात आले होते.

सुमारे १९७८ पर्यंत जेआरडी टाटांच्या नेतृत्वाखाली 'एअर इंडिया'ची वाटचाल सुरु होती. त्यानंतर मोरारजी देसाईंच्या सरकारने जेआरडी टाटांना अध्यक्षपदावरून बाजूला केले. त्यानंतर १९८० साली इंदिरा गांधी सत्तेत आल्यावर त्यांनी जेआरडी टाटांना 'एअर इंडिया'च्या संचालक पदी नेमले. १९८६ साली रतन टाटा यांची नियुक्ती अध्यक्ष म्हणून करण्यात आली. रतन टाटा १९८९ पर्यंत 'एअर इंडिया'च्या अध्यक्षस्थानी होते. जरी अध्यक्षपद हे इतक्या प्रदीर्घ काळासाठी टाटा समूहाकडे असले तरी 'एअर इंडिया'तील सर्व निर्णय प्रक्रिया सरकारच्याच ताब्यात होती. 'एअर इंडिया'च्या खासगीकरणाचे प्रयत्न २००१ साली जेव्हा सुरु झाले होते त्यावेळी टाटा समूहाने 'सिंगापूर एअर लाईन'च्या मदतीने त्यात भाग घेतला होता, परंतु या खासगीकरणाला राजकीय विरोध झाल्याने 'सिंगापूर एअर लाईन' त्यातून बाहेर पडली आणि टाटा समूहाचे ते प्रयत्न अयशस्वी ठरले.

### लिलावप्रक्रिया

'एअर इंडिया' मधील आपला १०० % हिस्सा भारत सरकारने 'टॅलेस प्रायव्हेट लिमिटेड' या टाटा सन्सची संपूर्ण मालकी असलेल्या उपकंपनीला सुमारे १८,००० कोटी रुपयांना विकला. ही किंमत राखीव किमतीपेक्षा ४०% जास्त आहे. टाटा सन्स व्यतिरिक्त या लिलावात 'स्पाइसजेट'चे प्रवर्तक अजय सिंह यांच्या नेतृत्वाखाली १५,१०० कोटी रुपयांची दुसरी बोली लावली गेली होती. 'एअर इंडिया'तील आपला हिस्सा विकायचे मागील दोन प्रयत्न अपयशी ठरल्यानंतर भारत सरकारने लिलावाच्या पद्धतीमध्ये आणि काही अटीशर्तींमध्ये बदल केल्याने या वेळच्या लिलावामध्ये सात जणांनी भाग घेतला. त्यातील पाच जण तांत्रिकदृष्ट्या अपयशी ठरल्यामुळे उरलेल्या दोघांनी आर्थिक बोली लावली. त्यातून टाटा सन्सची बोली सर्वाधिक असल्याने त्यांना 'एअर इंडिया'ची मालकी मिळाली.

### लिलावप्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर...

१. टाटा समूहाला ३ वर्षांची व्यवसाय सातत्य योजना (Business Continuity Plan) सादर करावी लागेल.

२. टाटा समूहाला 'एअर इंडिया'मधील मालकी हिस्सा सुरुवातीच्या एक वर्षासाठी ५१% च्या खाली आणता येणार नाही.

३. 'एअर इंडिया'चा ब्रँड आणि 'महाराजा' त्यांना ५ वर्ष तरी ठेवावा लागेल.

४. ५ वर्षानंतर देखील हा ब्रँड त्यांना परदेशी व्यक्तीला विकता येणार नाही.

५. विक्री प्रक्रिया ३१ डिसेंबर २०२१ पर्यंत पूर्ण होईल.

६. विक्री प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत 'एअर इंडिया' सरकारच्या ताब्यात असेल परंतु सरकारला कोणताही मोठा खर्च करायच्या अगोदर टाटा समूहासोबत सल्लामसलत करावी लागेल.

### कर्जाचा विळखा

१९९२–९३ साली 'एअर इंडिया'ला ३३३ कोटी रुपयांचा नफा झाला होता. त्यावेळी दिवसाला १ कोटी नफा कमावणारी 'एअर इंडिया' ही गेल्या अनेक वर्षांपासून तोट्यात चालू होती. २००६ साली 'एअर इंडिया' आणि 'इंडियन एअरलाईन्स'च्या विलयानंतर हा तोटा आणखीनच वाढू लागला होता. ३१ ऑगस्ट २०२१ पर्यंत 'एअर इंडिया'चा एकूण संचित तोटा हा सुमारे ८३ हजार ९१६ कोटी इतका होता. जर एखाद्या कंपनीला सारखा तोटाच होत असेल तर ती कंपनी चालविण्यासाठी त्यात मालकाला अजून पैसा टाकावा लागतो अथवा कर्ज घ्यावे लागते. 'एअर इंडिया'ने कर्ज घेण्याचा पर्याय निवडला. तोट्यात असलेल्या उद्योगाला कर्ज मिळणे मुश्कील असल्याने 'एअर इंडिया'च्या या सर्व कर्जाला भारत सरकारने सार्वभौमिक हमी दिली होती म्हणजे जर 'एअर इंडिया' कर्जाची परतफेड करण्यास अपयशी ठरल्यास हे कर्ज सरकारला भरावे लागेल आणि पर्यायाने ते पैसे सर्वसामान्य भारतीयांनी दिलेल्या कररुपी पैशातून जातील. 'एअर इंडिया'ने आतापर्यंत घेतलेल्या कर्जापैकी ६१ हजार ५६२ कोटी रुपये कर्जाची परतफेड करणे बाकी आहे.

### कर्जाची परतफेड

टाटा समूह जे १८ हजार कोटी देणार आहे त्यातील २ हजार ७०० कोटी हे भारत सरकारला दिल्यानंतर उरलेल्या १५ हजार ३०० कोटी रुपयांचा वापर कर्ज परत फेडीसाठी केला जाणार आहे. उर्वरित ४६ हजार २६२ कोटी रुपयांचे कर्ज हे AIAHL या कंपनीमध्ये हस्तांतरित केले जाईल त्याचबरोबर 'एअर इंडिया'च्या स्थावर मालमत्तांपैकी १४ हजार ७१८ कोटींच्या मालमत्ता टाटा समूहाला मिळणार नाहीत. त्या सर्व मालमत्ता AIAHL या कंपनीमध्ये हस्तांतरित केल्या जातील. जेणेकरून भारत सरकारला AIAHL कंपनीद्वारे मालमत्तांची विक्री करून कर्जाची परतफेड करता येईल.

यामुळे भारतीय बँकिंग विश्वाचा फायदा होईल. टाटा समूहाकडून होणारी कर्जाची परतफेड त्याचबरोबर भारत सरकार कडून AIAHL द्वारे होणारी कर्जाची परतफेड झाल्यानंतर उर्वरित जे कर्ज असेल ते देखील भारत सरकार परत करेल. त्यामुळे बँकांना कोणतेही कर्ज माफ अथवा 'व्हाइट ऑफ' करावे लागणार नाही.

### कर्मचारी सेवाशर्ती

सध्या 'एअर इंडिया'मध्ये एकूण १२०८५ कर्मचारी असून त्यातील ८०८४ कर्मचारी हे कायमस्वरूपी आहेत तर ४००१ कर्मचारी हे कंत्राटी पद्धतीवर आहेत. टाटा समूहाला किमान एक वर्ष कर्मचाऱ्यांना काढून टाकता येणार नाही आणि त्यानंतर देखील त्यांना स्वेच्छानिवृत्ती योजना लागू करूनच कर्मचारी कमी करता येतील. सध्या निवृत्त कर्मचाऱ्यांची संख्या ५५,००० इतकी असून पुढील ५ वर्षात आणखी ५००० कर्मचारी निवृत्त होणार आहेत. त्या सर्वांचे आरोग्यविषयक आणि निवृत्तिवेतनाच्या फंडासाठी भारत सरकार १३०० कोटी रुपये देईल आणि उर्वरित पैसे हे टाटा समूहाला द्यावे लागतील. त्याचबरोबर 'एअर इंडिया'च्या कर्मचाऱ्यांना सध्या मिळत असलेल्या मोफत प्रवासाच्या सवलतींमध्ये बदल होण्याची शक्यता असून इतर विमान सेवा कंपन्यांनुसार त्यामध्ये कपात केली जाऊ शकते.

### आणीबाणी अथवा गरजेच्या प्रसंगी

भारत सरकार आतापर्यंत नेहमीच आणीबाणीच्या प्रसंगी 'एअर इंडिया'च्या विमानांचा वापर हा लोकांची सुटका करण्यासाठी अथवा भारतात परत आणण्यासाठी करत होते. परंतु त्याचवेळी 'एअर इंडिया'ला या कामासाठी मोबदला देखील मिळत होता. त्यामुळे यानंतर अशाप्रसंगी भारत सरकार सर्वच खासगी विमान सेवा कंपन्यांना ही संधी देऊ शकते आणि सरकारकडून आलेली अशाप्रकारची विनंती नाकारण्याची शक्यता खूपच कमी आहे.

### तिकीट दर वाढणार?

दैनंदिन २० कोटी तोटा असणारी सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी विकल्यामुळे सर्वसामान्यांचा कररूपी जमा झालेला पैसा आता सरकारला इतर कामांसाठी वापरता येईल. टाटा समूह आपल्या इतर कंपन्यांप्रमाणे भविष्यात 'एअर इंडिया'चा देखील 'आयपीओ' आणेल त्यावेळी ज्यांना 'एअर इंडिया'मध्ये गुंतवणूक करायची आहे त्यांना संधी मिळेल. सरकारचे नियंत्रण निघून गेल्याने 'एअर इंडिया'च्या तिकिटाच्या किंमतींमध्ये वाढ होण्याची शक्यता कमी आहे. कारण सध्याची हवाई क्षेत्रातील परिस्थिती पाहता ज्या विमानसेवेचे तिकीट दर कमी त्यांच्याकडेच लोकांचा जास्त कल असल्याने असा तिकीट दर वाढविण्याचा आतबट्ट्याचा व्यवहार 'एअर इंडिया' नंतर देखील करणार नाही.

### भारतीय हवाई क्षेत्रावरील परिणाम

हवाई वाहतूक क्षेत्रातून सरकारी मालकी निघून गेल्याने एक निकोप स्पर्धा या क्षेत्रामध्ये तयार होईल. सरकारी कर्मचारी, मंत्री, हज यात्रेकरू यासारख्या प्रवाश्यांमध्ये 'एअर इंडिया'ची असलेली मक्तेदारी संपुष्टात येऊन इतर विमानसेवांना देखील या प्रवाशांना आपल्याकडे खेचता येईल.

या हस्तांतरणानंतर 'एअर इंडिया' आणि टाटा समूहाच्या सध्या अस्तित्वात असलेल्या विमानसेवा या एकत्रितपणे देशांतर्गत वाहतुकीमध्ये 'इंडिगो'नंतर दुसऱ्या क्रमांकावर येतील आणि 'एअर इंडिया' ही भारतातील सर्वात मोठी आंतरराष्ट्रीय विमान सेवा असेल. त्याचबरोबर सध्या 'सिंगापूर एअर लाईन' आणि मध्यपूर्वेतील विमानसेवांच्या भारतातील आंतरराष्ट्रीय सेवांपुढे 'एअर इंडिया'च्या रूपाने एक सक्षम पर्याय तयार होईल.

'एअर इंडिया'च्या खासगीकरणाचे भारतीय उद्योग क्षेत्रावर दूरगामी परिणाम होणार आहेत. या खासगीकरणानंतर इतर मोठ्या सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांच्या खासगीकरणाचा मार्ग सुकर होईल खासगीकरणानंतर उद्‌भवणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या समस्या, हवाई क्षेत्रातील कमी नफा आणि भविष्यात या क्षेत्रात येणाऱ्या नवीन विमान कंपन्यांची स्पर्धा पाहता टाटा समूहाला 'एअर इंडिया' चालविताना तारेवरची कसरत करावी लागेल.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# किमान दरामध्ये किमान गरजांची पूर्तता

नाण्याला दोन बाजू असतात किंवा एका हाताने टाळी वाजत नाही अशा प्रकारचे वाक्प्रचार आपण नेहमी वापरत असतो. कारण जे दिसतं त्यापेक्षा वस्तुस्थिती खूप वेगळी असते. आजचे जग पुढारलेलं आणि आधुनिक असल्याचा आपण नेहमी उल्लेखही करतो. परंतु या पुढारलेपणाचे निकष काय हे ठरवताना अतिशय गंभीर संवेदनशील महत्त्वाच्या मुद्दांकडे सोयिस्कर दुर्लक्षही करतो. नुकताच जागतिक खाद्य अन्नदिवस साजरा झाला. त्यानिमित्ताने जगभरातील विविध देशातील लोकसंख्या दारिद्रय रेषेखालच्या लोकांचे प्रमाण कुपोषित लोकांची संख्या एकूण अन्नधान्याचे उत्पादन त्याचा होणारा यथोचित उपयोग आणि तितक्याच प्रमाणावर अन्‍नधान्याची होणारी नासाडी असे अनेक मुद्दे चर्चेत आले. प्रामुख्याने मानवी द्दष्टीकोनातून विचार करताना जगातील कोणतीही व्यक्ती उपाशीच नव्हे तर अर्धपोटीसुध्दा राहू नये. किंबहुना तिच्या पालन पोषणाची योग्य ती जबाबदारी त्या त्या देशाच्या राष्ट्रांनी स्वीकारली पाहिजे. आज जगातल्या जवळपास पंचवीस टक्के देशांमध्ये कुपोषणाची समस्या आहे. त्यात भारतासारख्या लोकसंख्येने मोठ्या असलेल्या देशातली हे प्रमाण दुर्लक्षित करण्यासारखे नाही. ज्या देशांमध्ये अन्नधान्याचे प्रश्न आहेत. तिथे साहाय्य करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघ किंवा जागतिक आरोग्य संघटना युनिसेफ किंवा रेड क्रॉससारख्या जागतिक स्तरावरच्या संस्था मदत करीत असतात. परंतु अन्नधान्याची उपलब्धता आणि लोकसंख्येचे प्रमाण असा अतिशय मूलभूत प्रश्न यातून समोर येतो. लोकसंख्या नियंत्रणात राहिली तर आपोआपच अनेक समस्यांना तोंड देता येऊ शकते. अगदी मग मनुष्यशक्तीचा वापर करण्यापासून तर प्रत्येकाला सकस अन्नधान्य मिळण्यापर्यंत प्रश्न सुटू शकतात. मनुष्यशक्तीचा कार्यक्षमपणे वापर झाल्याने त्या त्या देशातील लोकांचा जीवनस्तरही उंचावू शकतो. आजच्या विज्ञान तंत्रज्ञान युगामध्ये अनेक सुखसाधने उपलब्ध होत असतात. परंतु त्याचा उपभोग आर्थिकद्दष्टय़ा कमकुवत असलेले लोक घेऊ शकत नाहीत. कारण त्या देशातील अधिक लोकसंख्या आणि अन्नधान्याच्या टंचाईचे प्रश्न त्यांना तितक्याच प्रमाणात भेडसावत असतात.

**तरीही कुपोषणाची समस्या**

भारतासंदर्भात विचार करायचा झाला तर आज आपल्याकडे मुबलक अन्नधान्य साठा आहे आपण त्यातला बराचसा भाग निर्यात करत असतो. त्याच्या बदल्यात अन्य वस्तू आयात करत असतो. मात्र आजही भारतात आदिवासी दुर्गम भागात कुपोषणाची प्रचंड समस्या जाणवते. एवढेच नव्हे तर दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाणही आजदेखील चाळीस टक्क्याच्या आसपास पाहायला मिळते. अन्नधान्याची मुबलकता असूनही ही परिस्थिती उद्भवण्याचे कारण काय याचा अर्थ इथल्या मनुष्यशक्तीचा योग्य वापर केला जात नाही. त्याच्या रोजगाराचे प्रश्न कायम राहातात. स्वाभाविकपणे पुरेसा रोजगार नसल्याने त्या त्या कुटुंबातील व्यक्तीला त्या त्या प्रमाणात सकस अन्नधान्य मिळू शकत नाही. भारत आज जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा मोठा देश मानला जातो. लोकसंख्येच्या प्रमाणात रोजगाराची आणि अन्य जीवनविषयक सोयीसुविधांची पूर्तता होऊ शकत नाही. या कारणांमुळे जीवनस्तर उंचावू शकत नाही. किमान सोयीसुविधांच्या अभावामुळे अपेक्षित तेवढा अन्नधान्य साठा त्या कुटुंबाला किंवा त्या व्यक्तीलासुध्दा मिळू शकत नाही. अशी ही काहीशी गुंतागुंतीची विपरित परिस्थिती पाहायला मिळते. भारताला जर विकसित देश म्हणून स्थान निर्माण करायचे असेल तर लोकसंख्येचे नियंत्रण हे अत्यंत गरजेचे ठरते. आपल्याला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळेला आपली लोकसंख्या चाळीस ते पन्नास कोटीच्या आसपास होती. आज ती जवळपास तिप्पट वाढलेली आहे. १३५ कोटी लोकसंख्येच्या या देशात जगण्यासाठी आवश्यक साधनसुविधांची पूर्तता होऊ शकत नाही. अन्नधान्य पुरेसे असूनही ते आर्थिक दुर्बलतेमुळे गरजूंपर्यंत पोहचू शकत नाही. भ्रष्टाचारामुळे त्यात आणखीनच भर पडत राहाते. खेड्यात किंवा आदिवासी पाड्यांच्या रेशन दुकानांवर पुरेसे अन्नधान्य पोहचत नाही ही आज वस्तुस्थिती आहे. खरे तर या गोष्टीचा खूप गांभिर्याने विचार व्हायला हवा. असलेल्या अन्नधान्य साठ्याचा आपल्या देशातील गरजूंना कसा अधिकाधिक उपयोग होईल आणि कुपोषणासारखी समस्या शिल्लक राहाणार नाही. अशी सर्वांगिण योजना गरजेची ठरते. कुठेतरी सरकारी धोरणामध्ये आणि नियोजनात गफलत होताना दिसते.

**शहरांमधून अन्नाची नासाडी**

लोकसंख्येच्या विचाराबरोबरच अन्नधान्याचा पुरेपूर उपयोग हा मुद्दासुध्दा खूप महत्त्वाचा ठरतो. दरवर्षी भारताचे अन्नधान्य उत्पादन वाढते आहे. गोदामे अपुरी पडावीत अशी आज स्थिती आहे. जागा नसल्याने अन्नधान्य साठा बाहेर ठेवावा लागतो. आणि मग कधी पावसामुळे तर अन्य काही प्राण्यांमुळे या धान्याची अतोनात नासाडी होते. कुपोषण असलेल्या भारतात दरवर्षी लाखो टन धान्य पाण्यामुळे वाया जात असते. हा विरोधाभास लक्षात ठेवूनच काही वर्षापूर्वी न्यायालयाने सरकारला खडसावले होते. आणि धान्य अशा पध्दतीने वाया जाण्यापेक्षा ते गरीबांना फुकट वाटा असेदेखील बजावले होते. परंतु त्यात कोणताही बदल झालेला नाही. ते धान्य वाया गेले तरी चालेल पण गरीबांना स्वस्तात किंवा फुकट मिळता कामा नये. इतके निर्दयी धोरण सरकारतर्फे राबवले जाते. एकीकडे हे चित्र असताना दुसरीकडे अनेक शहरांमधून रोज कितीतरी टन शिजवलेल्या तयार झालेल्या अन्नाची नासाडी होत असते. मोठमोठ्या पंचतारांकित हॉटेल्समधून ट्रक भरून भरून हे अन्न फेकून दिले जाते. याचा अर्थ अन्नधान्याकडे पाहाण्याचा सरकारचा आणि अनेक गर्भश्रीमंतांचा द्दष्टीकोन बेजबाबदारपणाच वाटतो. अशा प्रकारची अन्नधान्याची मुबलकता हा भारतासाठी नावलौकिकाचा विषय ठरतो. परंतु त्याचे समर्पक नियोजन होत नाही. काहीवेळेला तर आंधळं दळतंय कुत्रं पीठ खातंय अशासारखी परिस्थिती होते. म्हणूनच किमान दरामध्ये किमान गरजांची पूर्तता असे धोरण राबवले गेले पाहिजे. शेतकऱ्याला किमान भाव मिळेल. सामान्य माणसाला किमान दरात ते प्राप्त होईल. आणि जगण्याच्या किमान गरजा भागतील अशी ही त्रिसूत्री महत्त्वाची ठरते.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी.
मोबा.९४२२४२०६११

आपल्या जीवनामध्ये माणुसकीला वाव देणारी माणसं शोधा. माणुसकीचा आव आणणारी माणसं तर पावलोपावली भेटतात.

## पंचांग

**रविवार १७ ऑक्टोबर, २०२१**
**शक १९४३ प्लवनामसंवत्सर**

*** आश्विन शुक्ल द्वादशी * नक्षत्र - शततारका**

**रवी उदय- ०६-३४,**
**रवी अस्त- १८-१३**



**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० कुंभ**

प्रदोष, क्षीरदान, द्विदल व्रत

मुद्रक, प्रकाशक **सौ.जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **सौ.जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे**
संपर्क : २३८८०९८१, जाहिरात :८१०८११६४२३, ८१०८११६४२९, छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५, वितरणः २३८२४४६६,
ई-मेल navakal.1923@gmail.com
**कार्यकारी संपादक : रोहित पांडे**
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Jayshree Ramakant Khadilkar Pande**

## कविता...

### अश्विनशोभा

दंवात भिजली सारी शेते, घमघमणारी पिके
वाऱ्यासंगे लहरत आहे शुभ्र कोवळे धुके
सोनकेशरी ऊन चमकते वालामध्ये
झगमग करती बांधावरती झेंडूफुले
चमचमणाऱ्या उन्हात पक्षी पंख पसरूनी नाचे
दंवात भिजली सारी शेते, घमघमणारी पिके
सळसळ करती मूग, हरभरा
चवळीलाही फुटे नवा धुमारा
तीळ फुलांनी शेते सजता, सुवास त्यांचा पसरे
दंवात भिजली सारी शेते, घमघमणारी पिके
शेतं मोहरीची उल्हासाने फुलून आली
फुलपाखरे त्यांच्या मागे भुलुन गेली
पानोपानी हादगा फुलला, त्यांचे नाजूक नखरे
दंवात भिजली सारी शेते, घमघमणारी पिके
.गवतफुलांनी सजली राने
पंख पसरुनी भुंगा नाचे
वाऱ्यासंगे झुरूमुरू करती लवलवणारी पाते
दंवात भिजली सारी शेते, घमघमणारी पिके

**• श्रीनिवास गडकरी •**
रोहा, पेण. मो. - ०९१३०८६१३०४

# राहुल द्रविड होणार भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक



**भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून माजी कर्णधार राहुल द्रविड आगामी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेनंतर जबाबदारी स्विकारणार आहेत. तर गोलंदाजीचे प्रशिक्षक म्हणून मुंबईचे माजी वेगवान गोलंदाज पारस म्हांब्रे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. एएनआय या वृत्तसंस्थेशी बोलताना सूत्रांनी सांगितले की, द्रविडने प्रशिक्षक होण्यास संमती दिली आहे.**

■ नवी दिल्ली

युएईमध्ये बीसीसीआयचे अध्यक्ष सौरव गांगुली, सचिव जय शहा आणि राहुल द्रविड यांची बैठक झाली. या बैठकीत द्रविड यांनी प्रशिक्षक पद स्विकारण्यास होकार दिला. सध्या भारतीय संघाचे असलेले मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांचा करार टी-२० विश्वचषक स्पर्धेनंतर संपत आहे. तो वाढविण्यास शास्त्री यांनी नकार दिल्यामुळे बीसीसीआयने नव्या प्रशिक्षकाची शोध मोहिम सुरू केली. त्यामध्ये राहुल द्रविड यांना सर्वप्रथम प्राधान्य देण्यात आले होते.

४८ वर्षीय द्रविड सध्या राष्ट्रीय क्रिकेट अकादमीचे प्रमुख आहेत. आता लवकरच ते या पदाचा राजीनामा देणार आहेत. या अगोदर द्रविड यांनी भारतीय युवा संघासोबत प्रशिक्षक म्हणू न काम केले होते. अनेक युवा खेळाडूंना त्यांनी तयार केले. त्यामधील काही खेळाडू सध्या भारतीय संघातर्फे खेळत आहेत. २०२३ पर्यंत द्रविड या पदावर राहतील. या काळात आयसीसीच्या स्पर्धा होणार आहेत.

त्यात वनडे विश्वचषक स्पर्धा, टी-२० विश्वचषक स्पर्धा आणि टेस्ट चॅम्पियनशीप या प्रमुख स्पर्धांचा समावेश आहे. तिसऱ्यांदा द्रविड भारतीय वरिष्ठ संघासाठी काम पाहणार आहेत. २०१४मध्ये पहिल्यांदा द्रविड इंग्लंड दौऱ्यावर फलंदाजीचे सल्लागार म्हणून गेले होते. यंदा श्रीलंका दौऱ्यावर गेलेल्या भारतीय संघाचे ते प्रशिक्षक होते. अगोदरचे गोलंदाजीचे प्रशिक्षक असलेल्या भारत अरुण यांची जागा पारस म्हांब्रे घेणार आहेत. फलंदाजीचे प्रशिक्षक म्हणून राठोड यांनाच कायम ठेवण्यात आले आहे. क्षेत्ररक्षक प्रशिक्षक म्हणून सध्या असलेल्या आर. श्रीधर यांना कायम करणार की नाही याबाबत अजून चित्र स्पष्ट झालेले नाही. न्युझीलंड विरूद्धच्या भारतात होणाऱ्या मालिकेत द्रविड आपल्या प्रशिक्षक पदाची सूत्रे घेतील.

### द्रविड आकड्यांमध्ये

- १६४ कसोटी, १३२८८ धावा
- ३६ शतके, ६३ अर्ध शतके
- ३४४ वनडे, १०८८९ धावा
- १२ शतके, ८३ अर्ध शतके

## आशियाई चषक तिरंदाजी स्पर्धेसाठी भारतीय संघ जाहीर

जमशेदपुर - आगामी आशियाई चषक तिरंदाजी स्पर्धेसाठी येथे झालेल्या निवड चाचणी स्पर्धेतून भारतीय पुरूष, महिला रिर्कव्ह आणि कपांउड विभागासाठी संघाची निवड करण्यात आली. दीपिका कुमारी, अतानू दास हे नामवंत तिरंदाज भारतीय संघात स्थान मिळविण्यात अपयशी ठरले. ऑलिम्पिक स्पर्धेत सहभागी झालेल्या प्रवीण जाधवचा अपवाद वगळता इतर कुठलाच खेळाडू आशियाई स्पर्धेसाठी पात्र ठरु शकला नाही.
**भारतीय संघ -** *रिर्कव्ह - कपिल, पार्थ साळुंखे, सुखचैन सिंग, प्रवीण जाधव, रिध्दी, अंकिता, कोमलिका, मधू कपांउड - अभिषेक वर्मा, रिषभ, मोहित, अमन, ज्योती, सुरेखा, मुक्सान, प्रिया गुर्जर, परमीत कौर.*

## डेन्मार्क स्पर्धेत सिंधू खेळणार

हैद्राबाद : येत्या १९ ऑक्टोबरपासून सुरु होणाऱ्या डेन्मार्क आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताची स्टार बॅडमिंटन खेळाडू पी. व्ही. सिंधू सहभागी होणार आहे. टोकियो ऑलिम्पिकनंतर सिंधुने विश्रांती घेण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे ती उबेर चषक स्पर्धेत सहभागी झाली नाही. ऑलिम्पिक स्पर्धेत सिंधुने कांस्य पदक मिळविले होते. आता विश्व क्रमवारीत अव्वल स्थान मिळविण्याचे तिचे लक्ष्य आहे. आता नव्या व्युह रचेनेनुसार सिंधु कोर्टवर 'कमबॅक' करण्यास सज्ज झाली आहे.

## स्कॉटलंड विरूद्ध बांगलादेशचे पारडे जड

■ ओमान

उद्यापासून सुरू होत असलेल्या टी-२० विश्वचषक स्पर्धेतील पात्रता फेरीच्या सामन्यात स्कॉटलंडविरूद्ध बांगलादेशचे पारडे जड आहे. 'ब' गटातील या सलामीच्या लढतीत बांगलादेशला विजय मिळविणे जड जाऊ नये कारण फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन प्रमुख खेळाच्या अंगात बांगलादेश संघ स्कॉटलंडपेक्षा नक्कीच श्रेष्ठ आहे. कर्णधार महामुदाला मुश्फीकीर रहिम, सोम्या सरकार, रेहमान, शकीबल हसन हे अनुभवी खेळाडू बांगला संघात आहेत. त्यांच्यावर मोठी मदार असेल. अनुभवी सलामीवीर तमिम इक्बालची उणीव मात्र बांगला संघाला जाणवेल. ओमान येथे दाखल होण्यापूर्वी आपले ९ टी-२० सामने जिंकले आहेत. त्याने झिम्बावे, ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड यांना नमविले. या गटात ओमान आणि पापुआ न्युगिनी हे इतर दोन संघ आहेत. बांगलादेशला या गटात अव्वल क्रमांक मिळवून स्पर्धेच्या मुख्य फेरीत प्रवेश मिळण्याची संधी आहे. कारण इतर संघाच्या तुलनेत बांगलादेश खूपच बलवान आहे.

# पुन्हा चेन्नईच ठरले 'सुपर किंग्ज'

**आयपीएल चषक क्रिकेट स्पर्धेत यंदा चौथे विजेतेपद पटकावून महेंद्रसिंग धोनीच्या चेन्नई संघाने आपणच या स्पर्धेत 'सुपर किंग्ज' असल्याचे पुन्हा एकदा दाखवून दिले. गतवर्षी या स्पर्धेत चेन्नईचा संघ ७व्या क्रमांकावर गुणतालिकेत फेकला गेला होता. 'प्लेऑफ'च्या शर्यतीमधून सर्वात पहिला संघ चेन्नई बाहेर पडला होता. त्यावेळी या खराब कामगिरीबद्दल धोनी आणि त्याच्या सहकाऱ्यांवर जोरदार टीका झाली होती.**



संघ बदलण्याची देखील मागणी जोर धरू लागली होती. परंतु तेव्हा धोनीने मात्र संयम राखून पुढल्या वर्षी आम्ही जोरदार 'कमबॅक' करू आणि जेतेपद पटकावू असे सांगितले होते. यंदा जेतेपदावर कब्जा करून धोनीने आपला दिलेला शब्द खरा करून दाखवला. अनुभवी आणि युवा खेळाडूंची फौज असलेला चेन्नई संघ या स्पर्धेतील सर्वात यशस्वी संघ आहे असे म्हणावेच लागेल. कारण १४ पैकी तब्बल ९वेळा त्यांनी स्पर्धेची अंतिम फेरी गाठण्यात यश मिळविले होते. सातत्यपूर्ण कामगिरीचा लौकिक चेन्नईने नेहमीच स्पर्धेत कायम ठेवला. दोन वर्षे संघावर बंदी असल्यामुळे चेन्नई संघ स्पर्धेत नव्हता. आता मुंबई पाठोपाठ चेन्नईनेच या स्पर्धेत सर्वाधिक चार जेतेपद पटकावली. निर्णायक सामन्यात कोलकात्याला नमवून चेन्नईने आपल्या २०१२च्या या स्पर्धेतील पराभवाचा बदला घेतला. तसेच यंदा उभय संघात झालेल्या दोन्ही लढती देखील चेन्नईनेच जिंकल्या होत्या. अंतिम लढत जिंकून चेन्नईने कोलकात्याविरूद्ध विजयाची हॅटट्रिक साजरी केली. विजयासाठी १९३ धावांचे मोठे लक्ष्य कोलकात्यासमोर होते. त्यांच्या गिल-अय्यरने अर्ध शतके फटकावून ९१ धावांची जोरदार सलामी देखील कोलकात्याला करून दिली होती.

पण हे दोघे बाद झाल्यानंतर त्यांची घसरगुंडी उडाली. मधल्या फळीतील फलंदाजांनी निराशा केल्यामुळे कोलकात्याचे तिसरे जेतेपदाचे स्वप्न भंग पावले. कर्णधार धोनीने आपल्या कल्पक नेतृत्त्वाची चमक दाखवताना १० षटकानंतर केलेले गोलंदाजीतील बदल, तसेच क्षेत्ररक्षणातील बदल चेन्नईसाठी फायदेशीर ठरले. त्यामुळे सुरुवातीला कोलकात्याच्या बाजूने झुकलेले विजयाचे पारडे हळुहळू चेन्नईच्या बाजूने फिरले.

कर्णधार म्हणून धोनीचा हा ३००वा टी-२० सामना होता. त्यात विजय आणि जेतेपद पटकावून धोनीने आपल्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला. अष्टपैलू जडेजाने देखील आयपीएलमध्ये आपल्या द्विशतकी सामन्यात खेळताना विजयात मोठी भूमिका बजावून आपल्यासाठी हा सामना स्मरणिय केला. चेन्नईच्या विजयात सर्वच खेळाडूंनी हातभार लावला.

सलामीवीर ड्युप्लिसिस-गायकवाड या दोघांनी बऱ्याच सामन्यात त्यांना चांगली सुरुवात करून दिली. त्याचा फायदा चेन्नईला नेहमीच मिळाला. गोलंदाजीत शार्दुल ठाकूर त्यांचा हुकमी एक्का होता. जेव्हा जेव्हा त्यांना विकेटची आवश्यकता असायची तेव्हा तेव्हा ठाकूरने विकेट घेऊन कर्णधार धोनीचा विश्वास सार्थ ठरवला. कोलकाता संघ जरी पराभूत झाला असला तरी त्यांनी या स्पर्धेत केलेल्या 'कमबॅक'ला तोड नाही. स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात त्यांनी ५ सामने गमावले होते. परंतु युएईमध्ये मात्र दुसऱ्या टप्प्यात त्यांनी कमाल करून प्लेऑफमध्ये प्रवेश मिळविला. ५ वेळा ही स्पर्धा जिंकणाऱ्या मुंबईने मात्र चांगलीच निराशा केली. दुसऱ्या टप्प्यात मुंबईची कामगिरी चांगलीच घसरली. आयपीएल स्पर्धेचे बंगळुरूला जेतेपद मिळवून देण्याचे कर्णधार विराटचे स्वप्न अपुरेच राहिले. कारण आता पुढील वर्षी तो बंगळुरूचा कर्णधार नसेल. हैद्राबाद संघाची कामगिरी मात्र अगदीच सुमार झाली. माजी विजेता संघ स्पर्धेतून 'प्लेऑफ'मधून बाहेर पडणारा पहिला संघ ठरला. त्यामनाने पंजाब, राजस्थान यांनी चांगली चमक दाखवली. स्पर्धेतील पंचांच्या दर्जाबाबत सुधारणा होणे गरजेचे आहे. अनेक वादग्रस्त निर्णय पुन्हा चर्चेत आले. युवा फलंदाज ऋतुराज गायकवाड आणि वेगवान गोलंदाज हर्षल पटेल यांनी या स्पर्धेवर आपली चमकदार छाप पाडली. ऋतुराजने सर्वाधिक धावा आणि पटेलने सर्वाधिक बळी घेतले. भविष्यात या दोघांना भारतीय संघात स्थान मिळेल अशी आशा करू या. पुढील वर्षी चेन्नई संघ ५वे जेतेपद पटकावून मुंबईच्या सर्वाधिक जेतेपदाची बरोबरी करतो का याची उत्सुकता चेन्नईच्या चाहत्यांना असेल.

# सुख शांती समाधान

## विघ्नबाधा निवारणासाठी



हळद व तांदूळ कुटून ते मिश्रण पाण्यात कालवून त्याने घराच्या प्रवेशद्वारावर 'ओम' बनवावा. ते घराला विघ्नबाधांपासून सुरक्षित ठेवण्यात मदत करते. केवळ हळदीच्या मिश्रणानेही 'ओम' लिहिल्यास हेच फळ मिळेल.





## कोजागरी पौर्णिमेला हे करा...

**आश्विन महिन्यातील शुक्ल पक्षाच्या पौर्णिमेला कोजागरी पौर्णिमा तसेच शरद पौर्णिमाही म्हणतात. या पौर्णिमेला विशेष मानले जाते. कोजागरी पौर्णिमेच्या दिवशी देवी लक्ष्मीची व भगवान विष्णूची पूजा केली जाते. असे केल्याने जीवनात पैशाची कमतरता दूर होते. आयुष्यात सुख आणि समृद्धी प्राप्त होते. या कोजागीरीला काय करावे ते पाहू...**

या दिवशी चंद्र देवाची विशेष पूजा करून चंद्राला खीर अर्पण केली जाते. रात्रीच्या वेळी खीर आकाशाखाली ठेवली जाते. असे केल्याने खीर अमृताच्या पावसापासून पवित्र अमृतासारखी बनते, असे म्हटले जाते.

या रात्री महालक्ष्मीची पूजा करून महालक्ष्मी मंत्राचा कमळ गट्टा माळेने १०८ वेळा- 'ॐ श्रीं ह्रीं श्रीं कमले कमलालये प्रसीद प्रसीद श्रीं ह्रीं श्रीं ॐ महालक्ष्मयै नमः। मंत्र जपल्याने आर्थिक अडचणी दूर होण्यास मदत होते.

या दिवशी भगवान शंकराचीही पूजा करावी व रात्री शंकराला खिरीचा नैवेद्य दाखवावा. खीर शक्यतो घराच्या अंगणात चंद्राच्या प्रकाशामध्ये तयार करावी. नैवेद्य दाखवल्यानंतर थोड्यावेळाने खीर प्रसाद म्हणून खावी. याने मानसिक शांती व आर्थिक क्षेत्रात लाभ होतो.

असे म्हटले जाते की, कोजागरी पौर्णिमेची रात्र औषधी गुणयुक्त असते. या योगामध्ये ग्रहण करण्यात आलेल्या औषधाचा लाभ लवकर होतो. या पौर्णिमेला चंद्राच्या प्रभावाने आपल्याला आरोग्यदायी लाभ होतो. या रात्री थोडावेळ चंद्राकडे पाहत रहा. याने डोळ्यांची शक्ती वाढेल.

कोजागरी पौर्णिमेच्या दिवशी हनुमानासमोर चौमुखी दिवा लावावा. दिव्यामध्ये चारही वाती चार दिशांकडे असतील अशाप्रकारे दिवा लावावा. दिवा लावल्यानंतर हनुमान चालीसाचे पाठ करावे.

## सुखशांतीसाठी मुख्य दरवाजावर हे लावा!



घराच्या मुख्य दारावर दर्शनभागी कोणत्याही धातूचे स्वस्तिक अभिमंत्रित करून लावावे. स्वस्तिक अभिमंत्रित करण्याची पद्धत स्वस्तिक डाव्या हातात घेऊन त्यावर उजवा हात ठेवून
ओम भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः।।
स्थिरैरंगैस्तुष्टुवांसस्तनूभिः व्येशम देवहितं यदायुः।।
ओम स्वस्ति न इंद्रो वृद्धश्रवाः स्वस्तिः नःपूषा विश्ववेदाः।।
स्वस्ति नस्ताक्ष्र्यौः अरिष्टनेमिः स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु।।
ओम शांतीः शांतीः शांतीः।। असा शांतिमंत्र १०८ वेळा म्हणून त्यावर पंचामृताने अभिषेक करावा. स्वस्तिक हे सुखशांती, वैभवाचे प्रतीक आहे. त्यामुळे वास्तुत सुखशांती नांदते.

## घरातील कलह-क्लेश दूर होण्यासाठी

ज्याला घरातील कलह (भांडण-तंटे) क्लेश मिटवायचे असतील, व्याधी किंवा शारीरिक दुर्बलतेचे निवारण करायचे असेल, त्याने या चौपाईचे पुनः पुन्हा उच्चारण करावे.
बुद्धिहीन तनु जानिके, सुमिरौं पवन-कुमार।
बल बुद्धि विद्या देहु मोहिं, हरहु कलेश विकार ।।

## आर्थिक प्रगतीसाठी हे

जर व्यवसाय नीट चालत नसल्यामुळे आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते. तसेच प्रत्येक वेळेस हाती घेतलेल्या कामात अडचणी येऊन, ते पूर्णत्वास जात नसेल तर शुक्ल पक्षातील पहिल्या गुरुवारपासून शेवटच्या गुरुवारपर्यंत गरीबांना पिवळा गोड भात दान करा. यामुळे धनलाभ होतो.







सुंदरे गुणमंदिरे करुणाकरे कमलोद्भवे
सिद्धचारण पूजिती जनवंदिते महावैश्णवे १
त्राहि हो मज पाही हो मज पाही हो महालक्ष्मी
हेमभावन रत्नकोन्दण हे सिंहासन आसनी २
एक एक विचित्र माणिक जोडिले मुकुटावरी
त्यासि देखुनी लोपला शशि चालला गगनोदरी ३
कुण्डले श्रवणी रवि शशि मंडळासम वर्तुळे
डोलता सुरनायकावरि हालताती चंचले ४
कंचुकी कुचमंडळावर हार चंपक रुळती
पारिजातक शेवती बटमोगरा आणि मालती ५
पिवळा पट तो कटी तटी वेष्टिल्या बरवे परी
सौदामिनीहुनी तेज अधिक ते शोभते उदरावरी ६
कमुकावर मन्मथे शरसज्जिल्या तैशा निर्या
गर्जती पद पंकजी किती नुपुरे आणि घागर्या ७
इंद्र चंद्र महेंद्र नारद पाद पंकज अर्पिती
कुंकुमागुरु कस्तूरी किती आदरे तुज चर्चिती ८
निर्जळे तुज पूजिता बहु शोभिसी कमलासनी
किती हो तुज वर्णु मी मज पाव हो कुलस्वामिनी ९
कोटि तेहतीस देवतांसवे घेऊनी विन्झणे करी
चामरे चिरपल्लवे तुज ढाळिती परमेश्वरी १०
नामामृत दे निरंतर याचकाप्रती गिरीसुते
जोडुनी कर विनवितो मज पाव हो वरदेवते ११
संकटी तुज वाचुनी मज कोण रक्षिल अम्बिके
कृष्णकेशव प्रार्थतो मज पाव हो जगदम्बिके १२
।। जय जगदम्ब उदयोस्तु अंबे उदयोस्तु।।

## प्रवेशद्वारावर कोहळा बांधा

जर आपली वास्तू बाधित असेल तर एक दोरीचे शिंकाळे आणावे. त्यात एक कोहळा ठेवून ते शिंकाळे प्रवेशद्वाराच्या आतील बाजूने खिळा मारून टांगुन ठेवावे. तो कोहळा सहा महिन्यांपर्यंत न कुजता राहिला पाहिजे. जर तत्पूर्वी कुजला तरी तो काढून वाहत्या पाण्यात सोडावा व शिंकाळ्यात नवीन कोहळा भरून ठेवावा. कोहळा जेव्हा सहा महिन्यांपेक्षा जास्त टिकला की वास्तू निर्दोष झाली याची खात्री बाळगावी.



## देवाला फुले अशी वाहा

फुले वाहताना अंगठ्याजवळचे बोट (तर्जनी) फुलाला लावू नये. अंगठा आणि मध्यमा (मधले बोट) या बोटांनी फूल उचलून देवाला वाहावे.



## कल्याण-शीळ रस्त्याच्या अर्धवट कामामुळे कारचा भीषण अपघात

■ कल्याण

**कल्याण-शीळ** रस्त्याचे काम काही ठिकाणी अर्धवट अवस्थेत आहे. रस्त्याच्या अर्धवट कामामुळे आज एका चारचाकी गाडीला पहाटेच्या सुमारास भीषण अपघात झाल्याची घटना घडली. या अपघातात गाडी दूरवर फेकली गेली. गाडीचा चालक सुदैवाने बचावला असला तरी गंभीर जखमी झाला आहे. या अपघातात चारचाकी गाडीचा चुराडा झाला आहे. या रस्त्यावर सातत्याने अपघात होत असल्याने नागरिकही हैराण झाले आहेत. या भीषण अपघाताच्या घटनेमुळे रस्त्याच्या अर्धवट कामाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. गाडी चालक आकाश पाटील हा आज पहाटे शीळहून कल्याणच्या दिशेने जात होता. या दरम्यान पांडुरंगवाडी नजीक रस्त्याचे काम अर्धवट आहे. त्याठिकाणी कंत्रटदाराने एक लोखंडी डिव्हायडर पत्रा लावला आहे. हा लोखंडी पत्रा लक्षात न आल्याने पाटील यांची गाडी त्याला जोराने धडकून रस्त्याच्या गटारीत जाऊन उलटी पडली. या रस्त्यालगत असलेल्या



एका दुकानात काही रहिवासी झोपले होते. अपघाताचा मोठा आवाज ऐकून त्यांनी रस्त्यावर धाव घेतली. यावेळी आणखी काहीजण आले. घटनास्थळी असलेल्या काहींनी गाडीतून आकाशला बाहेर काढले. त्यानंतर त्याला रुग्णालयात पाठविण्यात आले. ही घटना पहाटे तीनच्या सुमारास घडली.

## पद गेल्यावर कोणीही विचारत नाही

■ नाशिक

**मंत्री छगन भुजबळांचे मत**

**पद** गेल्यावर असे अनेक माजी मुख्यमंत्री आहेत की ज्यांना कोणी विचारत नाही, असे मत अन्नपुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केले आहे. तसेच मी शिवसेनेत किंवा काँग्रेसमध्ये असतो तर मुख्यमंत्री राहिलो असतो. मात्र, याची मला खंत नसून हे बाळासाहेब सुद्धा मान्य करायचे. लोकसंग्रह हा राजकारणात काम करणाऱ्या आमच्यासारख्यांची खरी संपत्ती आहे. जर लोक सोबत नसतील तर राजकारण संपलं असते, असेही भुजबळांनी यावेळी सांगितले. ओबीसींच्या कारणामुळे मी शिवसेना सोडली, असेही ते म्हणाले. तर त्यानंतर मला काँग्रेससह इतर पक्षांचंही आमंत्रण होतं. मुख्यमंत्री पदाचेही आश्वासन देण्यात आले होते. मात्र, मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार साहेबांची साथ पकडली आणि पवार साहेबांनी मला उपमुख्यमंत्री केलं. मुख्यमंत्री होण्याची मला अजिबात इच्छा नाही, असेही ते यावेळी म्हणाले. पद गेल्यावर असे अनेक माजी मुख्यमंत्री आहे की ज्यांना कोणी विचारत नाही. लोकांचं मला भरपूर प्रेम मिळतं. याशिवाय काल उद्धव ठाकरे यांनी फक्त दसऱ्याची फटकेबाजी केली नाही तर विविध विषयांवर ते बोलले. आपल्या घरात सात-आठ दिवस छापा सुरू आहे. हे कोणाला आवडत नाही, असे म्हणत केंद्रीय संस्थांकडून सुरू असलेल्या कारवाईवर भुजबळ यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच फडणवीस यांच्यात भ्रष्टाचार आरोप असलेला गुण हा उद्धव ठाकरे यांच्यात नाही.

फडणवीस हे क्लीन चिट मास्टर, हा अवगुण आहे, असे मी माजी मुख्यमंत्र्यांबद्दल नाही बोलू शकत, असा उल्लेख करत माजी मुख्यमंत्री यांना भुजबळ यांनी कोपरखळी लगावली आहे. यादरम्यान मुंढे भाऊ-बहीण यांच्यात कलगीतुरा सुरू असून कधीतरी शांत होईल, असे म्हणत त्यावर बोलणं टाळले.

## नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँक चोरट्यांनी फोडली

**नाशिक-** नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक फोडल्याचा प्रकार नाशिकच्या जायखेडा येथे काल मध्यरात्री घडला. मात्र, अनेक नाना प्रयत्न करूनही तिजोरीतील रोकड लांबवण्याचा चोरट्यांचा प्रयत्न फसला.त्यामुळे तिजोरीतील रक्कम चोरट्याना लांबवता आली नाही. या घटनेमुळे बँक कर्मचाऱ्यांमध्ये मात्र भीतीचे वातावरण आहे.

नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची जायखेडा येथील मुख्य बाजारपेठेत शाखा आहे. या बँकेत जवळपास दोन लाखांची रोकड होती. त्यात वीजबिल भरणा आणि इतर वसुलीच्या रकमेचा समावेश होता. चोरट्यांनी शुक्रवारी मध्यरात्री बँकेचे मुख्य शटर फोडले. इतर साहित्याची तोडफोड केली. मात्र, त्यांना बँकेची तिजोरी काही केल्या फोडता आली नाही. त्यामुळे ही रक्कम वाचली. दुसरीकडे या शाखेतील सीसीटीव्ही यंत्रणा आणि अलार्म बंद असल्याचे समोर आले आहे.

## रशियात कोरोनाचे पुन्हा थैमान दिवसभरात १ हजार बाधितांचा मृत्यू

■ मॉस्को

**रशियामध्ये** कोरोना महासाथीचा थैमान सुरूच असून बाधितांची आणि मृतांच्या संख्येत वाढ होत आहे. रशियात आज शनिवारी कोरोना महासाथीच्या आजारामुळे १००२ बाधितांच्या मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. रशियात कोरोनामुळे एकाच दिवसात बळी गेलेल्यांची ही सर्वाधिक संख्या आहे.

रशियात आतापर्यंत दोन लाख २२ हजार ३१५ जणांच्या मृत्यूची नोंद करण्यात आली. रशियात मागील काही महिन्यांमध्ये कोरोना महासाथीच्या आजाराने पुन्हा डोके वर काढले आहे. मागील काही दिवसांमध्ये सातत्याने बाधितांची संख्या वाढत आहे. रशियात आतापर्यंत ७९ लाख जणांना कोरोनाची लागण झाली आहे. युरोपीयन देशांमध्ये सर्वाधिक कोरोना बळींची संख्या रशियात नोंदवण्यात आली.

लसीकरणाकडे नागरिक पाठ फिरवत असल्याने बाधितांची आणि कोरोना बळींची संख्या वाढत असल्याचे अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. रशियन नागरिकांनी लसीकरणाकडे पाठ फिरवल्याने लसीकरण मोहिम धीम्या गतीने सुरू आहे.

रशियन नागरिकांमध्ये लशीबाबत संभ्रम, अविश्वासाचे वातावरण आहे. त्यामुळेच लसीकरणाकडे पाठ फिरवली जात आहे. रशियाकडून स्पुटनिक व्ही ही लस जगातील इतर देशांना पाठवण्यात येत आहे. मात्र, रशियातच कोरोनाबाधितांची संख्या वाढत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. जगभरात कोरोनाबाधितांची संख्या २४ कोटी झाली आहे. तर, ४८.८ लाख नागरिकांचा मृत्यू झाला आहे.

## डोंबिवलीत पेट्रोल पंपावर आग

■ डोंबिवली

**डोंबिवली** पश्चिमेतील हिंदुस्थान पेट्रोलियमच्या पेट्रोल पंपवरील सॅम्पल बकेटला भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना शनिवारी दुपारी घडली. आग लागताच पंपावरील वाहन धारकांची आणि कर्मचाऱ्यांची चांगलीच धावपळ उडाली. सॅम्पल बकेटला आग लागली असल्याने त्यावर लगेच नियंत्रण मिळविण्यात अग्निशमन दलास यश आले. या आगीत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

राजूनगर परिसरात हिंदुस्थान पेट्रोलियमच्या पेट्रोलपंपावर गाडीतून पेट्रोलचे सॅम्पल बकेटमध्ये ठेवण्यात आले होते. यावेळी अचानक बकेटमधील पेट्रोलने पेट घेतला. या आगीचा तो भडका उडताच वाहनधारक आणि कर्मचाऱ्यांची एकच धावपळ उडाली. पंपावरील कर्मचाऱ्यांनी तत्काळ अग्निशमन दलास फोन करून आगीची माहिती दिली. अग्निशमन दलाचे गाडी येईपर्यंत कर्मचाऱ्यांनी पंपावरील अग्निसुरक्षा साधनांनी आगीवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न सुरू केला. अग्निशमन दलाची एक गाडी घटनास्थळी दाखल होत काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळविले.

## काश्मीरमध्ये चकमकीत एलईटीच्या कमांडरसह २ दहशतवादी ठार

**पुलवामा-** शनिवारी जम्मू -काश्मीरच्या पम्पोरमध्ये सुरक्षा दलांनी केलेल्या चकमकीत दोन दहशतवादी ठार झाले. ठार झालेल्या दहशतवाद्यांपैकी एकाचे नाव उमर मुस्ताक खांडे असून तो लष्कर-ए-तय्यबा या दहशतवादी संघटनेचा दहशतवादी आहे. काश्मीर झोन पोलिसांनी सांगितले की, श्रीनगरच्या बाघाट येथे एसजीसीटी मोहम्मद युसूफ आणि सीटी सुहेल आह या दोन पोलिसांच्या हत्येमध्ये खांडेचा सहभाग होता. पुलवामा जिल्ह्यातील पंपोरमधील ड्रंगबल भागात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत लष्कर-ए-तैयबाच्या कमांडरसह दोन दहशतवादी ठार झाले. काश्मीरचे आयजी विजय कुमार म्हणाले की, श्रीनगरमधील बाघाट येथे दोन पोलीस कर्मचाऱ्यांच्या हत्येमध्ये आणि इतर दहशतवादी गुन्ह्यांमध्ये त्याचा सहभाग होता.

दरम्यान, शुक्रवारी संध्याकाळी श्रीनगरच्या बेमिना भागात अतिरेकी आणि सुरक्षा दलांमध्ये आणखी एक चकमक झाली. चकमकीत तंजील आणि शाहिद असे दोन दहशतवादी ठार झाले. श्रीनगरमधील रसायनशास्त्रज्ञ मखनलाल बिंद्रू आणि शिक्षक सुपिंदर कौल आणि दीपक चंद यांच्या नुकत्याच झालेल्या नागरी हत्येमध्ये ठार झालेले दहशतवादी सहयोगी होते.

दोन जिल्ह्यांतील दहशतवादविरोधी कारवायांविषयी बोलताना डीआयजी राजौरी-पुंछ रेंज विवेक गुप्ता म्हणाले की, आम्ही गेल्या २ महिन्यांपासून दहशतवाद्यांचा पाठलाग करत होतो

## वाहतूक पोलिसाला फरफटवणाऱ्या कार मालकाला दंड

■ पुणे, प्रतिनिधी

**वाहतूक** पोलिसाला कारच्या बोनेटवर लटकवत तब्बल ८०० फुट फरफटत नेले. ही घटना काल मुंढवा रोड खराडी बायपासवर घडली. याप्रकरणी मुंढवा पोलीस ठाण्यात कार चालकाविरुध्द खूनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रशांत श्रीधर कांतावर (४३) असे अटक केलेल्या कार चालक आरोपीचे नाव आहे.

याप्रकरणी पोलीस हवालदार शेषराव जायभाय यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी जायभाय हे सहायक पोलीस निरीक्षक राजगुरु यांच्या मार्गदर्शनाखाली चौकामध्ये वाहनांच्या पूर्वीच्या ऑनलाईन खटल्यांच्या दंडाची रक्कम वसूल करण्याची कारवाई करत होते. यावेळी प्रशांत कांतावार हे कार घेऊन आले. त्यांना पोलिसांनी थांबवले आणि थकीत दंडाची पूर्वीची ४०० रुपये रक्कम भरण्यास सांगितले. यावेळी त्याने जोरजोरात हॉर्न वाजवत 'एक भी पोलीस ढंग का नही, पैसे कमाने के लिए खडे हो क्या' असे म्हणत गाडी दामटण्याचा प्रयत्न केला. यावेळी जायभार यांनी त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला असता, ते गाडीच्या बोनेटवर ढकलले गेले.

ते गाडीच्या बोनेटवर लटकत असताना सुध्दा आरोपीने ८०० मीटर अंतरापर्यंत कार चालवली. यात जायभाय जखमी झाले.


**जाहिर नोटीस**

या जाहिराती द्वारे असे सूचित करण्यात येते की, गाळा नं. २७, एचडीआयएल, भांडुप, बी.एम.सी. मार्केट, चौथा मजला, भांडूप (प) मुंबई-४०००७८ या गाळ्याचे मालक कै. मोहम्मद शरीफ लकडवाला यांचे दि. ०५.०१.२०२० रोजी निधन झाले तरी त्यांच्या पश्चात त्यांची मुलगी श्रीमती. मरियम मसुद खान हे वारस हक्काने सदर पत्त्यावरील वरीलप्रमाणे एचडीआयएल बिल्डींग, गाळा नं. २७, हा गाळा त्यांचे नावे करण्याकरीता वर्तमान पत्रामध्ये जाहिरात देऊ इच्छितात. सदर खोली वरीलप्रमाणे वारस श्रीमती. मरियम मसूद खान यांचे नावे करण्यास कोणाचीही हरकत असल्यास ही जाहिरात केलेल्या तारखेपासुन (१५) पंधरा दिवसाच्या आत सोसायटी कार्यालयात संपर्क करावा व आपले म्हणणे मांडावे अन्यथा सदर गाळा वारसा हक्काने श्रीमती. मरियम मसूद खान यांचे नावे करण्यास कोणाचीही हरकत नाही असे समजण्यात येईल व वारसा हक्काने सदर गाळा श्रीमती. मरियम मसूद खान यांचे नावे करण्यात येईल याची नोंद घेणे. कळावे.

जाहिरातदार, श्रीमती. मरियम मसूद खान

ठिकाण: मुंबई  दिनांक: १७.१०.२०२१



**फॉर्म बी**
**जाहीर उद्घोषणा**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन १२)

**अल्टिमो फॅब्रिक्स प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता**

| | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | अल्टिमो फॅब्रिक्स प्रायव्हेट लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट ऋणकोच्या स्थापनेचा दिनांक | २०.१०.२०१५ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले | कॉर्पोरेट कामकाज मंत्रालय - रजिस्ट्रार ऑफ कंपनीज, मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट ऋणकोचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक/ मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U74110MH2015PTC269395 |
| ५. | कॉर्पोरेट ऋणकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | ३रा मजला, तोडी इस्टेट, पोस्ट ऑफीसच्या वर, सन मिल कंपाऊंड, लोअर परेल, मुंबई शहर महाराष्ट्र ४०००१३ भारत. |
| ६. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा दिनांक | २१.०९.२०२१ |
| ७. | कॉर्पोरेट ऋणकोचे परिसमापन सुरू होण्याचा दिनांक | आदेश दि. २१.०९.२०२१ रोजी निश्चित करण्यात आला, आरपी यांना परिसमापन आदेशाबाबत सूचनेचा ईमेल दि. १४.१०.२०२१ रोजी प्राप्त झाला. |
| ८ | परिसमापक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण पत्ता | नावः मृदुला ब्रॉडी नोंदणीकरण क्र.: IBBI/IPA-001/IP/P-01702/ 2019-2020/12681 |
| ९ | मंडळाकडे नोंदणीकृत असलेला परिसमापकाचा पत्ता आणि ई-मेल | पत्ताः कार्यालय क्र. ए-४०३, सिल्व्हर इस्टेट अपार्ट., रघुकूल क्रिएशन, मनिष नगर, नागपूर-४४००१५. ईमेल आयडी: camrudulkejdiwal@gmail.com |
| १० | परिसमापकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | पत्ताः कार्यालय क्र. ए-४०३, सिल्व्हर इस्टेट अपार्ट., रघुकूल क्रिएशन, मनिष नगर, नागपूर-४४००१५. ईमेल आयडी: liquidation.ultimofabrics@gmail.com |
| ११ | दावा सादर करण्याचा अंतिम दिनांक | १३.११.२०२१ (आरपी यांच्याकडून परिसमापन सुरु होण्याबाबत सूचना देणाऱ्या ईमेल द्वारे आदेश दि. १४.१०.२०२१ रोजी प्राप्त) |

याद्वारे सूचना देण्यात येते की, मान. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण (मुंबई खंडपीठ) यांनी दि. २१.०९.२०२१ रोजी मे. अल्टिमो फॅब्रिक्स प्रायव्हेट लिमिटेडचे परिसमापन सुरु करण्याचे आदेश दिले आहेत. संकेताच्या कलम ३३ अन्वये परिसमापनाचा आदेश आरपी यांच्याकडून ईमेलद्वारे दि. १४.१०.२०२१ रोजी प्राप्त झाला.

याद्वारे मे. अल्टिमो फॅब्रिक्स प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांना त्यांचे दावे पुराव्यासह दि. १३.११.२०२१ रोजी किंवा त्यापूर्वी (आदेश प्राप्त झाल्याचा दिनांक म्हणजेच १४.१०.२०२१ पासून गणना केला गेलेला ३० दिवसांचा कालावधी) परिसमापकांकडे बाब क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे. वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुरावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व भागधारक त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करु शकतात.
दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

सही/-
मृदुला ब्रॉडी
परिसमापक

दिनांक : १६.१०.२०२१
ठिकाण : नागपूर
नोंद. क्र. IBBI/IPA-001/IP/P-01702/2019-2020/12681

# तेलाचे आंतरराष्ट्रीय दर कमी झाले तरी पेट्रोल आणि डिझेल महागच

## शरद पवारांनी केंद्र सरकारवर साधला निशाणा

■ पिंपरी

**राष्ट्रवादी** काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज दिवसेंदिवस वाढत जाणार्या पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतींवरून केंद्र सरकारवर पुन्हा निशाणा साधला. तेलाचे आंतरराष्ट्रीय दर कमी झाले आहेत. तरी केंद्र सरकारने पेट्रोल-डिझेलच्या किंमती कमी केलेल्या नाहीत. सर्वसामान्य नागरिकांबाबत केंद्र सरकारला आस्था नाही, अशी टीकाही शरद पवार यांनी यावेळी केली. या सोबतच विविध मुद्यांवरून शरद पवार यांनी मोदी सरकारला लक्ष्य केले. शरद पवार हे आज पिंपरी-चिंचवड दौर्यावर आले होते.

यावेळी आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना ते म्हणाले की, सामान्य लोकांचे प्रश्न वाढत आहेत आणि केंद्रातील सत्ता ज्यांच्या हातात आहे त्यांना त्या प्रश्नांसंबंधी आस्था नाही. आपण बघतो आहोत, साधारण दररोज पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती काहीना काही वाढताना दिसत आहेत, असे कधी घडले नव्हते. केंद्र सरकारच्यवतीने सांगण्यात येते की आंतराराष्ट्रीय बाजारपेठेतील किंमतीचा हा परिणाम आहे. पण मला आठवतय, साधारण सहा महिन्यांपूर्वी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील किंमती एकदम खाली आल्या पण केंद्र सरकारने या देशातील पेट्रोलच्या किंमती कमी केल्या नाहीत किंवा जगभरातील पेट्रोल निर्माण करणार्या देशांच्या किंमतींमध्ये घसरण होत असताना, इथे मात्र किंमती वाढत राहिल्या. मनमोहन सिंग यांचे जेव्हा सरकार होते त्या सरकारमध्ये मी होतो आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पेट्रोलच्या किंमती वाढल्या म्हणून आम्हाला किंमती वाढवायचा निर्णय घ्यावा लागला. हा निर्णय घेतल्यानंतर दहा दिवस सलग संसदेचे कामकाज चालू न देण्याची भूमिका ही भाजपाने विरोधी पक्ष म्हणून तेव्हा घेतली होती आणि आज स्वतः चा पक्ष सत्तेवर असताना दररोज पेट्रोल-डिझेलच्या किंमती वाढवल्या जात आहेत. सामान्य माणसाला महागाईच्या संकटात अधिक ढकलण्याचे काम केले जात आहे असा आरोपही यावेळी पवारांनी केला.

ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्र सरकारकडून कोळसा पुरवठा करण्यासाठीचे ३ हजार कोटीचा रुपये आले नाही. त्यामुळे केंद्राला अडचणीला तोंड द्यावे लागत असल्याने कोळसा पुरवठा करण्यात आला नसल्याचे सांगितले. मी याबाबतची माहिती घेतली. ३ हजार कोटी देणे आहे हे खरे आहे. त्यातील १४०० कोटी रुपये आज किंवा उद्या सरकार देणार आहे. महाराष्ट्राकडून कोळशाची किंमत द्यायला उशीर झाला म्हणून आरोप करतात. दुसर्या बाजूला जीएसटीचे ३५ हजार कोटीचे देणे केंद्राकडे आहे. ते देत नाही. एका बाजूला ३५ हजार कोटी रुपये थकवायचे आणि तीन हजार कोटीसाठी कोळसा पुरवठा करायचा नाही. महाराष्ट्र सरकारवर दोषारोप करणे योग्य नसल्याचेही पवार म्हणाले. तसेच अजित पवारांच्या बहिणींच्या घरी जाऊन आयकर विभागाच्या अधिकार्यांनी धाडी टाकल्या. तिथे जाऊन मी चौकशी केली. कागदपत्र पाहिली. त्यातून काही निष्पन्न होईल असे मला वाटत नाही. त्यांच्या घरी ५ दिवस १४ ते १५ लोकं छापेमारीसाठी गेले होते. त्याचे वागणे वाईट होते असे नाही. त्याबद्दल तक्रार नाही. त्यांना हाती काही लागले नाही तरी त्यांना तिथे थांबवण्यात आले. ते बिचारे शांतपणे पुढील आदेश येईपर्यंत बसून राहिले. मध्यमवर्गीय माणसाच्या घरी असे पाच-पाच दिवस येऊन राहणे किती योग्य आहे? असा सवालही पवारांनी केला. उध्दव ठाकरे हे मुख्यमंत्री होण्यास तयार नव्हते. माझ्या आग्रहाखातर ते मुख्यमंत्री झाले, असा खुलासाही शरद पवारांनी यावेळी केला. तसेच मविआचे हे सरकार ५ वर्षाचा कालखंड पूर्ण करेल. जनतेचा विश्वास आणि पाठिंब्याने पुन्हा एकदा राज्यात सत्तेवर येईल असेही पवारांनी म्हटले.

# स्वच्छता कामगारांसाठी बांधलेल्या घरांत मुंबई महापालिकेत १८४४ कोटींचा घोटाळा

■ मुंबई

**मुंबई** महानगरपालिका अधिनियम १८८८, उपनियम ६१ अन्वये मुंबई स्वच्छ ठेवणे हे मुंबई महानगरपालिकेचे बंधनकारक कर्तव्य आहे, तसेच मुंबईतील बांधकाम कचरा काढून टाकणे हे एक बंधनकारक कर्तव्य आहे. अद्वितीय काम आणि कामाच्या वातावरणामुळे सफाई कामगारांना आरोग्यासारख्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. तरीही आपले सफाई कामगार त्यांच्या आरोग्याची काळजी करत नाहीत आणि मुंबईला निरोगी ठेवण्यात आयुष्य घालवतात. त्यांचे जीवन सुकर करण्यासाठी राज्य सरकारने डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रम सफाई आवास योजनेंतर्गत स्वच्छता कामगारांसाठी मोफत घर आणि डीसीपीआर १४/३४ मध्ये नियम ३ (२०) अंतर्गत ४ -एएसआयची तरतूद करण्याचा आदेश जारी केला आहे. परंतु सत्ताधारी शिवसेना आणि महापालिकेतील अधिकार्यांच्या संगनमताने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी श्रम सफाई आवास योजनेऐवजी निवारा योजनेअंतर्गत सेवा कालावधीपर्यंतच घरे देण्याची योजना आणली आहे. ही योजना राज्य सरकारला मोफत घरे देण्याच्या संकल्पनेचे उल्लंघन आहे आणि स्वच्छता कर्मचार्यांची फसवणूक करणे, योजनेचे नाव बदलून भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने आश्रय योजनेत बदल करणे हा बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान असलल्याचा आरोप मुंबई मनपातील भाजपाचे पक्षनेते विनोद मिश्रा यांनी केला आहे. ही योजना फक्त आणि फक्त भ्रष्टाचाराला आश्रय देणारी आहे. मुंबई आणि उपनगरातील ११ पॅकेट्सच्या बिल्ट आणि डिझाईन टर्नकी प्रकल्पाच्या आधारावर, सप्टेंबर २०१९ मध्ये निविदा काढण्यात आली होती. ती निविदा प्रशासनाने फेब्रुवारी २०२० मध्ये रद्द केली होती. परंतु जेव्हा १८ मार्च २०२० रोजी महाराष्ट्रात संचार बंदी घोषित करण्यात आली , तो २ दिवसांचा भाग होता. २० मार्च २०२० ला प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सर्वांना माहित आहे की, २४ मार्च २०२० रोजी संपूर्ण देशामध्ये राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन नियमांनुसार, तसेच २५ मार्च रोजी, राज्याचे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी संचारबंदी लागू केली. वर्तमान पेपर आणि प्रकाशकासोबत बैठक, पेपर छापू नये. विनंती केली, संपूर्ण ३ महिने अत्यावश्यक सेवा वगळता सर्व लोकांसाठी दळणवळण बंद होते, अशा परिस्थितीत, २८ एप्रिल २०२० रोजी, नवीन अटींसह, निविदा होती फक्त एमसीजीएमच्या पोर्टलवर प्रकाशित झाले. भाजपचा प्रश्न आहे की प्रत्येकजण आपापल्या घरात आहे. जेव्हा ते बसले होते, तेव्हा सत्ताधारी आणि प्रशासन स्वच्छता कामगारांच्या निवासस्थानाच्या नावाखाली लूट करण्याचा विचार करत होते.

गट ११ मधील दोन गट पुढे ढकलण्यात आले आहेत. ९ गटांसाठी सुमारे ३,३०० कोटींची निविदा आली, ज्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार आणि उदाहरण गट क्रमांक (२) बीड क्रमांक-११०० १७६० गट क्रमांक (३) बीड क्रमांक- ७१० ० १७७ ५६१ डीसीपीआर ३३ आश्रय योजनेसाठी (२०) ४ एफएसआय अंतर्गत अंदाजे क्षेत्र ४५५ ७ ० वर्ग/मीटर आणि बांधकाम खर्च प्रति ४६८८७ चौरस/मीटर एकूण २१३ ६६४५ ९०८३ रुपये. सायोना कॉर्पोरेशनने भरलेले एकूण क्षेत्र ११३ २६२ स्के.मी. दर ६३३३३ स्के.मी., गटासाठी क्षेत्र (३) १३४ ३२९ स्के.मी. धरणाच्या कामाची किंमत ६३३३३ रुपये स्के.मी. प्रश्न आहे जेव्हा ५ दिवसांपूर्वी शिओना कॉर्पोरेशनने रु. ३७९ ३.८९ आणि ४०८३ ७ चौरस मीटर. ६ निविदाकारांना फक्त योजना सादर केल्यावर ५ टक्के दिले गेले होते, तर दर कमी झाल्यानंतरही योजना पारित झाल्यानंतर दोन गटांना १ टक्के दिले जातील, जे संविधानाच्या डीएल अनुच्छेद ४३ आणि भारतीय करारामध्ये भेदभाव आहे. १८७२ चे उल्लंघन. ८ गटांमध्ये सुमारे १८४४ कोटींचा भ्रष्टाचार झाला आहे, चार्ट संलग्न आहे. त्याच वेळी, सीव्हीसी मार्गदर्शक तत्त्वांचे, माननीय उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचेही उल्लंघन झाले आहे, तर पालिकेकडे वास्तुविशेष आहे, डीपी विभाग इमारत प्रस्ताव विभाग आहे, नंतर क्षेत्र बांधकामाचा निर्णय आधी योजना मंजूर करून घेतला पाहिजे ठेकेदाराने नाही. नगरपालिकेने ठरवलेल्या क्षेत्राच्या ३ पट, केवळ निविदा कारमध्ये आणि केवळ ५ टक्के आगाऊ पेमेंटसाठी, ज्यामुळे प्लॉट सादर केल्यावर पालिकेने सुमारे १२५ कोटी दिले आहेत जे प्लॉटच्या क्षमतेच्या १० ते १२ पट आहे. भाजपने तात्पुरत्या समितीमध्ये या लुटीच्या प्रस्तावाला विरोध केला आणि मतदान मागितले पण शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसने बहुमताने प्रस्ताव पारित केला आणि यामुळे उद्या जर मुंबई महानगरपालिकेनुसार योजनेचे क्षेत्र मंजूर झाले ३३ (२०) महानगरपालिकेने जे प्रस्तावित केले आहे. त्यापेक्षा कमी, मग सुमारे रुपयांची वसुली कशी होईल? भाजपाची मागणी अशी आहे की, बाबासाहेब आंबेडकर श्रम सफळ योजनेंतर्गत मुंबईसाठी पिढ्यान् पिढ्या काम करणार्या सफाई कामगारांना त्यांच्या मालकीच्या आधारावर मोफत घरे देण्यात यावीत.

मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, महापौर आणि मुख्य सचिव, महाराष्ट्र सरकारला विनंती आहे की स्वच्छता कामगारांच्या नावाने १८४४ कोटींची लूट त्वरित थांबवा आणि डीसीपीआर ३३ येथे योजना पास केल्यानंतर महानगरपालिकेचा सर्वात कमी दर. (२०) निश्चित धरणाच्या कामांसाठी द्यावे. या दरोड्यात, अधिकार्यापासून सनदी अधिकारी आणि कंत्राटदारापर्यंत, कृपया न्यायालयीन चौकशी करून किंवा लोकायुक्त चौकशी करून कारवाईचे आदेश द्या. यामध्ये, सौदेबाजी आणि सनदी अधिकार्यांपासून माननीय आरोग्य आयुक्तांपर्यंत, म्हणून, कॅबिनेट सचिव, भारत सरकार आणि मुख्य दक्षता अधिकारी याबद्दल तक्रार करतील. भाजपाचा असा विश्वास आहे की आर्थिक क्षमता नसतानाही शाओना कॉर्पोरेशनला सुमारे १४०० कोटींचे कंत्राट देण्यात आले आहे, त्याचीही चौकशी झाली पाहिजे, असेही मिश्रा यांनी म्हटले.

## कोरोनाची दुसरी लाट असतानाच कंत्राटदाराशी बोलणी करण्याचे आदेश

एप्रिलमध्ये जेव्हा कोरोनाची दुसरी लाट शिगेला होती आणि सामान्य मुंबईकर ऑक्सिजन बेडच्या अभावामुळे आपला जीव गमावत होते तेव्हा २६ एप्रिल २०२१ रोजी अतिरिक्त आयुक्त प्रकल्पाने विभागाला कंत्राटदार शायोना कॉर्पोरेशनशी बोलणी करण्याचे आदेश दिले. बैठकीनंतर १० मे २०२१ रोजी अतिरिक्त आयुक्तांनी धरणाच्या कामाचा दर ६३३३३ स्के.मी ते ५२४४५ स्के.मी.पर्यंत निश्चित केला. परिणाम नंतर शायोना कॉर्पोरेशनला गट (२) साठी ५९४.१ १ली आणि रु. एकूण धरणाच्या कामाची किंमत मिळाली ७०४.२ ७ कोटी रुपये निश्चित करण्यात आले होते. तर मनपाने लोकमान्य टिळक रुग्णालयातील कर्मचार्यांच्या निवासासाठी निविदा काढली होती. ज्यात ४ लोकांनी भाग घेतला होता. शेओना कॉर्पोरेशन ३७९३ चौरस फूट दराने सर्वात कमी निविदाधारक होती. हे निविदा निवारा योजनेच्या गट (२) आणि गट (३) च्या ५ दिवस आधी उघडले ज्यात एकूण बांधकाम ३२११८० चौरस फूट आहे आणि एकूण खर्च १२१८५ कोटी आहे.

# आरोग्य विभागाच्या परिक्षेचा गोंधळ एकाच दिवशी दोन जिल्ह्यांमध्ये पेपर

■ मुंबई

**येत्या** २४ ऑक्टोबरला होणार्या आरोग्य विभागाच्या परिक्षेचे हॉल तिकीट विद्यार्थ्यांना मिळण्यास सुरुवात झाली आहे. मात्र या परिक्षे संदर्भातील सावळागोंधळ काही थांबायचे नाव घेत नाही. हॉल तिकीटच्या सेंटरवरून पुन्हा एकदा गोंधळ झाल्याचे समोर आले आहे. एकाच दिवशी दोन परिक्षांसाठी दोन वेगवेगळ्या जिल्ह्यांत परिक्षा केंद्रे विद्यार्थ्यांना आली आहेत. यामुळे विद्यार्थी संभ्रमात पडले आहेत. गेल्या आठवड्यात होणारी आरोग्य विभागाची परिक्षा ऐनवेळी नियोजन होऊ न शकल्याने पुढे ढकलण्यात आली होती आणि या परिक्षेची तारीख २४ व ३१ ऑक्टोबर जाहीर करण्यात आली होती. २४ ऑक्टोबरला होणार्या आरोग्य विभागाच्या परिक्षेचे हॉल तिकीट ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांना प्राप्त होत आहेत. यातील काही हॉल तिकिटांमध्ये विद्यार्थ्यांनी दोन वेगळ्या पदांच्या परिक्षेसाठी अर्ज केले आहेत. या विद्यार्थ्यांचे परिक्षेचे दोन पेपर एकाच दिवशी आयोजित करण्यात आले आहेत. त्यामुळे एकाच परिक्षा केंद्रात हे दोन पेपर होणे अपेक्षित होते. मात्र दोन्ही परिक्षेचे केंद्र दोन वेगळ्या जिल्ह्यांत देण्यात आले आहेत. शिवाय एक सकाळचा परिक्षेचा पेपर सकाळी १० ते दुपारी १२ दरम्यान तर दुपारच्या दुसऱ्या परिक्षेसाठीचा पेपर दुपारी ३ ते ५ या दरम्यान आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी दोन पेपर देण्यासाठी मधल्या दोन ते तीन तासांत दोन जिल्ह्यांमध्ये दीडशे ते दोनशे किलोमीटर अंतर पार करणे शक्य नसल्याने हे पेपर एकाच दिवशी कसे द्यायचे असा प्रश्न उपस्थित केला आहे. तर काही विद्यार्थ्यांनी अर्ज भरताना पर्याय म्हणून जवळच्या जिल्ह्यातील केंद्र मिळावे असे नमूद केले होते. तरीही दूरच्या जिल्ह्यांमध्ये विद्यार्थ्यांना परिक्षा केंद्र देण्यात आली आहेत. याबाबत एका विद्यार्थ्यांने बोलताना सांगितले की, मी राहतो नगर जिल्ह्यात आणि केंद्र आलेय सातारा आणि सांगलीत. मी माझ्या जिल्ह्याला पहिले प्राधान्य दिले असताना परीक्षा केंद्र इतके लांब कसे आले.

## भोंगळ कारभाराने विद्यार्थी संभ्रमात

# पुणे-मुंबई सिंहगड एक्स्प्रेस सोमवारपासून पुन्हा धावणार




पुणे, प्रतिनिधी- कोरोनामुळे स्थगित केलेली पुणे-मुंबई सिंहगड एक्स्प्रेस सोमवार १८ ऑक्टोबरपासून पुन्हा सुरू होणार आहे. यामुळे पुणे-मुंबई-पुणे दरम्यान दररोज ये-जा करणार्या नागरिकांना दिलासा मिळणार आहे. कोरोनामुळे मार्च महिन्यात रेल्वेने नियमित सेवा स्थगित केली होती. टप्प्याटप्प्याने विविध मार्गांवरील सेवा सुरू झाल्या. मात्र, सिंहगड एक्स्प्रेस अजूनही होती. अखेर सिंहगड एक्स्प्रेसला पुन्हा एकदा ग्रीन सिग्नल मिळाला आहे. सोमवार १८ ऑक्टोबरपासून पुण्याहून रोज सकाळी ६ वाजून ५ मिनिटांनी रेल्वे सुटणार असून, ९ वाजून ५५ मिनिटांनी सीएसएमटी (मुंबई) येथे पोहोचणार आहे. तर सीएसएमटी येथून सायंकाळी ५ वाजून ५० मिनिटांनी एक्स्प्रेस सुटणार असून, रात्री ९ वाजून ५० मिनिटांनी पुण्यात पोहोचणार आहे. ही रेल्वे दादर, ठाणे, कल्याण, कर्जत, लोणावळा, चिंचवड, पिंपरी, खडकी आणि शिवाजीनगर येथे थांबणार आहे.

# एमबीए पास करून देण्याची हमी देणाऱ्या दलालास अटक

■ पुणे, प्रतिनिधी

**आंतरराष्ट्रीय** स्तरावरील एमबीएची प्रवेश परिक्षा पास करून देण्याची हमी देणार्या दलालास पुणे सायबर पोलिसांनी अटक केली आहे. आरोपी ठराविक गुणांप्रमाणे अडीच ते चार लाख रुपये आकारत होता. अभय मिश्रा (रा. मानगो, जमशेदपूर, झारखंड) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपीकडून एक लॅपटॉप, एक मोबाईल फोन, ४ पेनड्राईव्ह, ४ डेबीट कार्ड व इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांना परदेशात एमबीएसाठी प्रवेश घ्यावयाचा असल्याने त्यांनी सोशल नेटवर्किंग साईटवर जीमॅट या एमबीए पूर्व परिक्षेबाबत सर्च केले असता त्यांना GMAT_GRE_SHORTCUT ही इन्स्टाग्राम प्रोफाईल दिसून आली. त्यामध्ये प्रवेशाकरिता असणार्या जीमॅट या पूर्व परिक्षेमध्ये १०० टक्के चांगल्या गुणांची हमी देण्यात आली होती. त्यानुसार फिर्यादी यांनी सदर इन्टाग्राम प्रोफाईलच्या माध्यमातून प्रोफाईल धारकाशी संपर्क साधून सर्व प्रक्रिया पूर्ण केली.

त्यानुसार ७५० पेक्षा अधिक गुणांकरिता ४ लाख, ७४० पेक्षा अधिक गुणांकरिता ३ लाख ७० हजार, ७३० पेक्षा अधिक गुणांकरिता ३ लाख ५० हजार, ७२० पेक्षा अधिक गुणांकरिता ३ लाख, ७१० पेक्षा अधिक गुणांकरिता २ लाख सत्तर हजार आणि ७०० पेक्षा अधिक गुणांकरिता २ लाख ५० हजार असे रेट असल्याचे आरोपीने सांगितले.

आरोपीने फिर्यादीच्या संगणकाचा ऐनीडेस्क, डीडब्ल्यू सर्व्हिसेस व वुई ट्रान्सफर या ऍप्लीकेशनद्वारे ऍक्सेस घेऊन आंतराष्ट्रीय एमबीएची पूर्व परिक्षा फिर्यादी हेच देत आहेत असे भासवून पूर्व परिक्षा दिली. त्यामध्ये फिर्यादी यांना खरोखरच ८५० पैकी ७७० गुण मिळाले. त्यामुळे यातील आरोपी यांनी फिर्यादी यांच्याकडे वारंवार ४ लाख रूपयांची मागणी केली. परंतु फिर्यादी यांना रक्कम द्यावयाची नसल्याने व वरील सर्व प्रकार हा फसवणुकीचा वाटल्याने त्यांनी तक्रार दाखल केली.

# आंबेवाडीमध्ये मुलीचा शेततळ्यात बुडून मृत्यू



■ नाशिक

**माशांना** खाऊ टाकणारी मुलीचा पाय घसरून शेततळ्यात पडून मृत्यू झाल्याची घटना आंबेवाडी येथे शनिवारी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. उर्मिला बोराडे असे मृत मुलीचे नाव आहे.

येवला तालुक्याच्या विसापूर हद्दीतील आंबेवाडी येथे उर्मिला बोराडे ही मुलगी आपल्या घरातील शेततळ्यात माशांना खाऊ टाकत होती. ती नेहमीच माशांना खावू टाकायची. मात्र, स्वतःच्या तंद्रीत असताना तिचा पाय अचानक घसरला. त्यामुळे ती शेततळ्यात पडली. यावेळी घरात किंवा तिच्याजवळ कोणीही नव्हते. त्यामुळे ती शेततळ्यात पडल्याचेही कुणाला समजले नाही. अखेर खूप शोधाशोध केली. तेव्हा तिचा मृतदेह शेततळ्यात सापडला. दरम्यान, यापूर्वी नाशिक जिल्ह्यात दोन भावांचा बुडून मृत्यू झाला होता. गेल्या आठवड्यात हर्षल आणि सार्थक ही दोन्ही मुले शेतात गेली. या मुलांनी शेतात येताच आपला मोर्चा शेततळ्याकडे वळवला. त्यांना पाण्याच्या खोलीचा अंदाज आला न आल्याने तो गटांगळ्या खाऊ लागला. त्यातच त्यांचा बुडून मृत्यू झाला.

# इंडोनेशियात नदी स्वच्छता मोहिमेत २१ मुले बुडाली

■ जकार्ता

**इंडोनेशियातील** पश्चिम जावा प्रांतात काल नदी स्वच्छता मोहीम राबवण्यात आली होती. या ठिकाणी शाळेच्या सहलीदरम्यान २१ विद्यार्थी बुडाल्याची धक्कादायक घटना घडली. यातील १० विद्यार्थ्यांना वाचवण्यात आल्याची माहिती स्थानिक अधिकाऱ्यांनी दिली आहे.



स्थानिक अधिकार्यांनी सांगितले की, इस्लामिक ज्यूनियर हायस्कूलचे विद्यार्थी काल सीलियूर नदीच्या काठावर स्वच्छता मोहिमेत भाग घेत असताना २१ विद्यार्थी घसरले आणि नदीत पडले. त्यानंतर तात्काळ जवळपासच्या रहिवाशांनी आणि बचाव पथकांनी धाव घेत १० विद्यार्थ्यांना बुडताना वाचवले. यावेळी बचाव पथकांनी विद्यार्थ्यांना वाचविण्यासाठी मोठ्या बोटींचा वापर केला. रात्री उशिरापर्यंत नदीत बुडालेल्या विद्यार्थ्यांचा शोध घेण्यात येत होता. या विद्यार्थ्यांना उपचारासाठी जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# कोट्यवधी रुपयांची सांस्कृतिक भवनाची मिळकत अखेर महाबळेश्वर पालिकेकडे

■ महाबळेश्वर

**सुमारे** २० वर्षांपासून अर्धवट बांधकाम होऊन भाडेकरारावर देऊनही धूळ खात पडलेली महाबळेश्वर पालिकेच्या मालकीची सांस्कृतिक भवनाची मिळकत अखेर पालिकेच्या ताब्यात आली आहे. पालिकेच्या मुख्याधिकारी पल्लवी पाटील यांनी धडक कारवाई करत केलेल्या या कामगिरीचे सर्वसामान्य नागरिकांनी स्वागत केले आहे. यावेळी नगराध्यक्ष स्वप्नाली शिंदे, उपनगराध्यक्ष अफझल सुतार, नगरसेवक पालिका अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

पालिकेची ही मिळकत ११ हजार २३० चौमी इतकी यातील ३ हजार ५०७ चौमी क्षेत्र सांस्कृतिक भवनासाठी राखीव ठेवले होते.त्याचे बांधकाम सुरु झाले .पण ते अर्धवट राहिले.नंतर खर्च वाढत गेल्याने आहे त्या स्थितीतील ही इमारत भाडे करारावर मे.लँडमार्क इन प्रा.लि. मुंबई या कंपनीला देण्यात आली. अर्धवट बांधकाम पूर्ण केल्यानंतर हा करार लागू होणार होता.

## मुख्याधिकाऱ्यांची धडक कारवाई

करारानुसार या कंपनीने पालिकेकडे अनामत रक्कम म्हणून२५ लाख,भाडे रक्कम ५० लाख ४४ हजार, करार रक्कम १४ लाख ५६ आणि बँक गॅरंटी ७३ लाख रुपये असे एकूण १ कोटी ६३ लाख रुपये जमा केले होते.तसेच उर्वरित ७२ लाख ७५ हजार २७० रुपये पालिकेला येणे बाकी होते. पण नंतर भाडेकरूने भाडेही दिले नाही आणि इमारत वापरलीही नाही. त्यामुळे ही मिळकत अशीच धूळ खात पडली होती. पालिका आणि भाडेकरूमध्ये वाद होऊन हे प्रकरण न्यायालयात गेले. न्यायालयात वेळोवेळी सुनावणी होऊनही या मिळकतीचा ताबा कुणाकडे राहील याबाबत काही निर्णय घेतला गेला नाही.त्यामुळे अखेर पालिकेच्या मुख्याधिकारी पल्लवी पाटील,वाई उपविभागीय अधिकारी राजेंद्र जाधव आणि तहसीलदार सुषमा चौधरी यांनी संयुक्तपणे या अर्धवट बांधकाम असलेल्या पण कोट्यवधी रुपयांची किंमत असलेली ही मिळकत ताब्यात घेतली.आता ही इमारत आणि परिसर नागरिकांच्या सोयीसाठी उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे मुख्याधिकारी पल्लवी पाटील यांनी म्हटले आहे.

# जॅकलीन फर्नांडिस ईडी चौकशीला पुन्हा गैरहजर

■ मुंबई

**सुकेश** चंद्रशेखर मनीलॉन्ड्रिंग प्रकरणात ईडीने चौकशीसाठी हजर राहण्याचे समन्स बजावले असतानाही आज पुन्हा अभिनेत्री जॅकलीन फर्नांडिस चौकशीला गैरहजर राहिली. त्यासाठी तिने कामाचे कारण दिले. ईडीने तिला बजावलेली ही तिसरी नोटिस होती.



मनीलाँड्रिंग प्रकरणात जॅकलीन फर्नांडिसची ऑगस्टमध्ये ईडी चौकशी झाली होती. त्यावेळी तिचा जबाब नोंदवून घेतला होता. त्यानंतर काल शुक्रवारी तिला पुन्हा चौकशीसाठी बोलावले होते. परंतु ती गैरहजर राहिली. याशिवाय आज शनिवारी १६ ऑक्टोबरला तिला पुन्हा चौकशीसाठी बोलावले होते. परंतु कामाचे कारण देत ती आज पुन्हा गैरहजर राहिली.

# तेलाचे आंतरराष्ट्रीय दर कमी झाले तरी पेट्रोल आणि डिझेल महागच

## शरद पवारांनी केंद्र सरकारवर साधला निशाणा

■ पिंपरी

**राष्ट्रवादी** काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतींवरून केंद्र सरकारवर पुन्हा निशाणा साधला. तेलाचे आंतरराष्ट्रीय दर कमी झाले आहेत. तरी केंद्र सरकारने पेट्रोल-डिझेलच्या किंमती कमी केलेल्या नाहीत. सर्वसामान्य नागरिकांबाबत केंद्र सरकारला आस्था नाही, अशी टीकाही शरद पवार यांनी यावेळी केली. या सोबतच विविध मुद्यांवरून शरद पवार यांनी मोदी सरकारला लक्ष्य केले. शरद पवार हे आज पिंपरी-चिंचवड दौऱ्यावर आले होते.

यावेळी आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना ते म्हणाले की, सामान्य लोकांचे प्रश्न वाढत आहेत आणि केंद्रातील सत्ता ज्यांच्या हातात आहे त्यांना त्या प्रश्नांसंबंधी आस्था नाही. आपण बघतो आहोत, साधारण दररोज पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती काहीना काही वाढताना दिसत आहेत, असे कधी घडले नव्हते. केंद्र सरकारच्यावतीने सांगण्यात येते की आंतराराष्ट्रीय बाजारपेठेतील किंमतीचा हा परिणाम आहे. पण मला आठवतय, साधारण सहा महिन्यांपूर्वी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील किंमती एकदम खाली आल्या पण केंद्र सरकारने या देशातील पेट्रोलच्या किंमती कमी केल्या नाहीत किंवा जगभरातील पेट्रोल निर्माण करणाऱ्या देशांच्या किंमतींमध्ये घसरण होत असताना, इथे मात्र किंमती वाढत राहिल्या. मनमोहन सिंग यांचे जेव्हा सरकार होते त्या सरकारमध्ये मी होतो आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पेट्रोलच्या किंमती वाढल्या म्हणून आम्हाला किंमती वाढवायचा निर्णय घ्यावा लागला. हा निर्णय घेतल्यानंतर दहा दिवस सलग संसदेचे कामकाज चालू न देण्याची भूमिका ही भाजपाने विरोधी पक्ष म्हणून तेव्हा घेतली होती आणि आज स्वतः चा पक्ष सत्तेवर असताना दररोज पेट्रोल-डिझेलच्या किंमती वाढवल्या जात आहेत. सामान्य माणसाला महागाईच्या संकटात अधिक ढकलण्याचे काम केले जात आहे असा आरोपही यावेळी पवारांनी केला.

ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्र सरकारकडून कोळसा पुरवठा करण्यासाठीचे ३ हजार कोटीचा रुपये आले नाही. त्यामुळे केंद्राला अडचणीला तोंड द्यावे लागत असल्याने कोळसा पुरवठा करण्यात आला नसल्याचे सांगितले. मी याबाबतची माहिती घेतली. ३ हजार कोटी देणे आहे हे खरे आहे. त्यातील १४०० कोटी रुपये आज किंवा उद्या सरकार देणार आहे. महाराष्ट्राकडून कोळशाची किंमत द्यायला उशीर झाला म्हणून आरोप करतात. दुसर्या बाजूला जीएसटीचे ३५ हजार कोटीचे देणे केंद्राकडे आहे. ते देत नाही. एका बाजूला ३५ हजार कोटी रुपये थकवायचे आणि तीन हजार कोटीसाठी कोळसा पुरवठा करायचा नाही. महाराष्ट्र सरकारवर दोषारोप करणे योग्य नसल्याचेही पवार म्हणाले. तसेच अजित पवारांच्या बहिणींच्या घरी जाऊन आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी धाडी टाकल्या. तिथे जाऊन मी चौकशी केली. कागदपत्र पाहिली. त्यातून काही निष्पन्न होईल असे मला वाटत नाही. त्यांच्या घरी ५ दिवस १४ ते १५ लोकं छापेमारीसाठी गेले होते. त्याचे वागणे वाईट होते असे नाही. त्याबद्दल तक्रार नाही. त्यांना हाती काही लागले नाही तरी त्यांना तिथे थांबवण्यात आले. ते बिचारे शांतपणे पुढील आदेश येईपर्यंत बसून राहिले. मध्यमवर्गीय माणसाच्या घरी असे पाच-पाच दिवस येऊन राहणे किती योग्य आहे? असा सवालही पवारांनी केला. उध्दव ठाकरे हे मुख्यमंत्री होण्यास तयार नव्हते. माझ्या आग्रहाखातर ते मुख्यमंत्री झाले, असा खुलासाही शरद पवारांनी यावेळी केला. तसेच मविआचे हे सरकार ५ वर्षाचा कालखंड पूर्ण करेल. जनतेचा विश्वास आणि पाठिंब्याने पुन्हा एकदा राज्यात सत्तेवर येईल असेही पवारांनी म्हटले.

# स्वच्छता कामगारांसाठी बांधलेल्या घरांत मुंबई महापालिकेत १८४४ कोटींचा घोटाळा

■ मुंबई

**मुंबई** महानगरपालिका अधिनियम १८८८, उपनियम ६१ अन्वये मुंबई स्वच्छ ठेवणे हे मुंबई महानगरपालिकेचे बंधनकारक कर्तव्य आहे, तसेच मुंबईतील बांधकाम कचरा काढून टाकणे हे एक बंधनकारक कर्तव्य आहे. अद्वितीय काम आणि कामाच्या वातावरणामुळे सफाई कामगारांना आरोग्यासारख्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. तरीही आपले सफाई कामगार त्यांच्या आरोग्याची काळजी करत नाहीत आणि मुंबईला निरोगी ठेवण्यात आयुष्य घालवतात. त्यांचे जीवन सुकर करण्यासाठी राज्य सरकारने डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रम सफाई आवास योजनेंतर्गत स्वच्छता कामगारांसाठी मोफत घर आणि डीसीपीआर १४/३४ मध्ये नियम ३ (२०) अंतर्गत ४ -एएसआयची तरतूद करण्याचा आदेश जारी केला आहे. परंतु सत्ताधारी शिवसेना आणि महापालिकेतील अधिकाऱ्यांच्या संगनमताने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी श्रम सफाई आवास योजनेऐवजी निवारा योजनेअंतर्गत सेवा कालावधीपर्यंतच घरे देण्याची योजना आणली आहे. ही योजना राज्य सरकारला मोफत घरे देण्याच्या संकल्पनेचे उल्लंघन आहे आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांची फसवणूक करणे, योजनेचे नाव बदलून भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने आश्रय योजनेत बदल करणे हा बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान असल्याचा आरोप मुंबई मनपातील भाजपाचे पक्षनेते विनोद मिश्रा यांनी केला आहे. ही योजना फक्त आणि फक्त भ्रष्टाचाराला आश्रय देणारी आहे. मुंबई आणि उपनगरातील ११ पॅकेट्सच्या बिल्ट आणि डिझाईन टर्नकी प्रकल्पाच्या आधारावर, सप्टेंबर २०१९ मध्ये निविदा काढण्यात आली होती. ती निविदा प्रशासनाने फेब्रुवारी २०२० मध्ये रद्द केली होती. परंतु जेव्हा १८ मार्च २०२० रोजी महाराष्ट्रात संचार बंदी घोषित करण्यात आली , तो २ दिवसांचा भाग होता. २० मार्च २०२० ला प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सर्वांना माहित आहे की, २४ मार्च २०२० रोजी संपूर्ण देशामध्ये राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन नियमांनुसार, तसेच २५ मार्च रोजी, राज्याचे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी संचारबंदी लागू केली. वर्तमान पेपर आणि प्रकाशकासोबत बैठक, पेपर छापू नये. विनंती केली, संपूर्ण ३ महिने अत्यावश्यक सेवा वगळता सर्व लोकांसाठी दळणवळण बंद होते, अशा परिस्थितीत, २८ एप्रिल २०२० रोजी, नवीन अटींसह, निविदा होती फक्त एमसीजीएमच्या पोर्टलवर प्रकाशित झाले. भाजपचा प्रश्न आहे की प्रत्येकजण आपापल्या घरात आहे. जेव्हा ते बसले होते, तेव्हा सत्ताधारी आणि प्रशासन स्वच्छता कामगारांच्या निवासस्थानाच्या नावाखाली लूट करण्याचा विचार करत होते.

गट ११ मधील दोन गट पुढे ढकलण्यात आले आहेत. ९ गटांसाठी सुमारे ३,३०० कोटींची निविदा आली, ज्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार आणि उदाहरण गट क्रमांक (२) बीड क्रमांक-११०० १७६० गट क्रमांक (३) बीड क्रमांक- ७१० ० १७७ ५६१ डीसीपीआर ३३ आश्रय योजनेसाठी (२०) ४ एफएसआय अंतर्गत अंदाजे क्षेत्र ४५५ ७ ० वर्ग/मीटर आणि बांधकाम खर्च प्रति ४६८८७ चौरस/मीटर एकूण २१३ ६६४५ ९०८३ रुपये. सायोना कॉर्पोरेशनने भरलेले एकूण क्षेत्र ११३ २६२ स्क्वे.मी. दर ६३३३३ स्क्वे.मी., गटासाठी क्षेत्र (३) १३४ ३२९ स्क्वे.मी. धरणाच्या कामाची किंमत ६३३३३ रुपये स्क्वे.मी. प्रश्न आहे जेव्हा ५ दिवसांपूर्वी शिओना कॉर्पोरेशनने रु. ३७९ ३.८९ आणि ४०८३ ७ चौरस मीटर. ६ निविदाकारांना फक्त योजना सादर केल्यावर ५ टक्के दिले गेले होते, तर दर कमी झाल्यानंतरही योजना पारित झाल्यानंतर दोन गटांना १ टक्के दिले जातील, जे संविधानाच्या डीएल अनुच्छेद ४३ आणि भारतीय करारामध्ये भेदभाव आहे. १८७२ चे उल्लंघन. ८ गटांमध्ये सुमारे १८४४ कोटींचा भ्रष्टाचार झाला आहे, चार्ट संलग्न आहे. त्याच वेळी, सीव्हीसी मार्गदर्शक तत्त्वांचे, माननीय उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचेही उल्लंघन झाले आहे, तर पालिकेकडे वास्तुविशेष आहे, डीपी विभाग इमारत प्रस्ताव विभाग आहे, नंतर क्षेत्र बांधकामाचा निर्णय आधी योजना मंजूर करून घेतला पाहिजे ठेकेदाराने नाही. नगरपालिकेने ठरवलेल्या क्षेत्राच्या ३ पट, केवळ निविदा कारमध्ये आणि केवळ ५ टक्के आगाऊ पेमेंटसाठी, ज्यामुळे प्लॉट सादर केल्यावर पालिकेने सुमारे १२५ कोटी दिले आहेत जे प्लॉटच्या क्षमतेच्या १० ते १२ पट आहे. भाजपने तात्पुरत्या समितीमध्ये या लुटीच्या प्रस्तावाला विरोध केला आणि मतदान मागितले पण शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसने बहुमताने प्रस्ताव पारित केला आणि यामुळे उद्या जर मुंबई महानगरपालिकेनुसार योजनेचे क्षेत्र मंजूर झाले ३३ (२०) महानगरपालिकेने जे प्रस्तावित केले आहे. त्यापेक्षा कमी, मग सुमारे रुपयांची वसुली कशी होईल? भाजपाची मागणी अशी आहे की, बाबासाहेब आंबेडकर श्रम सफळ योजनेंतर्गत मुंबईसाठी पिढ्यान् पिढ्या काम करणार्या सफाई कामगारांना त्यांच्या मालकीच्या आधारावर मोफत घरे देण्यात यावीत.

मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, महापौर आणि मुख्य सचिव, महाराष्ट्र सरकारला विनंती आहे की स्वच्छता कामगारांच्या नावाने १८४४ कोटींची लूट त्वरित थांबवा आणि डीसीपीआर ३३ येथे योजना पास केल्यानंतर महानगरपालिकेचा सर्वात कमी दर. (२०) निश्चित धरणाच्या कामांसाठी द्यावे. या दरोड्यात, अधिकाऱ्यापासून सनदी अधिकारी आणि कंत्राटदारापर्यंत, कृपया न्यायालयीन चौकशी करून किंवा लोकायुक्त चौकशी करून कारवाईचे आदेश द्या. यामध्ये, सौदेबाजी आणि सनदी अधिकाऱ्यांपासून माननीय आरोग्य आयुक्तांपर्यंत, म्हणून, कॅबिनेट सचिव, भारत सरकार आणि मुख्य दक्षता अधिकारी याबद्दल तक्रार करतील. भाजपाचा असा विश्वास आहे की आर्थिक क्षमता नसतानाही शाओना कॉर्पोरेशनला सुमारे १४०० कोटींचे कंत्राट देण्यात आले आहे, त्याचीही चौकशी झाली पाहिजे, असेही मिश्रा यांनी म्हटले.

## कोरोनाची दुसरी लाट असतानाच कंत्राटदाराशी बोलणी करण्याचे आदेश

एप्रिलमध्ये जेव्हा कोरोनाची दुसरी लाट शिगेला होती आणि सामान्य मुंबईकर ऑक्सिजन बेडच्या अभावामुळे आपला जीव गमावत होते तेव्हा २६ एप्रिल २०२१ रोजी अतिरिक्त आयुक्त प्रकल्पाने विभागाला कंत्राटदार शायोना कॉर्पोरेशनशी बोलणी करण्याचे आदेश दिले. बैठकीनंतर १० मे २०२१ रोजी अतिरिक्त आयुक्तांनी धरणाच्या कामाचा दर ६३३३३ स्क्वे.मी ते ५२४४५ स्क्वे.मी.पर्यंत निश्चित केला. परिणाम नंतर शायोना कॉर्पोरेशनला गट (२) साठी ५९४.१ १ली आणि रु. एकूण धरणाच्या कामाची किंमत मिळाली ७०४.२ ७ कोटी रुपये निश्चित करण्यात आले होते. तर मनपाने लोकमान्य टिळक रुग्णालयातील कर्मचार्यांच्या निवासासाठी निविदा काढली होती. ज्यात ४ लोकांनी भाग घेतला होता. शेओना कॉर्पोरेशन ३७९३ चौरस फूट दराने सर्वात कमी निविदाधारक होती. हे निविदा निवारा योजनेच्या गट (२) आणि गट (३) च्या ५ दिवस आधी उघडले ज्यात एकूण बांधकाम ३२११८० चौरस फूट आहे आणि एकूण खर्च १२१८५ कोटी आहे.

# आरोग्य विभागाच्या परिक्षेचा गोंधळ एकाच दिवशी दोन जिल्ह्यांमध्ये पेपर

■ मुंबई

**येत्या** २४ ऑक्टोबरला होणाऱ्या आरोग्य विभागाच्या परिक्षेचे हॉल तिकीट विद्यार्थ्यांना मिळण्यास सुरुवात झाली आहे. मात्र या परिक्षे संदर्भातील सावळागोंधळ काही थांबायचे नाव घेत नाही. हॉल तिकीटच्या सेंटरवरून पुन्हा एकदा गोंधळ झाल्याचे समोर आले आहे. एकाच दिवशी दोन परिक्षांसाठी दोन वेगवेगळ्या जिल्ह्यांत परिक्षा केंद्रे विद्यार्थ्यांना आली आहेत. यामुळे विद्यार्थी संभ्रमात पडले आहेत. गेल्या आठवड्यात होणारी आरोग्य विभागाची परिक्षा ऐनवेळी नियोजन होऊ न शकल्याने पुढे ढकलण्यात आली होती आणि या परिक्षेची तारीख २४ व ३१ ऑक्टोबर जाहीर करण्यात आली होती. २४ ऑक्टोबरला होणाऱ्या आरोग्य विभागाच्या परिक्षेचे हॉल तिकीट ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांना प्राप्त होत आहेत. यातील काही हॉल तिकिटांमध्ये विद्यार्थ्यांनी दोन वेगळ्या पदांच्या परिक्षेसाठी अर्ज केले आहेत. या विद्यार्थ्यांचे परिक्षेचे दोन पेपर एकाच दिवशी आयोजित करण्यात आले आहेत. त्यामुळे एकाच परिक्षा केंद्रात हे दोन पेपर होणे अपेक्षित होते. मात्र दोन्ही परिक्षेचे केंद्र दोन वेगळ्या जिल्ह्यांत देण्यात आले आहेत. शिवाय एक सकाळचा परिक्षेचा पेपर सकाळी १० ते दुपारी १२ दरम्यान तर दुपारच्या दुसऱ्या परिक्षेसाठीचा पेपर दुपारी ३ ते ५ या दरम्यान आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी दोन पेपर देण्यासाठी मधल्या दोन ते तीन तासांत दोन जिल्ह्यांमध्ये दीडशे ते दोनशे किलोमीटर अंतर पार करणे शक्य नसल्याने हे पेपर एकाच दिवशी कसे द्यायचे असा प्रश्न उपस्थित केला आहे. तर काही विद्यार्थ्यांनी अर्ज भरताना पर्याय म्हणून जवळच्या जिल्ह्यातील केंद्र मिळावे असे नमूद केले होते. तरीही दूरच्या जिल्ह्यांमध्ये विद्यार्थ्यांना परिक्षा केंद्र देण्यात आली आहेत. याबाबत एका विद्यार्थ्याने बोलताना सांगितले की, मी राहतो नगर जिल्ह्यात आणि केंद्र आलेय सातारा आणि सांगलीत. मी माझ्या जिल्ह्याला पहिले प्राधान्य दिले असताना परीक्षा केंद्र इतके लांब कसे आले.

## भोंगळ कारभाराने विद्यार्थी संभ्रमात

# पुणे-मुंबई सिंहगड एक्स्प्रेस सोमवारपासून पुन्हा धावणार




**पुणे, प्रतिनिधी-** कोरोनामुळे स्थगित केलेली पुणे-मुंबई सिंहगड एक्स्प्रेस सोमवार १८ ऑक्टोबरपासून पुन्हा सुरू होणार आहे. यामुळे पुणे-मुंबई-पुणे दरम्यान दररोज ये-जा करणाऱ्या नागरिकांना दिलासा मिळणार आहे. कोरोनामुळे मार्च महिन्यात रेल्वेने नियमित सेवा स्थगित केली होती. टप्प्याटप्प्याने विविध मार्गांवरील सेवा सुरू झाल्या. मात्र, सिंहगड एक्स्प्रेस अजूनही होती. अखेर सिंहगड एक्स्प्रेसला पुन्हा एकदा ग्रीन सिग्नल मिळाला आहे. सोमवार १८ ऑक्टोबरपासून पुण्याहून रोज सकाळी ६ वाजून ५ मिनिटांनी रेल्वे सुटणार असून, ९ वाजून ५५ मिनिटांनी सीएसएमटी (मुंबई) येथे पोहोचणार आहे. तर सीएसएमटी येथून सायंकाळी ५ वाजून ५० मिनिटांनी एक्स्प्रेस सुटणार असून, रात्री ९ वाजून ५० मिनिटांनी पुण्यात पोहोचणार आहे. ही रेल्वे दादर, ठाणे, कल्याण, कर्जत, लोणावळा, चिंचवड, पिंपरी, खडकी आणि शिवाजीनगर येथे थांबणार आहे.

# एमबीए पास करून देण्याची हमी देणाऱ्या दलालास अटक

■ पुणे, प्रतिनिधी

**आंतरराष्ट्रीय** स्तरावरील एमबीएची प्रवेश परिक्षा पास करून देण्याची हमी देणाऱ्या दलालास पुणे सायबर पोलिसांनी अटक केली आहे. आरोपी ठराविक गुणांप्रमाणे अडीच ते चार लाख रुपये आकारत होता. अभय मिश्रा (रा. मानगो, जमशेदपूर, झारखंड) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपीकडून एक लॅपटॉप, एक मोबाईल फोन, ४ पेनड्राईव्ह, ४ डेबीट कार्ड व इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांना परदेशात एमबीएसाठी प्रवेश घ्यावयाचा असल्याने त्यांनी सोशल नेटवर्किंग साईटवर जीमॅट या एमबीए पूर्व परिक्षेबाबत सर्च केले असता त्यांना GMAT_GRE_SHORTCUT ही इन्स्टाग्राम प्रोफाईल दिसून आली. त्यामध्ये प्रवेशाकरिता असणाऱ्या जीमॅट या पूर्व परिक्षेमध्ये १०० टक्के चांगल्या गुणांची हमी देण्यात आली होती. त्यानुसार फिर्यादी यांनी सदर इन्स्टाग्राम प्रोफाईलच्या माध्यमातून प्रोफाईल धारकाशी संपर्क साधून सर्व प्रक्रिया पूर्ण केली.

त्यानुसार ७५० पेक्षा अधिक गुणांकरिता ४ लाख, ७४० पेक्षा अधिक गुणांकरिता ३ लाख ७० हजार, ७३० पेक्षा अधिक गुणांकरिता ३ लाख ५० हजार, ७२० पेक्षा अधिक गुणांकरिता ३ लाख, ७१० पेक्षा अधिक गुणांकरिता २ लाख सत्तर हजार आणि ७०० पेक्षा अधिक गुणांकरिता २ लाख ५० हजार असे रेट असल्याचे आरोपीने सांगितले.

आरोपीने फिर्यादीच्या संगणकाचा ऐनीडेस्क, डीडब्ल्यू सर्व्हिसेस व वुई ट्रान्सफर या ॲप्लीकेशनद्वारे ॲक्सेस घेऊन आंतरराष्ट्रीय एमबीएची पूर्व परिक्षा फिर्यादी हेच देत आहेत असे भासवून पूर्व परिक्षा दिली. त्यामध्ये फिर्यादी यांना खरोखरच ८५० पैकी ७७० गुण मिळाले. त्यामुळे यातील आरोपी यांनी फिर्यादी यांच्याकडे वारंवार ४ लाख रूपयांची मागणी केली. परंतु फिर्यादी यांना रक्कम द्यावयाची नसल्याने व वरील सर्व प्रकार हा फसवणुकीचा वाटल्याने त्यांनी तक्रार दाखल केली.

# आंबेवाडीमध्ये मुलीचा शेततळ्यात बुडून मृत्यू



■ नाशिक

**माशांना** खाऊ टाकणाऱ्या मुलीचा पाय घसरून शेततळ्यात पडून मृत्यू झाल्याची घटना आंबेवाडी येथे शनिवारी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. उर्मिला बोराडे असे मृत मुलीचे नाव आहे.

येवला तालुक्याच्या विसापूर हद्दीतील आंबेवाडी येथे उर्मिला बोराडे ही मुलगी आपल्या घरातील शेततळ्यात माशांना खाऊ टाकत होती. ती नेहमीच माशांना खावू टाकायची. मात्र, स्वतःच्या तंद्रीत असताना तिचा पाय अचानक घसरला. त्यामुळे ती शेततळ्यात पडली. यावेळी घरात किंवा तिच्याजवळ कोणीही नव्हते. त्यामुळे ती शेततळ्यात पडल्याचेही कुणाला समजले नाही. अखेर खूप शोधाशोध केली. तेव्हा तिचा मृतदेह शेततळ्यात सापडला. दरम्यान, यापूर्वी नाशिक जिल्ह्यात दोन भावांचा बुडून मृत्यू झाला होता. गेल्या आठवड्यात हर्षल आणि सार्थक ही दोन्ही मुले शेतात गेली. या मुलांनी शेतात येताच आपला मोर्चा शेततळ्याकडे वळवला. त्यांना पाण्याच्या खोलीचा अंदाज आला न आल्याने तो गटांगळ्या खाऊ लागला. त्यातच त्यांचा बुडून मृत्यू झाला.

# इंडोनेशियात नदी स्वच्छता मोहिमेत २१ मुले बुडाली

■ जकार्ता

**इंडोनेशियातील** पश्चिम जावा प्रांतात काल नदी स्वच्छता मोहीम राबवण्यात आली होती. या ठिकाणी शाळेच्या सहलीदरम्यान २१ विद्यार्थी बुडाल्याची धक्कादायक घटना घडली. यातील १० विद्यार्थ्यांना वाचवण्यात आल्याची माहिती स्थानिक अधिकाऱ्यांनी दिली आहे.



स्थानिक अधिकाऱ्यांनी सांगितले की, इस्लामिक ज्यूनियर हायस्कूलचे विद्यार्थी काल सीलियूर नदीच्या काठावर स्वच्छता मोहिमेत भाग घेत असताना २१ विद्यार्थी घसरले आणि नदीत पडले. त्यानंतर तात्काळ जवळपासच्या रहिवाशांनी आणि बचाव पथकांनी धाव घेत १० विद्यार्थ्यांना बुडताना वाचवले. यावेळी बचाव पथकांनी विद्यार्थ्यांना वाचविण्यासाठी मोठ्या बोटींचा वापर केला. रात्री उशिरापर्यंत नदीत बुडालेल्या विद्यार्थ्यांचा शोध घेण्यात येत होता. या विद्यार्थ्यांना उपचारासाठी जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# कोट्यवधी रुपयांची सांस्कृतिक भवनाची मिळकत अखेर महाबळेश्वर पालिकेकडे

■ महाबळेश्वर

**सुमारे** २० वर्षांपासून अर्धवट बांधकाम होऊन भाडेकरारावर देऊनही धूळ खात पडलेली महाबळेश्वर पालिकेच्या मालकीची सांस्कृतिक भवनाची मिळकत अखेर पालिकेच्या ताब्यात आली आहे. पालिकेच्या मुख्याधिकारी पल्लवी पाटील यांनी धडक कारवाई करत केलेल्या या कामगिरीचे सर्वसामान्य नागरिकांनी स्वागत केले आहे. यावेळी नगराध्यक्ष स्वप्नाली शिंदे, उपनगराध्यक्ष अफझल सुतार, नगरसेवक पालिका अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

पालिकेची ही मिळकत ११ हजार २३० चौमी इतकी यातील ३ हजार ५०७ चौमी क्षेत्र सांस्कृतिक भवनासाठी राखीव ठेवले होते.त्याचे बांधकाम सुरु झाले .पण ते अर्धवट राहिले.नंतर खर्च वाढत गेल्याने आहे त्या स्थितीतील ही इमारत भाडे करारावर मे.लँडमार्क इन प्रा.लि. मुंबई या कंपनीला देण्यात आली. अर्धवट बांधकाम पूर्ण केल्यानंतर हा करार लागू होणार होता.

## मुख्याधिकाऱ्यांची धडक कारवाई

करारानुसार या कंपनीने पालिकेकडे अनामत रक्कम म्हणून२५ लाख,भाडे रक्कम ५० लाख ४४ हजार, करार रक्कम १४ लाख ५६ आणि बँक गॅरंटी ७३ लाख रुपये असे एकूण १ कोटी ६३ लाख रुपये जमा केले होते.तसेच उर्वरित ७२ लाख ७५ हजार २७० रुपये पालिकेला येणे बाकी होते. पण नंतर भाडेकरूने भाडेही दिले नाही आणि इमारत वापरलीही नाही. त्यामुळे ही मिळकत अशीच धूळ खात पडली होती. पालिका आणि भाडेकरूमध्ये वाद होऊन हे प्रकरण न्यायालयात गेले. न्यायालयात वेळोवेळी सुनावणी होऊनही या मिळकतीचा ताबा कुणाकडे राहील याबाबत काही निर्णय घेतला गेला नाही.त्यामुळे अखेर पालिकेच्या मुख्याधिकारी पल्लवी पाटील,वाई उपविभागीय अधिकारी राजेंद्र जाधव आणि तहसीलदार सुषमा चौधरी यांनी संयुक्तपणे या अर्धवट बांधकाम असलेल्या पण कोट्यवधी रुपयांची किंमत असलेली ही मिळकत ताब्यात घेतली.आता ही इमारत आणि परिसर नागरिकांच्या सोयीसाठी उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे मुख्याधिकारी पल्लवी पाटील यांनी म्हटले आहे.

# जॅकलीन फर्नांडिस ईडी चौकशीला पुन्हा गैरहजर


■ मुंबई

**सुकेश** चंद्रशेखर मनीलॉन्ड्रिंग प्रकरणात ईडीने चौकशीसाठी हजर राहण्याचे समन्स बजावले असतानाही आज पुन्हा अभिनेत्री जॅकलीन फर्नांडिस चौकशीला गैरहजर राहिली. त्यासाठी तिने कामाचे कारण दिले. ईडीने तिला बजावलेली ही तिसरी नोटिस होती.



मनीलॉंड्रिंग प्रकरणात जॅकलीन फर्नांडिसची ऑगस्टमध्ये ईडी चौकशी झाली होती. त्यावेळी तिचा जबाब नोंदवून घेतला होता. त्यानंतर काल शुक्रवारी तिला पुन्हा चौकशीसाठी बोलावले होते. परंतु ती गैरहजर राहिली. याशिवाय आज शनिवारी १६ ऑक्टोबरला तिला पुन्हा चौकशीसाठी बोलावले होते. परंतु कामाचे कारण देत ती आज पुन्हा गैरहजर राहिली.

# महाशब्दकोडे-२३६४



**आडवे शब्द -** १. सर्व, सगळे ४. तसदी, त्रास ७. हेतू ९. मळमळ, थकव्यानंतरचा निःश्वास ११. विदुषकी चाळे, माकडचेष्टा १२. जाणकार १४. फुटक्या नशिबाचा, अपशकुनी १६. संधी १८. दुय्यम, डावा १९. शर्करा २१. पाणी २२. हनुमानाचे शस्त्र २३. झाडाखाली पडलेला शुष्क पानांचा कचरा २५. वाईट चालीची स्त्री २६. वैतागलेला, चिडचिडा झालेला २९. झाडांच्या बुंध्यातले घरटे ३०. कृत्रिम केशकलाप ३२. सौंदर्य, शोभा ३४. घाणेरडे ३६. नुकतेच लग्न झालेली व्यक्ती ४०. वृथा ४१. अचेतन, निष्प्राण ४२. आश्रम ४४. अगदी कमी वेळात ४६. पार्वतीचे एक रूप ४८. अहंकार, उद्धटपणा ४९. पाय, चरण ५१. प्रियकर ५२. मुस्लिम साधू ५४. शिंप्याचे माप घेण्याचे साधन ५५. दीर्घिका, नक्षत्रांचा समूह ५८. मतभेद ६०. प्रमाद ६१. बिशाद ६२. अवाजवी ६५. अवसान ६६. केशतेलातील औषधी वनस्पती ६८. दक्ष, जागरूक ७०. चांगल्या कामात सर्वात पुढे ७१. टिंगल ७४. बर्फ ७५. अधःपात झालेला ७७. कर्नाटक व तामिळनाडूतली नदी ७८. नाचणी ८०. झलक ८२. तीव्र तळमळ ८३. आनंद ८४. अंगणाचे दार ८५. नवऱ्याची बहीण ८६. कांचनमृग ८८. नावाची पाटी ९०. वालीचा पुत्र ९१. पासपोर्ट ९३. भूक ९५. सदस्य ९६. ठोंब्या, एक पालेभाजी ९८. मित १००. कमतरता, वाळवी १०१. दर्जी १०२. त्रिकोणी आकाराचा तिखट तळलेला पदार्थ १०४. अपस्माराचा झटका १०६. विलंब १०७. ध्वनिवर्धक १०८. भयभीत, व्याकूळ १०९. बरखास्त

**उभे शब्द -** १. युद्धभूमी २. खेकडा, चौथी रास ३. कृतक, दिखाऊ ४. तुल्यबळ, बरोबरीच्या दर्जाचा ५. भरतीची वेळ ६. खलास ७. धूर्त, बेरकी ८. लाकडी जिना, मुंबईचे एक उपनगर ९. दोघे, जोडीने १०. कुंतीची सवत १३. थंडीचा ऋतू १५. विपर्यास, गैर अर्थ १७. फणसाचा एक प्रकार २०. उठाठेव २१. सुंठीचे पूर्वरूप २४. जमाखर्चाची वही २५. खानदानी २७. संवत्सर २८. एडका ३१. ओळखीचा ३२. सोपे ३३. मानी स्त्री ३४. डास चावल्यामुळे होणारा एक रोग ३५. दोनने पूर्ण भाग जाणारी संख्या ३७. छाती ३८. हुक्की ३९. सोपे ४३. दोषारोप ४५. कायदेविषयक सल्ला देणारा ४७. रस्ता ५०. जावयाचा गमतीने केलेला उल्लेख ५१. खोटी तक्रार ५३. अथवा ५४. बारीक खिळा ५५. हुकूम ५६. उत्पन्न, आदेश ५७. श्रीकृष्ण ५९. अस्थमा ६१. प्रगतीच्या वाटेवर ६३. वाळू ६४. दागिने गाठवण्याचे काम करणारा ६५. खोटा आरोप ६७. कडक उन्हात होणाचा अंगाचा दाह ६९. जतन ७२. पंढरपूरची पायी यात्रा ७३. विविध ७६. स्त्रीचा डौलदार बांधा ७७. अजिबात, सूतराम (नाही) ७९. लोकप्रिय काव्यप्रकार ८०. अगदी लीलया ८१. दोन्ही बाजूंना झुडपे/कुंपण असलेली अरुंद पायवाट ८५. बागायती पीक, कॅश क्रॉप ८७. नेत्र, नयन ८८. स्पष्टवक्ता ८९. वाळवी ९१. आपल्याकडे पाठ करून उभा ९२. पंधरवडा ९४. वचक ९६. मत्स्य ९७. धनुष्य ९९. चिकित्सा १०३. लहान, छोटे १०४. खेप, चक्कर १०५. रेघ, मुलींचे एक नाव •

**महाशब्दकोडे क्रमांक २३६३ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. किंचित ४. फूस ६. बेवकूफ ८. डौलदार ११. वपा १२. अपार १४. माकड १६. बिलगणे १७. दंडगोल १९. जराजर्जर २०. नकुल २२. तदा २३. डबघाई २६. लवण २७. रज ३०. तर ३१. बोटचेपेपणा ३४. दंडेली ३६. गेरू ३८. कट ४०. लोकवान ४१. तेजस्वी ४३. ढील ४५. कीर ४६. गमजा ४८. गोल ४९. काडी ५०. सहाण ५२. रामरगाडा ५४. अस्त ५५. और ५६. राणीव ५७. अननस ५८. समिधा ६०. ददात ६३. रापी ६६. नशीब ६८. समजूत ६९. यूप ७०. मक्षिकापात ७३. काला ७४. भार्या ७५. माष ७६. गणती ७७. रवाना ८०. दसनामा ८३. झुणका ८५. रीत ८६. गोवर्धन ८७. मठी ८९. तेलची ९१. लक्ष्य ९२. स्वस्त ९३. अपकीर्ती ९५. तरंग ९७. इंद्रप्रस्थ १००. द्रव १०४. खग १०५. अटकाव १०७. अनवरत १०९. राका ११०. पळस १११. अटकळ ११२. मजाल ११३. वटवाघूळ

**उभे शब्द** : १. किंवदंती २. चिपाड ३. खोपा ५. समाजकंटक ६. बेडर ७. कूजन ८. डौल ९. लगत १०. दाणेदार १२. अलबत १३. रजई १५. कर्ज १६. बिलवर १८. गोड २१. कुल २४. घारगे २५. झोपडी २८. जमीनदोस्त २९. गोडेतेल ३२. चेटकीण ३३. तुकडी ३५. लीज ३७. रूढी ३९. समरस ४२. स्वीकार ४४. लसणी ४६. गमन ४७. जागा ४८. गोमेद ५१. हावरा ५२. रानटी ५३. डास ५४. अधाशी ५५. औत ५९. मिनतवारी ६१. दादला ६२. अमर्याद ६४. पीयूष ६५. हेका ६७. बल ६८. सभा ७०. मणका ७१. क्षिती ७२. पार ७३. कानगोष्ट ७५. मामा ७६. गणपूर्ती ७८. नातलग ७९. अर्धचंद्र ८१. समस्त ८२. नाठी ८४. वेल ८८. उपद्रव ८९. तेथे ९०. चीत ९२. स्वस्थ ९४. कीव ९६. रंक ९७. इंगळ ९८. प्रस्थ ९९. कंटक १०१. अनल १०२. गौरव १०३. सकाळ १०४. खप १०५. अट १०६. काळ १०७. अजा १०८. तट १०९. राघू

# साप्ताहिक राशीभविष्य

## रविवार १७ ऑक्टोबर २०२१ ते २३ ऑक्टोबर २०२१



**मेष**

**पैशाच्या** बाबतीत आज थोडा ताणतणाव असला तरी प्रसंगी वेळ निभावली जाईल. कौटुंबिक स्तरावर जुन्या नव्या पिढीतील संघर्षानंतर एक प्रकारचे आदराचे वातावरण राहील. योग्य व्यक्तीचा योग्य ठिकाणी केलेला वापर अडचणीतून सुटका करण्यासाठी फायद्याचा ठरेल. घरातील ज्येष्ठांच्या जबाबदारीत चालढकल करू नये. संततीत वारंवार काही सांगण्यापेक्षा थोडे वस्तुनिष्ठ वागणे गरजेचे ठरेल. महिलांनी हितशत्रूंच्या चाली ओळखून अधिक त्रास होणार नाही, या दृष्टीने निर्णय घेणे गरजेचे आहे. तरुणांनी कोणाला चुका दाखवण्यापेक्षा त्यांच्याशी मुत्सद्दीपणाने वागणे फायद्याचे ठरणारे आहे. नोकरीत अडून राहिलेल्या विशिष्ट कामांना गती मिळेल. बदली, बढतीच्या दृष्टीने होणाऱ्या राजकारणावर उत्तर सापडेल. व्यवसायात तुमच्या कल्पना, योजना, तुम्ही घेतलेले निर्णय फायद्याचे प्रमाण वाढवण्यास उपयोगी ठरतील. हितशत्रू डोके वर काढतील. भाजीपाला, फळफळावळ या क्षेत्रात काम करणाऱ्यांना चांगला काळ. दात, हिरड्यासंबंधीचे आरोग्य जपावे. स्नेहीजनांबरोबर धार्मिक, आध्यात्मिक ज्ञानात भर टाकणारी चर्चा घडेल. मनोरंजन, करमणुकीचा आनंद घ्याल. प्रवासात सावधगिरी ठेवणे गरजेचे आहे. वैयक्तिक कला, छंद जोपासाल. सत्संग लाभेल.

**वृषभ**

**स्वत:च्या** अडचणीकडे थोडे सकारात्मक पाहणे गरजेचे ठरेल. कौटुंबिक स्तरावर बाहेरील व्यक्तींच्या वागण्याबोलण्यामुळे गैरसमज निर्माण होऊन अशांतता निर्माण होणार नाही, याची काळजी घ्यावी. अवाजवी खर्च टाळावा. स्त्रीविषयक अडचणीचे प्रश्न मार्गी लागतील. नात्यातील जुनी उधारी, जुने आर्थिक व्यवहार पूर्णत्वास जातील. संततीशी थोडे सडेतोड धोरण ठेवणेच आवश्यक ठरणारे आहे. महिलांचे जोडीदाराशी झालेले मतभेद तेवढ्यापुरतेच असतील. स्वत:चे म्हणणे खरे करण्याचा आग्रह धरू नये. तरुणांना अडचणीस मित्र, नातेवाईकांकडून चांगली मदत मिळेल. नोकरीत वरिष्ठ खूष असतील. हवे असलेले काम, नवीन जबाबदारी, नवीन सोयीसुविधा याद्दष्टीने सकारात्मक काळ. अवलंबून राहाणे टाळावे. व्यवसायात काहींना अधिक लाभ संभवतो. मालाच्या किंमतीतील फरकातून अनपेक्षित फायदा पदरात पडेल. नोकरवर्गावर अवलंबून राहाणे टाळावे. ब्युटी पार्लर, सौंदर्य प्रसाधने या क्षेत्रात काम करणाऱ्यांना चांगला काळ. प्रवास अडचणीचे झाले तरी कार्यसाधक ठरतील. कौटुंबिक स्तरावर आनंददायी वातावरण ठेवू शकाल. मनोरंजन, वाचन, श्रवण यातून मनास समाधान मिळेल. मस्तक, पाठ, अंगदुखी यापासून सावध असावे. वैयक्तिक कला, छंद जोपासाल. सत्संग लाभेल.

**मिथुन**

**भिडस्तपणामुळे** तुमच्या अडचणीत वाढ होऊ शकते. थोडे जशास तसे वागणे गरजेचे ठरणारे आहे. जुन्या नव्या पिढीमध्ये उत्तम संवाद साधू शकाल. पैशासंदर्भात अडलेली कामे मार्गी लागतील. घरात सुख वाढवणाऱ्या गोष्टींची खरेदी कराल. नातेवाईक, मित्र यांना स्वत:चे यश मोठे करून सांगू नये. संततीबाबतीत खर्चाचे अंदाज चुकतील. काही बाबतीत गोष्टी गृहीत धरून चालू नये. महिलांनी आर्थिक व्यवहारात थोडे परखड असणे आवश्यक ठरणारे आहे. तरुणांनी आपला आवाका, आपली क्षमता पाहून मगच आश्वासने द्यावी-घ्यावीत. नोकरीत काही अनपेक्षित बदल संभवतात. वरिष्ठांशी तात्त्विक मतभेद वाढणार नाहीत याची काळजी घ्यावी. कनिष्ठांवर अवलंबून राहू नये. व्यवसायात नोकरवर्गाच्या ओळखीचा, अनुभवाचा फायदा होईल. शासकीय, बँकेची, कर्जासंबंधीची अडलेली कामे मार्गी लागतील. व्यवसायाच्या जागेचे प्रश्न मार्गी लागतील. विक्री, दुरुस्ती, सेवा या क्षेत्रात काम करणाऱ्यांना चांगला काळ. पचन, बद्धकोष्ठता यापासून सावध असावे. प्रवासात चीजवस्तू सांभाळा. वाचन, श्रवण, मनन मनाचा उत्साह वाढवेल. संगीत, मनोरंजन, सहल याचा स्वजनांबरोबर आनंद घ्याल. योगासने, ध्यानधारणा आरोग्याच्या दृष्टीने फायद्याची ठरेल. वैयक्तिक कला, छंद जोपासाल.

**कर्क**

**काही** उत्साह वाढवणाऱ्या बातम्या समजतील. खर्चाबाबतीत तुमचे हिशोब, अंदाज थोडे बरोबर ठरतील. शेजाऱ्यांशी योग्य संवाद साधला जाईल. नात्यातील गैरसमज, अडचणी योग्य संवादाने सोडवू शकाल. खर्चास पैशाची उपलब्धता राहील. घरात सुख वाढवणाऱ्या गोष्टींची खरेदी कराल. शुभकार्याच्या दृष्टीने केलेले प्रयत्न यश देतील. संततीबाबतीत भविष्यात वाटणाऱ्या काळजीपेक्षा आजची वस्तुस्थिती लक्षात घेऊन त्यांच्याशी वागणे बोलणे आवश्यक ठरेल. महिलांनी स्वत:चे यश मोठे करून सांगू नये, घरातील ज्येष्ठांकडून फायदे संभवतात. तरुणांनी पदरात पडणाऱ्या संधीचा पुरेपूर फायदा उठवणे गरजेचे ठरणारे आहे. नोकरीत आपले कोणावाचून अडणार नाही, याची काळजी घ्यावी. बदली, बढती, पगारवाढ या दृष्टीने करत असलेले प्रयत्न यश देतील. व्यवसायात नवीन भांडवल, कर्ज, जुनी उधारी, आवश्यक असणारी परिस्थिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने नशीबाची साथ मिळेल. किराणा, भुसार, प्रोव्हिजन या क्षेत्रात काम करणाऱ्यांना चांगला काळ. जप, तप, अनुष्ठानाचे संकल्प पूर्णत्वास जातील. त्वचाविकार, संसर्गजन्य रोगांपासून सावध असावे. घरच्यांबरोबर, स्वजनांबरोबर प्रवास, करमणूक, स्नेहभोजनाचा आनंद घ्याल. सत्संग लाभेल.

**सिंह**

**पतीपत्नींमध्ये** ताणतणाव वाढणार नाहीत, याची काळजी घेणे गरजेचे ठरेल. जोडीदाराच्या काही अपेक्षांची पूर्ती करू शकाल. घडून येत असलेल्या गोष्टी तुमच्या वागण्या बोलण्यामुळे बिघडणार नाहीत याची काळजी घ्यावी. स्वसंवादाने स्वत:मध्ये थोडा सकारात्मक बदल करणे गरजेचे ठरणारे आहे. घरातील ज्येष्ठांकडून काही प्रमाणात फायदे संभवतात. संततीच्या चुका त्यांना परखडपणे सांगणे, तसेच दिशा देणे गरजेचे ठरणारे आहे. महिलांना ऐनवेळेस अडचणीचा ताण आला तरी अपेक्षित मदत पदरात पडेल. तरुणांनी पैशाच्या व्यवहारात मध्यस्थी करणे-घेणे टाळावे. नोकरीत हितशत्रू डोके वर काढतील. वरिष्ठ कनिष्ठांमध्ये गैरसमज निर्माण होऊन अडचणी वाढणार नाहीत याची काळजी घ्यावी. व्यवसायात स्वत:चे बोलणे, स्वत:च्या कृतीत सौम्यता असणे गरजेचे ठरणारे आहे. शासकीय कामे, कर्ज, प्रलंबित प्रश्नांचा थोडा ताण राहील. कायदा, वकिली, न्यायालय या क्षेत्रात काम करणाऱ्यांना चांगला काळ. पोटदुखी, पचन, अपचन यापासून सावध असावे. वाचन, श्रवण, मननाने उत्साह वाढण्यास मदत मिळेल. घरातील ज्येष्ठ व कनिष्ठांच्या आरोग्याकडे थोडे लक्ष देणे गरजेचे ठरणारे आहे. सत्संगाचा लाभ होईल. प्रवासात आपण भले, आपले काम भले या न्यायाने वागणे गरजेचे ठरेल. वैयक्तिक कला, छंद जोपासाल.

**कन्या**

**मित्र,** नातेवाईकांचे सल्ले काही प्रमाणात फायद्याचे ठरतील. ऐकावे जनाचे, करावे मनाचे या न्यायाने वागणे गरजेचे आहे. काहींना कमी श्रमात अधिक लाभ संभवतो. संवादामुळे अडचणीत भर पडणार नाही, याचे भान ठेवावे. अनावश्यक खर्च टाळून बचतीकडे लक्ष देणे गरजेचे ठरणारे आहे. पूर्वी केलेली गुंतवणूक फायदा देऊन जाईल. संततीच्या हट्टास आळा घालणे, त्यांचे अतिलाड करणे टाळावे. महिलांचा स्वजन, स्नेही यांच्याबरोबर उत्तम संवाद प्रस्थापित होईल. जुन्या चुका परत होणार नाहीत, याची काळजी घ्यावी. तरुणांनी खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक ठरेल. नोकरीत अवलंबून राहाणे टाळावे. वरिष्ठ कनिष्ठांशी योग्य संवाद साधला जाईल. व्यवसायात बोलण्यामुळे समोरील फायदा दुरावला जाणार नाही, याची काळजी घ्यावी. कायदेविषयक बाबी हाताळताना योग्य दक्षता घेणे गरजेचे ठरेल. शेती, शेतीजन्य क्षेत्रात काम करणाऱ्यांना चांगला काळ. संगीत, वाचन, श्रवणाचा आनंद घ्याल. मित्र, नातेवाईकांशी गप्पा, ज्ञानाची देवाणघेवाण मनाचा आत्मविश्वास वाढवणारी ठरेल. लागणे, खरचटणे, भाजणे यापासून सावध असावे. प्रवास खर्चिक, परंतु कार्यसाधक ठरतील. वैयक्तिक कला, छंद जोपासाल. सत्संग लाभेल.

**तूळ**

**परिस्थिती** हाताबाहेर जाणार नाही, याची काळजी घ्यावी. माहीत नसलेल्या गोष्टीबद्दल वाच्यता करणे टाळावे. घरातील व्यक्तींचे समज गैरसमज समजावून घेऊन मानसिक त्रास वाढणार नाही, हे पाहावे. खर्च व मिळकत यांचे गणित जमवणे तारेवरची कसरत ठरेल. शेजाऱ्यांना झेपतील तेवढीच आश्वासने द्यावीत. संततीसंदर्भात मनाविरोधात गोष्टी घडू शकतात. महिलांच्या बाबतीत स्वसंवाद साधणे आवश्यक ठरेल. जोडीदाराला कुठल्याही बाबतीत अंधारात ठेवू नये, ते अडचणीचे ठरू शकते. तरुणांनी निर्णय घेताना सडेतोड असणे गरजेचे ठरणारे आहे. नोकरीत प्रथमदर्शनी अवघड वाटणाऱ्या गोष्टी नंतर सुलभ होऊन जातील. नोकरीत कामाचा उरक वाढवावा लागेल. व्यवसायात भांडवलाचे, कर्जाचे, बँकेचे, शासकीय अडचणीचे प्रश्न मार्गी लागतील. हितशत्रू डोके वर काढू शकतात. खर्चाचे गणित कोलमडणार नाही, याची काळजी घ्यावी. कागद, छपाई, झेरॉक्स, संगणकीय कामे या क्षेत्रात काम करणाऱ्यांना चांगला काळ. ॲसिडिटी, उष्णता या विकारांपासून सावध असावे. जप, तप, अनुष्ठानाचे संकल्प पूर्णत्वास जातील. प्रवासात चौकस असणे गरजेचे ठरेल. कला, छंद जोपासाल.

**वृश्चिक**

**पतीपत्नीमधील** गैरसमज, ताणतणाव कमी होतील. स्वत:च्या वागण्या बोलण्यामुळे घडत असलेल्या गोष्टी बिघडणार नाहीत, याचे भान ठेवावे. मर्यादित खर्च करणे थोडे हितावह ठरणारे आहे. काहींना कमी श्रमात अधिक लाभ होईल. नात्यातील जुनी उधारी वसूल होईल. वाहन, वास्तू खरेदीच्या दृष्टीने केलेले प्रयत्न यश देतील. कर्ज कमी करण्याच्या प्रयत्नात यश मिळेल. संततीबाबतीत घेतलेले निर्णय योग्य ठरतील. संततीस सल्ले देताना स्वत:ची कृती, वृत्ती समतोल ठेवणे आवश्यक आहे. महिलांच्या बाबतीत पैशाचे नीट नियोजन करणे आवश्यक ठरेल. चौकशीअंती केलेल्या खरेदीचा आनंद मिळेल. तरुणांना संगतदोष अडचणीचा ठरू शकतो. नोकरीत सोयीसुविधा, अडकून राहिलेले पैसे, रजा, आवडते काम या दृष्टीने सकारात्मक काळ. तुमच्या कामावर वरिष्ठ खूष असल्याचे दाखवू शकतात. व्यवसायात एकंदरीत उलाढाल अपेक्षेपेक्षा अधिक फायदा देऊन जाईल. जागेचे प्रश्न मार्गी लागतील. उधारी, उसनवारी वसूलीचे प्रयत्न यश देतील. बँकिंग, वित्त व्यवहार, अकौंटिंग या क्षेत्रात काम करणाऱ्यांना चांगला काळ. वैद्यकीय खर्चाची टाळाटाळ महागात पडू शकते. मस्तक, मुख यांच्या आरोग्याबाबतीत सावध असावे. वाचन, श्रवण, कला, छंद याचा आनंद घ्याल. ध्यानधारणा, जप मनास शांतता देईल. प्रवास कार्यसाधक होतील. सत्संग लाभेल.

**धनु**

**दुसऱ्याच्या** बोलण्याचा त्रास करून घेण्यापेक्षा दुर्लक्ष करणे गरजेचे ठरेल. नात्यातील वादविवादात मध्यस्थीची भूमिका घेण्याच्या भानगडीत पडू नये. तुमच्या सल्ल्यामुळे तुम्हालाच आर्थिक अडचण निर्माण होणार नाही, याचे भान ठेवावे. कौटुंबिक अस्वस्थतेला सामंजस्यपूर्वक कमी करू शकाल. घरातील ज्येष्ठ कनिष्ठांचे प्रश्न मार्गी लागतील. ज्येष्ठांकडून काही प्रमाणात फायदे संभवतात. सुख वाढवणाऱ्या गोष्टींची खरेदी कराल. संततीसंदर्भात अपेक्षित यश पदरी पडल्याचे समाधान राहील. महिलांनी स्वत:चाच फायदा बघणाऱ्यांच्या आश्वासनांवर अवलंबून राहू नये. तरुणांसाठी घडून गेलेल्या चुका सुधारण्याच्या दृष्टीने सकारात्मक परिस्थिती राहील. नोकरीत बदली, बढती, नवीन नोकरी, नवीन काम या दृष्टीने केलेले प्रयत्न यश देतील. हाताखालील लोकांवर जरूरीपुरताच विश्वास ठेवावा. व्यवसायात एकाच्या आश्वासनावर दुसऱ्यास आश्वासन देणे टाळावे. कर्ज मिळेल. जागेच्या अडचणीचे प्रश्न मार्गी लागतील. देवकार्य, पूजा साहित्य, धार्मिक, आध्यात्मिक क्षेत्रात व्यवसाय करणाऱ्यांना चांगला काळ. हृदयासंबंधीचे आजार, रक्तदाब याची काळजी घ्यावी. घरच्यांबरोबर, मित्रांबरोबर गप्पा, स्नेहभोजन, करमणुकीचा आनंद घ्याल. प्रवास खर्चिक व दगदगीचे ठरू शकतात. सत्संग लाभेल.

**मकर**

**लाभापेक्षा** नुकसान जास्त होणार नाही, असा दृष्टिकोन फायद्याचा ठरेल. तुमच्या निर्णयामुळे घरातील जुनी पिढी दुखावली जाणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक राहील. साचून राहिलेल्या कामांना गती देण्याचे ठरवाल. एकंदरीत कौटुंबिक स्तरावर सुखसमाधान वाढवणाऱ्या गोष्टी घडतील. घरात शुभकार्याचे संकेत मिळतील. संततीस नियमितता टिकवून ठेवण्याच्या दृष्टीने सांगत राहाणे गरजेचे ठरेल. महिलांनी इतरांच्या चुकांमुळे अडचणीत येणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. तरुणांना बघू-करू अशी बेफिकीर वृत्ती त्रासदायक ठरेल. नोकरीत अपेक्षेनुसार गोष्टी घडतील. वाटत असलेला तणाव अडचणीचा ठरणारा नाही. व्यवसायात दिली घेतलेली आश्वासने तंतोतंत पाळली जातील. प्रतिस्पर्ध्यांशी, नोकरवर्गाशी मुत्सद्दीपणाने वागणे गरजेचे ठरणारे आहे. नाट्य, चित्र, कला, मनोरंजन, करमणूक या क्षेत्रात काम करणाऱ्यांना चांगला काळ. मित्र, स्नेह्यांबरोबर आध्यात्मिक, धार्मिक, राजकीय वादविवाद, चर्चेचा आनंद घ्याल. मधुमेहींनी पथ्यपाणी सांभाळावे. प्रवासामुळे आत्मविश्वास वाढेल. जप, तप, अनुष्ठानाचे संकल्प पूर्णत्वास जातील. कला, छंद जोपासाल.

**कुंभ**

**पैशाबाबतचा** ताण थोडा कमी होईल. खर्चास पैशाची उपलब्धता राहील. अडचणीच्या व्यवहारातील तुमची मध्यस्थी यश देणारी ठरेल. घरात वादविवाद वाढणार नाहीत याची काळजी घ्यावी. कुठल्याही प्रकारची जोखीम, ताण देणारी कामे स्वत:हून अंगावर ओढवून घेऊ नयेत. काहींना कमी श्रमात अधिक लाभ संभवतात. शेजाऱ्यांचे ऐनवेळेस सहकार्य मिळेल. संततीच्या हट्टापायी कौटुंबिक स्तरावर ताणतणाव वाढणार नाही, याची काळजी घ्यावी. महिलांच्या बाबतीत तणाव, घालमेल यामुळे त्रस्तता वाढू शकते. तरुणांना जवळील नातेवाईक, मित्र, सहकारी यांच्या सहकार्याचा उत्तम उपयोग होईल. नोकरीत वरिष्ठ कनिष्ठांशी समसमांतर वागणे गरजेचे ठरेल. इतरांच्या सल्ल्यामुळे, वागण्यामुळे, घ्यायच्या निर्णयामुळे स्वत:स अडचणी निर्माण होणार नाही, याची काळजी घ्यावी. व्यवसायात अपेक्षित उलाढाल उत्तम फायदा देऊन जाईल. जोडधंद्यातून चांगला पैसा संभवतो. नवीन बोलणी, नवीन उद्योग, नवीन भागीदारी या दृष्टीने केलेली बोलणी फायद्याची ठरतील. खाद्यपदार्थ, प्रवाही पदार्थ, न्याहारीचे पदार्थ, रेस्टॉरंट या क्षेत्रात काम करणाऱ्यांना चांगला काळ. प्रवास कार्यसाधक व अपेक्षित खर्चाचे होतील. अतिश्रम, अशक्तपणा, ताप याची काळजी घ्यावी. जपग, तप, अनुष्ठानाचे संकल्प पूर्णत्वास जातील. वैयक्तिक कला, छंद जोपासाल. राहून गेलेल्या गोष्टी मार्गी लावाल. सत्संग लाभेल.

**मीन**

**अडचणीत** जोडीदाराचे उत्तम सहकार्य लाभेल. पतीपत्नीमध्ये प्रेम, विश्वास अधिक दृढ होत जाईल. पैशाची उपलब्धता उत्तम राहिली तरी अवाजवी खर्च होणार नाही याबाबत सावध असणे गरजेचे आहे. स्वत:च्या अडचणीकडे थोडे सकारात्मक रीतीने पाहणे फायद्याचे ठरेल. दुसऱ्यास सल्ला देण्याघेण्याच्या भानगडीत फारसे पडू नये. एकंदरीत कौटुंबिक स्तरावर सुखसमाधानाचे वातावरण राहील. कुटुंबाबाहेरील व्यक्तीशी थोडे भान ठेवून वागणे गरजेचे ठरेल. संततीबाबतीत मुत्सद्दीपणा व व्यवहार या दृष्टीने वागणे फायद्याचे ठरेल. महिलांना नातेवाईक, स्वजन, जोडीदार यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळेल. तरुणांबाबतीत अति आत्मविश्वास अडचणीचा ठरू शकतो. नोकरीत बरेच दिवसापासून असलेल्या अडचणी दूर करणारे ग्रहमान. पगारवाढ, बदली, बढती, बरेच दिवसापासून वाट पाहात असलेली संधी याबाबतीत सकारात्मक काळ. व्यवसायात कोणावर अवलंबून राहाणे टाळावे. शासकीय अडचणीची कामे, बँक, वित्तविषयक या संदर्भातील अडचणी दूर होतील. वैद्यकीय, औषध निर्मिती, रुग्णालये या क्षेत्रात काम करणाऱ्यांना चांगला काळ. प्रवास खर्चिक परंतू कार्यसाधक ठरतील. मस्तक, पाठदुखी, स्नायूदुखी यापासून सावध असावे. वाचन, श्रवण, मनन मनाचा उत्साह वाढवेल. जप, तप, अनुष्ठानाचे संकल्प पूर्णत्वास जातील. मनोरंजनाचा आनंद घ्याल, कला-छंद जोपासाल. सत्संग लाभेल.

# लस घेतलेल्या सर्व परदेशी नागरिकांना ८ नोव्हेंबरपासून अमेरिकेत मुक्त प्रवेश



**वॉशिंग्टन -** कोरोनामुळे जगात निर्माण झालेली बिकट परिस्थिती आता हळूहळू पूर्वपदावर येत आहे. त्याचाच एक भाग म्हणजे अमेरिकेने आता लसीचे दोन्ही डोस घेतलेल्या सर्व परदेशी नागरिकांसाठी देशात प्रवेश देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार ८ नोव्हेंबरपासून अमेरिकेत प्रवेश करण्यासंबंधी परदेशी नागरिकांवर घातलेली सर्व बंधने उठवण्यात आली आहेत. मात्र लसीचे २ डोस घेतलेल्यांनाच अमेरिकेत मुक्त प्रवेश दिला जाईल, असे व्हाईट हाऊसने शुक्रवारी जाहीर केले. कोरोनाच्या फैलावानंतर मार्च २०२० मध्ये अमेरिकेने प्रथम चीनमधून येणाऱ्या विमानांना अमेरिकेत बंदी घातली होती. तेव्हा डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होते. त्यानंतर त्यांनी डझनभर देशांच्या विमानांना अमेरिकेत प्रवेशबंदी केली. याशिवाय अनेक देशांच्या नागरिकांनाही प्रवेशबंदी केली होती. परंतु आता कोरोनाची परिस्थिती जागतिक स्तरावर निवळत असल्यामुळे कोरोनाचे निर्बंधही शिथिल केले जात आहेत. त्यात अमेरिकेने परदेशी विमाने आणि नागरिकांवर घातलेले निर्बंध मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे.

## एक वृक्ष



काल वडाने, आपल्याला विचारलं,
दुखतंय का रे जास्त..?
तुझ्याही फांद्या, तुझीही पानं,
माणसाने केली ना उध्वस्त...

वर्षातून एक दिवस,
म्हणे आपला असतो मान,
कुणी विचार करतो का,
आपल्यातही असतो प्राण...

त्यांचा उत्सव साजरा होतो,
आपली म्हणे होते पूजा,
त्यांना कुठे कळतेय मित्रा,
आपल्याला होणारी ईजा..

पूर्वी बांधायचे दोर वडाला,
आता फांद्या तोडून नेतात,
लचके तोडून त्याच वडाला,
काय तर म्हणे देव म्हणतात..

गरजेपेक्षा जास्त किती,
तोडतात फांद्या नी पाने,
निर्जीव झालेल्या पानांना,
मग म्हटलं जातं सोने

दुसऱ्याच दिवशी सोन्याचा,
फक्त पालापाचोळा होतो,
कालचा देव आज मात्र,
पायदळी तुडवला जातो...

कसली म्हणायची श्रद्धा ही,
कसली रे पही भक्ती,
स्वत:ला नी निसर्गाला,
फसवायचीच ही युक्ती...

विरोध नाही आमचा कुठल्या,
चाली रीती प्रथांना,
पण बघवत नाही निसर्गाचा,
ऱ्हास उगा होताना

आपण कधी स्वत:ला,
देव म्हणवून घेत नाही,
खूप आहेत दु:ख आपली,
पण बोलता येत नाही...

आपण देतोय भरभरून,
त्यांनी गरजेपुरतंच घ्यावं,
सण साजरे करावे पण,
आम्हालाही जगू द्यावं...

# आता पर्यटकांना मुंबई उच्च न्यायालयाच्या इमारतीतही फेरफटका मारता येणार

■ मुंबई

**मुंबई** एक स्वप्ननगरी आहे,असे म्हटले जाते. या स्वप्ननगरीत अशी काही स्मारकेही आहेत ज्याला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. मुंबईतील अशा ऐतिहासिक स्मारकांची वस्तूंची माहिती सर्वसामान्यांना व्हावी यासाठी मुंबई उच्च न्यायालय आणि पर्यटक मार्गदर्शक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यटन संचालनालय यांचा संयुक्त विद्यमाने आज शनिवार १६ ऑक्टोबरपासून पर्यटकांना मुंबई उच्च न्यायालयाचे दरवाजे खुले करण्यात आले आहेत.

त्यामुळे पर्यटक आता शनिवार आणि रविवारी सकाळी १० ते दुपारी २ पर्यंत मुंबई उच्च न्यायालयाला भेट देऊ शकतील.याठिकाणी एक तास वेळ घालवता येणार आहे. पर्यटकांना हेरिटेज वॉकचा अनुभव घेता येणार आहे.मराठी, इंग्रजी आणि हिंदी भाषांमध्ये एकूण ३ हेरिटेज वॉक आयोजित केले जातील.त्यामध्ये भारतीय पर्यटकांना



१०० रुपये आणि परदेशी पर्यटकांना २०० तिकीट आकारले जाणार आहे. पर्यटकांनी बुकमायशो डॉट कॉम' वर तिकीट बुक करणे आवश्यक आहे.मुंबई उच्च न्यायालय हे भारतातील सर्वात जुन्या उच्च न्यायालयांपैकी एक आहे. उच्च न्यायालयाच्या अधिनियम, १८६१ अंतर्गत १४ ऑगस्ट १८६२ रोजी हे स्थापन करण्यात आले. उच्च न्यायालयाच्या सध्याच्या इमारतीचे काम एप्रिल १८७१ मध्ये सुरू झाले व नोव्हेंबर १८७८ मध्ये पूर्ण झाले.१९ व्या शतकात ब्रिटिशांनी नेत्रदीपक आणि लक्षवेधी अशा गॉथिक पुनरुज्जीवन शैलीमध्ये ही इमारत साकारली होती. ही इमारत व्हिक्टोरियन आणि आर्ट डेको एन्सेम्बल ऑफ बॉम्बेचा भाग आहे, जी २०१८ मध्ये जागतिक वारसा स्थळांच्या यादीत जोडली गेली.या इमारतीचे मुख्य आकर्षण असलेल्या संग्रहालयामध्ये आंतरिक रचना न्यायालयाच्या खोलीप्रमाणे आहे. ही जागा जुनी कायदेशीर रोल, वकिलांची पोर्ट्रेट आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या एका कोपऱ्यात असलेल्या वजा मॉडेलसह तयार केली गेली आहे.

# गोरेगावमधील मोतीलाल नगरच्या पुनर्विकासाचे म्हाडाने टेंडर काढले

■ मुंबई

**गोरेगाव** पश्चिम मोतीलाल नगर या सर्वात मोठ्या वसाहतीच्या पुनर्विकासाचे ई-टेंडर अखेर म्हाडाने काढले आहे. सुमारे ६२ लाख चौरस फूट क्षेत्रफळाच्या या ई-टेंडरसाठी खासगी कंपन्यांना १३ डिसेंबर २०२१ पर्यंत निविदा भरता येणार आहेत. मुंबईतील मोक्याच्या ठिकाणचा हा सर्वात मोठा पुनर्विकास प्रकल्प आहे. तो ७ वर्षांत पूर्ण करण्याचे म्हाडाचे उद्दीष्ट आहे.

गोरेगाव पश्चिम येथे मोतीलाल नगर एक, दोन आणि तीन ही म्हाडाची मोठी वसाहत आहे. तेथे सुमारे ५ हजार ३०० घरे आहेत. या वसाहतीच्या पुनर्विकासाला विशेष बाब



म्हणून राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. त्यानंतर म्हाडाने मोतीलाल नगरच्या पुनर्विकासासाठी ई-टेंडर काढून खासगी कंपन्यांकडून निविदा मागवल्या आहेत. हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी म्हाडाने ७ वर्षांची मुदत ठरवली आहे. त्यासाठी कंपन्यांना १३ डिसेंबरपर्यंत निविदा भरता येणार आहेत. मोतीलाल नगरच्या तीन वसाहती सुमारे ५० हेक्टर जमिनीवर वसल्या आहेत. त्यांचा पुनर्विकास करणे म्हाडाला आर्थिकदृष्ट्या शक्य नाही. त्यामुळे खासगी एजन्सी नेमून या वसाहतीचा पुनर्विकास करण्यास सरकारने मंजुरी दिली आहे.

या प्रकल्पांतर्गत निवासी वापराकरिता प्रति गाळा १,६०० चौरस फूट आणि बिगर निवासी वापराकरिता

» पान २ वर

# 'गुलाबो सिताबो' फेम अभिनेत्री फारुख जफर यांचे दु:खद निधन

■ लखनऊ



**ज्येष्ठ** अभिनेत्री आणि दिग्गज अदाकारा फारुख जफर यांचे शुक्रवारी सायंकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. त्या ८९ वर्षांच्या होत्या. 'गुलाबो सिताबो' हा त्यांचा गाजलेला चित्रपट. 'उमराव जान' या हिंदी चित्रपटात त्यांनी रेखाच्या आईची भूमिका केली होती. त्यांच्या निधनाबद्दल चित्रपट सृष्टीतील अनेक मान्यवरांनी दु:ख व्यक्त केले आहे. ज्येष्ठ अभिनेत्री फारूख जफर यांना ४ ऑक्टोंबरला त्रास होऊ लागल्यामुळे उपचारासाठी लखनऊच्या सहारा रुग्णालयात दाखल केले होते. तेथे त्यांच्यावर उपचार सुरू होते. मात्र शुक्रवारी सायंकाळी ६ च्या सुमारास त्यांनी अखेरचा श्वास घेतला, अशी माहिती त्यांची नात शाज अहमदने केलेल्या ट्विटमध्ये दिली आहे. स्वातंत्र्यसैनिक आणि माजी आमदार एस. एम. जाफर यांच्या त्या पत्नी होत्या. १९८१ मध्ये उमराव जान चित्रपटाद्वारे त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत पदार्पण केले होते. गुलाबो सिताबो या चित्रपटातील फातिमा बेगम ही त्यांची भूमिका अतिशय गाजली होती.

# सस्पेंस संपले! हैबतुल्लाह यापूर्वीच ठार झाल्याचे तालिबानचे स्पष्टीकरण

**काबूल -** तब्बल २० वर्षानंतर अफगाणिस्तानवर पुन्हा कब्जा केलेल्या तालिबानने आपला नेता हैबतुल्लाह अखुंदजादा याच्या विषयीचे सस्पेन्स संपवले आहे. २०२० मध्ये पाकिस्तानात एका आत्मघाती हल्ल्यात तो ठार झाल्याचे तालिबानने जाहीर केले. यामुळे हैबतुल्लाहबाबतच्या तर्क-वितर्कांना पूर्णविराम मिळाला आहे. हैबतुल्लाह २०१६ मध्ये तालिबानचा प्रमुख नेता होता. अतिशय क्रूर अशी त्याची ओळख होती. १५ ऑगस्टला तालिबानने अफगाणिस्थानवर कब्जा केल्यानंतर तो पुन्हा प्रकट होईल, अशी चर्चा होती. मात्र तो २०२० मध्ये पाकिस्तानातील एका आत्मघाती हल्ल्यात ठार झाला असल्याचे तालिबानने जाहीर केले. हैबतुल्लाह ठार झाल्याचे काही जणांचे मत होते, तर काही जण तो तुरुंगात असल्याचे सांगत होते. मात्र याविषयी तालिबानने मौन बाळगले होते. परंतु आता त्यांनी तो पाकिस्तानी सेनेच्या आत्मघाती हल्ल्यात ठार झाला असल्याचे सांगून याबाबतचे रहस्य कायमचेच संपवले आहे.

# पुणे पालिकेच्या कंत्राटी सुरक्षा रक्षकांचे ३ महिन्यांचे वेतन थकले

■ पुणे

**पुणे** महापालिकेकडून विविध ठिकाणी सुरक्षा कर्मचारी म्हणून काम करणाऱ्या सुरक्षा रक्षकांना तीन महिन्यांचा पगार मिळालेला नाही. त्यामुळे गणेशोत्सव-दसऱ्यासारख्या ऐन सणासुदीच्या काळात हातात पैसा नसल्याने या कर्ज काढून सण साजरा करण्याची सुरक्षा रक्षकांना.वेळ आली आहे. कंत्राटी पद्धतीने कामाला असलेले हे सुरक्षा रक्षक महापालिकेच्या क्षेत्रिय कार्यालये, दवाखाने, पालिकेची उद्याने आदी ठिकाणी कामांवर आहेत. कोंढवा-येवलेवाडी आणि धनकवडी-सहकारनगर क्षेत्रिय कार्यालयाच्या हद्दीतील कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांना जून महिन्यांपासून पगार मिळाला नाही. मात्र, गणेशोत्सवात आम्ही मागणी केल्यावर जून महिन्याचा अर्धा पगार ऑगस्ट महिन्यात आमच्या खात्यावर जमा केला असल्याची माहिती सुरक्षा कर्मचारी अमर कदम यांनी दिली. कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांचे



सद्यस्थितीला जून महिन्याचे अर्धे आणि जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यांचे पूर्ण असे साडेतीन महिन्यांचे वेतन थकित आहे. दिवाळी १५ दिवसांवर आली असून गतवर्षी दिवाळीला कर्मचाऱ्यांना बोनसदेखिल मिळाला होता.

# रायपूर स्थानकात रेल्वेत स्फोट

**रायपूर -** छत्तीसगडची राजधानी रायपूर रेल्वे स्थानकात आज सकाळी ६.३० च्या सुमारास विशेष रेल्वेत स्फोट झाला. त्यात सीआरपीएफचे ६ जवान

## सीआरपीएफचे ६ जवान जखमी



जखमी झाले. त्यातील एकाची प्रकृती चिंताजनक आहे. त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर रेल्वे स्थानकात प्रचंड खळबळ माजली. झारसुगुडा येथून जम्मू तवीकडे जात असलेली सीआरपीएफची विशेष ट्रेन सकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास रायपूर स्थानकाच्या फलाट नंबर २ वर उभी होती. त्यावेळी या ट्रेनमध्ये काडतुसांच्या पेट्या चढवण्यात येत होत्या. त्यावेळी ९ नंबरच्या बोगीजवळ एक पेटी खाली पडली आणि तिचा स्फोट झाला. त्यात ६ जवान जखमी झाले. त्यांना रायपूरच्या नारायण रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यातील एकाची प्रकृती चिंताजनक आहे, असे रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. या घटनेनंतर सकाळी ७.१५ वाजता ही ट्रेन पुढे रवाना झाली. यात कोणीही सामान्य प्रवासी जखमी झाला नसल्याचे पोलिसांनी सांगितले.

# बदलापुरात शिवसेनेचे अनोखे आंदोलन वाहनचालकांना झंडू बाम, मास्क वाटप

**बदलापूर -** रस्त्यावर पडलेले खड्डे, त्यातून उडणारी धूळ आणि वाहनचालकांना होणारा त्रास याविरोधात शिवसेनेने बदलापूर शहरात वाहनचालकांना चक्क झंडू बाम आणि मास्क वाटत आंदोलन केले. बदलापूरच्या खरवई परिसरात करण्यात आलेल्या या आंदोलनाची सध्या चांगलीच चर्चा रंगली आहे. बदलापूरहून कर्जतकडे जाताना बदलापूर ते खरवई या पट्ट्यात रस्त्यावर प्रचंड प्रमाणात खड्डे पडले आहेत. याविरोधात अनेकदा तक्रारी करूनही साधे डागडुजीचंही काम झालेले नाही. त्यामुळे अखेर शिवसेनेचे शिक्षण मंडळ सदस्य महेश जाधव यांनी वाहनचालकांना झंडू बाम आणि मास्कचे वाटप केले. खड्ड्यांमुळे नागरिकांना पाठीची दुखणी सुरू झाली असून खड्ड्यांमुळे उडणाऱ्या धुळीमुळे श्वसनाचे आजार जडले आहेत. त्यामुळे या दोन्हीपासून रक्षण करण्यासाठी झंडू बाम आणि मास्क वाटल्याचे महेश जाधव यांनी सांगितले. यापूर्वी याच रस्त्यासाठी दोन वेळा निधी मंजूर झाल्याची बॅनरबाजी करण्यात आली. पण, रस्त्याचे काम मात्र झालेलेच नसल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले. या आंदोलनाची बदलापुरात चर्चा रंगली असून आता तरी रस्त्याचे काम मार्गी लागते का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# शाळेजवळ मद्य परवाना मिळालेल्या हॉटेल विरोधातील याचिका नामंजूर

■ मुंबई

**विद्यार्थ्यांमध्ये** नैतिक मूल्ये रुजवून त्यांना आदर्श नागरिक बनविणे हे शिक्षण संस्थांचे पहिले काम आहे. शाळेजवळ असलेल्या हॉटेलला मद्य परवाना मिळाला म्हणून त्याचा विद्यार्थ्यांवर वाईट परिणाम होईल असे वाटण्याइतपत आपल्या शिक्षण संस्था कमकुवत आहेत का असा सवाल करत मुंबई उच्च न्यायालयाने शाळेजवळ मद्य परवाना मिळालेल्या हॉटेलला विरोध करणारी याचिका नामंजूर करत फेटाळून लावली.

आदिवासी भागातील मुलांसाठी शाळा आणि वसतिगृह चालवणारे देवेंद्र मुंढे यांच्यासह तिघांनी पुण्यातील शिक्षण संस्थेच्यावतीने यासंदर्भात याचिका दाखल केली होती. यावर मुंबई उच्च



न्यायालयाचे न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांनी आपले हे मत मांडत याचिका फेटाळून लावली. यावेळी न्यायालयाने काढलेल्या आदेशात म्हटले आहे की, शिक्षण संस्थेचे प्रवेशद्वार आणि हॉटेलमधील अंतर ४५० मीटर इतके आहे. शिवाय इथले १० ते १२ वर्षांपासून असणारे आणखी एक हॉटेलही ३७५ मीटरवर आहे.याला याचिकाकर्त्यांचा काहीच आक्षेप नाही. तसेच हॉटेलमूळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल असा कोणताही अहवाल पोलिसांनी दिलेला नाही.विशेष म्हणजे हॉटेल शाळेपासून बरेच दूर असल्याचे नमूद करूनच राज्य उत्पादन शुल्क आयुक्तांनी ३० मार्च २०२० रोजी त्यांचे अपील मान्य केले होते.त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी राजकिय दबाव हेतूनेच हॉटेल मालकाचा अर्ज फेटाळल्याचे दिसून येते.

# भास्करराव खतगावकर स्वगृही परतणार लवकरच काँग्रेसमध्ये दाखल होणार


**नांदेड -** राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांच्या बहिणीचे पती आणि भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष,माजी खासदार भास्करराव खतगावकर हे लवकरच स्वगृही परतणार आहे.ते काँग्रेसमध्ये परतणार असल्याची जोरदार चर्चा नांदेडच्या राजकारणात सुरू असून त्यांनी बिलोली तालुक्यातील शंकरनगर येथे आपल्या कार्यकर्त्यांची बैठक आयोजित केली होती.

कोणतीही अट न घालता भास्करराव खतगावकर हे सात वर्षांपूर्वी अशोक चव्हाण यांच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त करत भाजपमध्ये गेले होते. मात्र २०१९ च्या विधानसभा निवडणुकीवेळी त्यांच्या स्नुषा डॉ.मीनल खतगावकर यांना नायगाव मतदारसंघातून तिकीट वाटप करताना डावलले होते. तेव्हापासूनच खतगावकर हे भाजपावर नाराज होते. खतगावकर हे देगलूर-बिलोलीमधून तीनवेळा आमदार आणि नांदेडचे खासदार म्हणून निवडून आलेले आहेत.पण भाजपमध्ये गेलेले खतगावकर हे तीन वर्षांपासून भाजपातही नाराज असल्याने आता पुन्हा काँग्रेसमध्ये परतण्याच्या तयारीत आहेत. शंकरनगरच्या कार्यकर्ता बैठकीत खतगावकर हे जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल,आम्ही कोणत्याही पक्षाशी बांधील नसल्याची भूमिका उपस्थित कार्यकर्त्यांनी मांडली आहे.

# शिरोळ दत्त साखर कारखाना ऊसाला टनाला एकरकमी २९२० रुपये देणार

■ शिरोळ

**शिरोळ** येथील श्री दत्तशेतकरी सहकारी साखर कारखाना येत्या २१ ऑक्टोबरपासून सुरु होणार असून कारखाना यंदाच्या हंगामात शेतकऱ्यांच्या ऊसाला टनाला एकरकमी २९२० रुपये देणार असल्याची घोषणा कारखान्याचे



अध्यक्ष गणपतराव पाटील यांनी केली. महापुरात बुडीत झालेल्या ऊसाला गाळपासाठी प्राधान्य देणार असल्याचेही त्यांनी सांगितले. हंगामापूर्वीच दर जाहीर करणारा दत्त राज्यातील दुसरा कारखाना ठरला. प्रारंभी कारखाना संचालक इंद्रजित पाटील आणि राजश्री पाटील आणि मान्यवरांच्या हस्ते पुजाविधी आणि बॉयलर प्रदीपन करण्यात आले. गणपतराव पाटील म्हणाले की, कामगारांना दिवाळीला २१ टक्के बोनस एकरकमी देण्यात येणार आहे. यावर्षी साडेअकरा ते १२ लाख मेट्रिक टन ऊसाचे गाळप करण्याचे उद्दीष्ट असून १२.१० रिकव्हरी होईल असा अंदाज आहे. गेल्या वेळी ऊर्जांकुरच्या माध्यमातून १६ कोटी युनिट वीजनिर्मिती झाली असून त्यातील ४ कोटी युनिट वापरुनउर्वरित वीज ग्रीडला दिली. शेतकऱ्यांचे आणि कामगारांचे हित जपणे हेच दत्त कारखान्याचे ब्रीद असून सर्वांना पुढे घेऊन जाण्याची दृष्टी ठेवली आहे. चिकू आणि बिट यांचे प्रायोगित तत्वावर उत्पन्न घेण्यास सुरुवात झाली. ५० एकरावर बीटाचे उत्पादन घेऊन त्याचे गाळप करण्यात येणार आहे.

# भिवंडीत मध्यरात्री भीषण आगीची घटना ५ कारखाने,५० गोदामे जळून भस्मसात

■ भिवंडी

**भिवंडी** शहराजवळच्या गोदाम पट्ट्यात आगीच्या रोजच घटना घडताना दिसत आहेत. काल शुक्रवारी रात्रीही अकरा वाजण्याच्या सुमारास भिवंडी-ठाणे रस्त्यावरील कशेळी टोलनाका हद्दीतील चामुंडा कॉम्प्लेक्स येथील महालक्ष्मी फर्निचर नावाचे मोठे शोरूम आणि कारखान्यांना लागलेल्या आगीत तब्बल ५० हून अधिक गोदाम जळून खाक झाली आहेत तर ५ कारखाने जळून खाक झाले.सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. या सर्व कारखान्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर लाकूड, कापूस, फोम आणि रेक्झीन साठविलेले असल्याने ही आग पाहता पाहता सर्व कारखान्यात पसरुन सर्व कारखाने जळून बेचिराख झाले आहेत. या आगीची माहिती मिळताच भिवंडी, कल्याण, ठाणे येथील अग्निशामक दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. त्यांनी आग विझविली.ही आग शॉर्ट सर्किटमुळे लागल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविला जात आहे. सर्व कारखाने हे पत्र्याच्या शेडमध्ये असल्याने ही आग सर्वत्र पसरली. ज्यामुळे कोट्यवधी रुपयांचे साहित्य कच्चा माल जळून खाक झाला आहे.घटनास्थळी पाण्याची उपलब्धता नसल्याने आग विझविण्यात अडथळा येत होता.

# सातारा जिल्हा बँकेची निवडणूक जाहीर येत्या २१ नोव्हेंबरला होणार मतदान



**सातारा -** सातारा जिल्हा बँकेचा निवडणूक कार्यक्रम अखेर जाहीर झाला आहे. त्यानुसार सोमवार १८ ऑक्टोबर रोजी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. तर २१ नोव्हेंबर रोजी २१ जागांसाठी मतदान होणार आहे. यामध्ये सोसायटी मतदार संघात चुरस असून २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. सातारा जिल्हा बँकेची अंतिम मतदार यादी ४ रोजी जाहीर झाली होती. परंतु कोल्हापूर आणि पुणे बँकेसंदर्भात उच्च न्यायालय याचिका दखल झाल्यामुळे सातारा जिल्हा बँकेचा निवडणूक कार्यक्रम लांबला होता. अखेर शनिवारी तो जाहीर झाला. सोमवारपासून हा निवडणूक कार्यक्रम सुरू होत आहे. १८ ते २५ अर्ज दाखल करणे. २६ ऑक्टोबर रोजी अर्ज छाननी, आणि २७ रोजी उमेदवार यादी प्रसिद्ध होणार आहे.

# कसारा रेल्वे स्थानकात गर्दुल्ल्यांची हाणामारी! ब्लेडने सपासप वार केले

■ कल्याण

**रेल्वेमध्ये** गाणाऱ्या दोन मुलींवरून दोन गर्दुल्ल्यांमध्ये जोरदार हाणामारी झाल्याचा प्रकार कसारा रेल्वे स्थानकात काल शुक्रवारी सायंकाळी घडला. यामध्ये ब्लेडने वार केल्याने एकजण गंभीर जखमी जखमी झाला आहे.

कसारा रेल्वे स्थानकात शुक्रवारी संध्याकाळी सहा वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला.यावेळी पनवेल-गोरखपूर एक्स्प्रेसमध्ये स्थानकात उभी होती. तेव्हाच या दोन्ही गर्दुल्ल्यांमध्ये हाणामारी सुरु झाली. त्यावेळी एकाने स्वत:जवळ असलेल्या ब्लेडने दुसऱ्यावर वार केले. या हल्ल्यात जखमी झालेल्या गर्दुल्ल्याची ओळख पटली असून त्याचे नाव सोनू असे आहे. सोनूच्या गळ्यावर आणि छातीवर ब्लेडचे वार झाले आहेत. त्यामुळे त्याची प्रकृती गंभीर आहे. त्याला उपचारासाठी नाशिक येथे हलवण्यात आले आहे.हे दोन्ही गर्दुल्ले ट्रेनमध्ये गुटखा विकणे, पाकीटमारी करायचे.रेल्वेत गाणाऱ्या दोन मुलींवरुन हे भांडण झाल्याचा संशय आहे. त्यामुळे रेल्वे पोलिसांनी या दोन्ही मुलींना चौकशीसाठी ताब्यात घेतल्याचे समजते. या चौकशीतून आता पुढील माहिती समोर येण्याची शक्यता आहे.